CMYK

# विकसनशील सोलापूर

सोलापूर तरुण भारत

बुधवार, दि. ६ ऑगस्ट २०२५

वर्धापनदिन विशेष

पान १




# अमृत महोत्सवी पंढरपूर एज्युकेशन सोसायटीची यशस्वी वाटचाल



## पंढरपूर एज्युकेशन संस्थेच्या स्थापनेचा इतिहास

भारताच्या स्वातंत्र्यकालीन वर्षांमध्येच या संस्थेची स्थापना व्हावी, हा केवळ एक निखळ योगायोग, पंढरपूर शहरातील काही तरुण शिक्षकांनी शिक्षण संस्था स्थापन करावी आणि पंढरपुरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उदात्त हेतूने संस्थेची स्थापना करण्याचे ठरवले. त्याकाळी पंढरपुरा मध्ये नगर पलिका संचलित एक आणि खाजगी एक, अशा दोनच शाळा होत्या. वाढत्या विद्यार्थी संख्येची योग्य सोय लावणे गरजेचे होते. त्या दृष्टिकोनातूनच नवीन शाळा स्थापन करण्याचे ठरले.

पण त्या होतकरू आणि आपल्या विषयामध्ये तज्ञ असणाऱ्या तरुण शिक्षकांजवळ विद्यार्थी प्रियतेखेरीज आर्थिक भांडवल असे काहीच नव्हते. पण त्यांची खंबीर मने, उत्साह, अनंत अडचणीवर मात करण्याची जिद्द आणि आभाळाएवढा दृष्टिकोन होता. त्यांनी अनेक नामवंत तसेच सर्वसामान्य लोकांच्या भेटी घेऊन









आपली संकल्पना समजावून सांगितली. त्यातूनच प्रारंभीचे पाऊल म्हणून अश्विन शुद्ध दशमी १८६८ (विजयादशमी ५ ऑक्टोबर १९४६) रोजी या सर्व शिक्षण प्रेमी व नागरिकांची एक सभा घेऊन पंढरपूर एज्युकेशन सोसायटी पंढरपूर, या संस्थेची स्थापना करून मुहूर्तमेढ रोवली. याच सभेत जून १९४७ पासून पंढरपुरामध्ये हायस्कूल सुरू करण्याचे ठरवले.

पंढरपुरातील दानशूर नगरशेठ कै. दत्तोपंत कवठेकर व त्यांचे कनिष्ठ बंधू कै. औदुंबरशेठ कवठेकर यांनी आपण स्वतःहून या धडपडणाऱ्या शिक्षकांवर भरवसा ठेवून हायस्कूल अस्तित्वात येण्यापूर्वीच रुपये १५०००/- इतकी मोठी देणगी देऊन आणि त्याच प्रमाणे रुळापलीकडील सुमारे अडीच एकराचा भूखंड इमारतीसाठी म्हणून संस्थेकडे बक्षीस म्हणून दिला. कै. कृष्णाजी बाळूभाऊ फराटे, कै काशिनाथ विष्णू घारपुरे कै. खरे या सर्व कॉन्ट्रॅक्टर लोकांनी इमारत बांधकामामध्ये सहकार्य केले. त्याचप्रमाणे कै. भागवत नाना तारे, कै.ना.वि उत्पात, कै.ना.पी. उपलप, कै.गो.बा.तथा बाबासाहेब परिचारक, कै. भाऊसाहेब काणे वकील, कै. वा. गो. तथा अण्णासाहेब पटवर्धन, कै. बापूजी दवे, कै. डॉ.वा.वि काणे, कै. द. त्रि. आराध्ये पाटील, कै. बाबुरावजी बोरगावकर, कै. बबनराव बडवे, कै. म. अ सोनवणे, कै. तात्यासाहेब गुर्जर (वकील), कै. शंकर बंडो कुलकर्णी, कै. रामभाऊ रुपलग, कै. पां. द. आराध्ये, कै. बाबुरावजी जोशी, कै. डॉ. बिडारी आदी आणि असंख्य लोकांनी संस्थेला शक्य ते सहाय्य आणि सहकार्य केले. विशेष म्हणजे ही सर्व मंडळी त्याकाळच्या वेगवेगळ्या राजकीय पक्षांमध्ये आणि राजकीय प्रणालींमध्ये कार्यरत होती. पण शिक्षण संस्थेमध्ये मात्र सर्व मतभेद विसरून त्यांनी संस्था सुरू केली. पुढे नावारूपास आणली.

### विद्यार्थी संख्या

कवठेकर प्रशाला (नाथचौक) - १९१५.
द.ह.कवठेकर प्रशाला (सावरकर पथ) - १५४२.
आदर्श प्राथमिक विद्यालय - १५००.
पंचरत्न इंग्लिश मिडी.स्कुल - ४००.
अध्यापक विद्यालय - ५०

## संस्थेची तेजोमय कामगिरी

तमसो मा ज्योतिर्गमय या संस्थेच्या ब्रीदवाक्यानुसार पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या कवठेकर प्रशाला (नाथचौक) पंढरपूर आणि अध्यापक विद्यालय (सावरकर पथ) पंढरपूर या दोन्ही शाखांनी २०२२-२०२३ मध्ये आपला अमृत महोत्सव साजरा केला.

गेल्या ७५ वर्षात संस्थेने केवळ संख्यात्मक प्रगतीवर समाधान न मानता गुणात्मक प्रगती केलेली आहे. एस.एस.सी. परीक्षे मध्ये बोर्डाच्या गुणवत्ता यादी मध्ये आलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येवरून, त्याचप्रमाणे दरवर्षी इयत्ता दहावीचा वाढत जाणाऱ्या निकालाच्या चढत्या आलेखा वरून स्पष्ट झालेले आहे. नुसत्या दहावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादी मध्ये आणणे, संस्थेच्या वेगवेगळ्या शाळांमधील निकालाचा आलेख उंचावणे हा संस्थेचा कधीही उद्देश नव्हता. तर भारतीय संस्कृती आणि सभ्यता यांचे पालन आणि जतन ही संस्थेच्या विद्यार्थ्यांची प्राथमिकता आजही कायम आहे. शिक्षण शास्त्राच्या व्याख्येनुसार, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच संस्थेचे अंतिम उद्दिष्ट होते आणि आहे. त्यानुसारच शहर स्तरावर, जिल्हास्तरावर, राज्यस्तरावर होणाऱ्या वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन, कला आणि रांगोळी स्पर्धा तसेच केंद्र आणि राज्य शासनाकडून घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये संस्थेचे विद्यार्थी नेहमीच अव्वल राहिलेले आहेत. त्यामुळेच केवळ सोलापूर जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रातील एक नामवंत शिक्षण संस्था म्हणून देखील संस्थेच्या विविध शाखांचा नावलौकिक आहे.

## संस्थेच्या प्रगतीचे टप्पे आणि शाखा विस्तार

पंढरपूर एज्युकेशन सोसायटी या संस्थेची स्थापन झाली. या संस्थेचे पहिले हायस्कूल सुरु झाले, दिनांक २४ डिसेंबर १९४९ रोजी संस्थेच्या हायस्कूलचे 'कवठेकर हायस्कूल' असे नामकरण त्याकाळचे मुंबई राज्याचे मंत्री कै. श्री.ल. मा. पाटील यांच्या शुभहस्ते मोठ्या थाटामाटात व उत्साहात पार पडले.

## कवठेकर प्रशाला, नाथचौक, पंढरपूर

कबठेकर या माध्यमिक प्रशालेत आज इयत्ता पाचवी ते दहावीचे सेमी व मराठी माध्यमाचे ४१ वर्ग असून सुमारे १९१५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षणशास्त्राच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार शाळेची तीन मजली सी आकाराची इमारत आहे. जवळपास ३० पेक्षा जास्त खोल्या असून विज्ञान विषयासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा, स्वतंत्र ग्रंथालय असून त्याचा लाभ प्रशालेतील विद्यार्थी त्याचप्रमाणे शिक्षक पण घेतात. प्रशालेमध्येच देखणा कलामंच असून या कला मंचाचा उपयोग शाळा, संस्था त्याचप्रमाणे शिक्षक, ख्यातनाम संस्था, त्यांचे कार्यक्रम करण्यासाठी उपयोग करतात यामुळेच पंढरपूरकर नागरिक आणि शाळा यामधील सहकार्य वाढतच आहे.

## अध्यापक विद्यालय, पंढरपूर

पंढरपूरात प्राथमिक शिक्षकांमध्ये प्रशिक्षित शिक्षकांचे प्रमाण फारच कमी होते. या भागामध्ये अशा प्रशिक्षित शिक्षकांची नितांत गरज होती. ही गरज ओळखून आणि योग्य ती परवानगी मिळवून २० जून १९४७ रोजी संस्थेने ट्रेनिंग कॉलेज सुरू केले. एका आठवड्याच्या आतच पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या दोन स्वतंत्र शाखा पंढरीत सुरु झाल्यामुळे पंढरपूरकरांना विशेष कौतुक वाटले. ट्रेनिंग कॉलेजचे पहिले प्रिन्सिपल म्हणून कै. बा.रा. रत्नपारखी यांची संचालक मंडळांनी नेमणूक केली. तर प्राध्यापक म्हणून कै. त्रिं.स. अभ्यंकर, कै. गो. दि. भाळवणकर, कै.पु.बा. भार्गवशास्त्री यांनी अध्यापनाचे काम केले. ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन म्हणजे, आजचे अध्यापक विद्यालय. अध्यापक विद्यालयाचे परीक्षा निकाल नेहमीच ९० ते १०० टक्के असतो. १०० टक्के ही मर्यादा अनेक वेळा ओलांडली आहे. याचे सर्व श्रेय संस्थेचे प्राचार्य, सहकारी प्राध्यापक व कर्मचारी यांचेकडे जाते. सध्या अध्यापक विद्यालय स्वतःचे इमारतीत भरत असून स्वतंत्र वसतिगृह आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेतर्फे प्राथमिक शिक्षकांसाठी प्रशिक्षणाचे वर्ग चालू असतात. विद्यार्थ्यांच्या पाठ सरावासाठी पंढरपुर आणि पंढरपूर परिसरातील शाळांचा समावेश असतो. संस्थेच्या अध्यापक विद्यालयामधून प्रशिक्षण घेतलेले छात्र शिक्षक महाराष्ट्र राज्याच्या विवध शाळांमधून कार्यरत असून आपल्या संस्थेचा नावलौकिक वाढवत आहेत. याशिवाय काही विद्यार्थी एम.पी.एस.सी /यू.पी.एस.सी परीक्षा उत्तीर्ण असून वर्ग-१, वर्ग-२ पदावर कार्यरत आहेत.




## द. ह. कवठेकर प्रशाला, पंढरपूर

पंढरपूर शहराचा वाढता विस्तार लक्षात घेऊन, संचालक मंडळाने दूरदृष्टीकोन ठेवून आणि उपनगरातील विद्यार्थ्यांची सोय व्हावी म्हणून स्टेशन रोड परिसरामध्ये द. ह. कवठेकर प्रशालेची स्थापना करुन त्या भागातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय केली. शासनाने त्यास नवीन हायस्कूलची मान्यता दिल्यानंतर कै. गो. दि. भाळवणकर सर हे पहिले मुख्याध्यापक झाले. आज या माध्यमिक प्रशालेमध्ये इयत्ता पाचवी ते दहावीचे सुमारे ३१ वर्ग असून १५४२ विद्यार्थी तेथे शिक्षण घेत आहे.

## आदर्श बाल व प्राथमिक मंदिर, पंढरपूर

१९८६ पासून संस्थेने पूर्व प्राथमिक वर्ग सुरु केले आणि क्रमाक्रमाने इयत्ता एक ते चार चे वर्ग सुरु झाले. शासनाने या शाळेला १९८९ साली परवानगी दिली. आज या शाखेत सुमारे १५०० च्या वर विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्राथमिक विभागाचे विशेष वेगळेपण म्हणजे या ठिकाणी अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षिकाच आहेत. काही वर्षापासून शिशुविहार पण सुरु झाले आहे.

## पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल, पंढरपूर

पालकांमधील इंग्रजी विषयाची आवड त्याचे वाढत जाणारे महत्त्व हे संस्थाचालकाच्या लक्षात आल्यामुळे संस्थेने सन २००३ च्या सुमारास द. ह. कवठेकर प्रशालेच्या इमारतीत, इंग्लिश मीडियम स्कूलची सुरुवात केली. पाच संस्थापक सदस्यांच्या स्मृती चिरंतन रहाव्यात यासाठी त्याला पंचरत्न असे नाव दिले. आज या प्रशालेत नर्सरी ते इयत्ता दहावी पर्यंत जवळपास ४०० मुले तेथे इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेत आहेत. खूप कमी खर्चामध्ये पालकांना आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याची सोय संस्थेने उपलब्ध करुन दिली आहे.

## पंचम संगीत विद्यालय

विद्यार्थ्यांच्या संगीताविषयी व सांस्कृतिक कलागुणांना वाव देण्यासाठी संस्थेचे सचिव श्री. सुधीर पटवर्धन सर यांच्या संकल्पनेतून पंचम संगीत विद्यालयाची स्थापना चैत्रशुद्ध प्रतिपदा गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर दिनांक २२ मार्च २०२३ रोजी करण्यात आली ज्या पाच ऋषितुल्य व्यक्तींनी पंढरपूर एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली त्यांचे स्मरण म्हणून आणि संगीतामधील एक महत्त्वाचा स्वर म्हणून 'पंचम' असे नामकरण करण्यात आले. शालेय विद्यार्थी आणि संगीत या दोघांची उत्तम प्रकारे सांगड घालून या विद्यार्थ्यांची आवड जपणाऱ्यांसाठी संगीत विषयाचे एक परिपूर्ण व्यासपीठ म्हणून पंचम संगीत विद्यालयाची स्थापना करण्यात आली. सर्वांसाठी संगीत शिक्षण हे ध्येय घेऊन सर्वांसाठी पंचम संगीत विद्यालय सध्या कार्य करीत आहे. यामध्ये जे प्रशिक्षण विभाग आहेत यामध्ये १) शास्त्रीय संगीत विभाग २) सुगम संगीत विभाग शास्त्रीय संगीत विभागामध्ये १) शास्त्रीय गायन २) तबलावादन ३) हार्मोनियम वादन ४) भरतनाट्यम असे विविध विषय अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ पंढरपूर मुंबई यांनी ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमा प्रमाणे अत्यंत उत्तम प्रकारे घेतले जातात. प्रतिवर्षी गांधर्व महाविद्यालय मार्फत नोव्हेंबर- डिसेंबर आणि एप्रिल - मे या सत्रांमध्ये ही परीक्षा आयोजित करून विद्यार्थ्यांकडून अत्यल्प शुल्कात व परिपूर्णतेने अभ्यासक्रम पूर्ण करून घेऊन परीक्षेला बसता येते. कवठेकर प्रशाला नाथ चौक पंढरपूर हे गेली वीस वर्ष गांधर्व महाविद्यालयाचे एक आदर्श असे परीक्षा केंद्र म्हणून याचा नाव लौकिक आहे. पंचम संगीत विद्यालयामध्ये प्रारंभिक पासून ते अलंकार पूर्ण या परीक्षांसाठींचा अभ्यासक्रम शिकवला जातो.

## तमसो मा ज्योतिर्गमय!!

हे ब्रीदवाक्य घेऊन संस्थेच्या या वाटचालीला ७५ पेक्षाही अधिक वर्ष पूर्ण झाली आहेत. भारतीय संस्कृती आणि राष्ट्रहित यांचे पालन आणि जतन ही संस्थेच्या विद्यार्थ्यांची प्राथमिकता असेल. संस्थेचे विद्यार्थी राष्ट्रप्रेमी, संस्कारी आणि तंत्रस्नेही आहेतच आणि पुढेही राहतील. यापुढेही आपले निरंतर आशिर्वाद संस्थेस लाभावेत हीच श्री रुक्मिणी-पांडुरंगचरणी प्रार्थना.












## आमची ठळक वैशिष्ट्ये

● इयत्ता दहावीच्या निकालाची चढती कमान. ● बोर्डाच्या गुणवत्ता यादी मध्ये पंढरपूर शहरांमधील सर्वाधिक विद्यार्थी. ● शंभर टक्के गुण मिळवणारे विद्यार्थी. ● अनेक विद्यार्थ्यांना गणित, संस्कृत आणि विज्ञान विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण. ● महाराष्ट्र राज्यमाध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळ, पुणे यांचे कडून राज्यस्तरावर पारितोषिक मिळवणारे विद्यार्थी. ● संस्थेमधील बहुसंख्य शिक्षक एस सी आर टी च्या विविध समित्यांवर आला आला पाहिजे कार्यरत. ● संस्थेमधील बहुसंख्य शिक्षक हे पुणे बोर्ड यांचेकडे परीक्षक, नियामक आणि मुख्य नियामक म्हणून कार्यरत. ● काही शिक्षकांचे बालभारती आणि इतर सरकारी शालेय पुस्तक निर्मितीमध्ये योगदान. ● राज्यस्तरावर आणि जिल्हास्तरावर विविध विषयांचे शिक्षक तज्ञ मार्गदर्शक म्हणून कार्यरत. ● पुणे विभागातील इयत्ता दहावीचे कॉपीमुक्त आणि उत्कृष्ट परीक्षा केंद्र म्हणून नावलौकिक, ● संस्थेतील सर्व शिक्षक तंत्रस्नेही असून कोरोना काळामध्ये जवळपास सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून ऑनलाईन तास घेतले. ● कित्येक शिक्षकांचे युट्युब चॅनेल आजही कार्यरत. ● क्रीडा क्षेत्रामधील संस्थेचा दबदबा आजही कायम. ● शहर, तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धांमध्ये संस्थेचे विद्यार्थी नेहमीच चमकतात. ● अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडल, मुंबई यांचे तालुक्यातील एकमेव यशस्वी परीक्षा केंद्र. ● या परीक्षांमधून यशस्वी झालेले विद्यार्थी आज महाराष्ट्रभर संगीत आणि नृत्याचे मार्गदर्शक म्हणून कार्यरत. ● नृत्य, नाट्य, सिनेमा आणि छोटा पडदा त्याचप्रमाणे आजकाल चर्चेत असणाऱ्या युट्युब चॅनेलच्या माध्यमातून विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्यरत. ● या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संस्थेतून पोषक वातावरण आणि उत्तम मार्गदर्शन. ● महाराष्ट्र राज्य कला संचालनालय, मुंबई यांचे कडून घेतल्या जाणाऱ्या चित्रकला परीक्षांचे परीक्षा केंद्र असून संस्था यातून महाराष्ट्राचे भावी चित्रकार घडविण्याचे काम संस्था करत आहे. ● इयत्ता दहावी पर्यंत असणाऱ्या केंद्र शासनाच्या तसेच महाराष्ट्र शासनाच्या विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये आमच्या विद्यार्थ्यांचा लक्षणीय सहभाग आणि नजरेत भरणारे यश हे आमचे वैशिष्ट्य. ● या स्पर्धा परीक्षांमध्ये नवोदय विद्यालय, एन.एम.एम.एस. परीक्षा, एम.टी.एस. परीक्षा, एन.टी.एस. परीक्षा, इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी घेतली जाणारी स्कॉलरशिप परीक्षा यांचा समावेश. ● टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांचे कडून घेतल्या जाणाऱ्या विविध इंग्रजी परीक्षांचे मार्गदर्शन आणि परीक्षा केंद्र आमच्या प्रशालेत. ● महाराष्ट्र हिंदी राष्ट्रभाषा सभा पुणे यांचे मार्फत हिंदी विषयाच्या घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षांचे मार्गदर्शन आणि परीक्षा केंद्र. ● संस्कृत विषयाच्या घेतल्या जाणाऱ्या परीक्षांचे मार्गदर्शन आणि परीक्षा केंद्र. ● आमचे विद्यार्थी आज सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, वैद्यकीय, न्याय, भारतीय सेना दल, संरक्षण, संशोधन, कृषी, बँकींग इत्यादी क्षेत्रात सर्वोच्च पदावर कार्यरत. ● प्रतिवर्षी सर्व शाखेत सामुहिक गीतमंच कार्यक्रम, उत्तम संस्कार, परंपरा व राष्ट्रभक्ती जोपासण्यासाठी भव्यदिव्य स्वरुपात विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन तसेच शारीरिक तंदूरुस्तीसाठी शारीरिक शिक्षण दिन अर्थात पीटी डे मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.

## संस्थेचे सन्माननीय सदस्य

- श्री. सुभाष त्रिंबक अभ्यंकर - मानद सचिव
- श्री. सुधीर रघुनाथ पटवर्धन - मानद सचिव
- श्री. नारायण बाळकृष्ण रत्नपारखी - सदस्य
- श्री. वामन गोपाळ भाळवणकर - सदस्य
- श्री. डॉ. अनिल यशवंत जोशी- सदस्य
- श्री. प्रशांत प्रभाकर परिचारक - सदस्य
- श्री. मुरलीधर गोपाळ भाळवणकर - सदस्य
- श्री. भारत अनंत बहिरट - सदस्य
- श्री. सुरेश रघुनाथ जोशी - सदस्य
- श्री. श्रीकांत त्रिंबक अभ्यंकर - सदस्य
- श्री. संजय कृष्णाजी कुलकर्णी - सदस्य
- श्री. शांताराम पांडुरंग कुलकर्णी - सदस्य
- श्री. प्रफुल्ल अनंत पाठक - सदस्य
- श्री. मिलिंद रविंद्र जोशी - सदस्य
- श्री. ऋषिकेश वासुदेव उत्पात - सदस्य
- श्री. श्रीनिवास सुधीर पटवर्धन - सदस्य
- श्री. ज्ञानेश्वर रामचंद्र कवठेकर - सदस्य
- श्री. अभिषेक प्रफुल्ल सातारकर - सदस्य



श्रीमती वीणाताई य. जोशी
विद्यमान चेअरमन



श्री. दत्तात्रय सुधाकर कवठेकर
विद्यमान अध्यक्ष




# स्तनपान आणि बाळाचे आरोग्य

**जन्मणाऱ्या प्रत्येक बाळाला वाढीसाठी मातेचे दूध अत्यंत आवश्यक असतं. बाळाच्या वाढीसाठी असणारी सर्व प्रकारची अन्नद्रव्य आणि पोषक घटक आईच्या दुधात असतात.जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, बाळ जन्माला आल्यानंतर एक तासापासूनच ते सहा महिन्यांपर्यंत आईच्या स्तनपानावर वाढले पाहिजे. ही नैसर्गिक बाब आहे. स्तनपान प्रत्येक बाळाचा जन्मसिद्ध हक्क आहे .निसर्गानं आईच्या दुधाची रचना इतक्या योग्य रितीने केली आहे की, आवश्यक सर्व अन्नघटक योग्य प्रमाणात त्यामध्ये असतात .जर बाळ कमी दिवसांचे जन्मले तर आईच्या दुधाचे घटक त्या अपूर्ण दिवसाच्या बाळाला योग्य प्रमाणात असतात. पूर्ण दिवसांच्या प्रसूतीनंतर येणाऱ्या दुधापेक्षा ते पचायला पण हलके असते.तसेच प्रथिनांचे प्रमाण हे जास्त असते .जेणेकरून, ते अपुऱ्या दिवसाच्या बाळाला वजन वाढवण्यास मदत होते .**

जागतिक आरोग्य संघटनेने १ ते ७ ऑगस्ट हा जागतिक स्तनपान सप्ताह म्हणून घोषित केला आहे. जेणेकरून स्तनपानाबद्दल लोकजागृती व्हावी . हा सप्ताह १९९० पासून साजरा केला जातो. स्तनपान हा आई आणि बाळाला जोडणारा एक महत्त्वाचा दुवा आहे. याची सुरुवात हॉस्पिटलमध्येच पहिल्या एक तासातच व्हायला हवी. यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने सांगितलेले निकष पूर्ण करणे गरजेचे आहे. अशा रुग्णालयांना बालकस्नेहीअसा सन्मान दर्जा प्राप्त होतो .

१. रुग्णालयातील बाळंतिणी स्तनपान करतात याची लेखी हमी.

२. रुग्णालयाच्या परिचारकांना स्तनपानाची माहिती व प्रशिक्षण दिले पाहिजे.

३. प्रत्येक बाळंतिणीला बाळंतपणानंतर एक तासाच्या आत बाळास स्तनपान देण्यास मदत करावी आणि प्रवृत्त करावे.

४. माता बालकाला योग्य पद्धतीने स्तनपान करते याची खात्री केली जावी.

५. आईच्या कुशीत जास्तीत जास्त वेळ बाळाला राहू द्यावे. ( रुमिंग इन).

६. बाळाला त्याच्या गरजेप्रमाणे पुरेसे दूध मिळाले पाहिजे ( feeding on demand).

७. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय बाळास स्तनपानाशिवाय दुसरे कुठलेही पेय अथवा औषधं दिली जाऊ नयेत.

८. पहिले सहा महिने बाळास फक्त त्याच्या आईचेच दूध मिळाले पाहिजे.बाहेरचे दूध किंवा दुग्धजन्य पदार्थ अजिबातच देऊ नयेत.

९. स्तनपान मदत गट तयार करून बाळंतिणीला नंतर त्यांचे मार्गदर्शन सतत मिळावे.




**स्तनपानामुळे बाळाला होणारे फायदे**




१. बालकाची रोगप्रतिकार शक्ती वाढते. मातेच्या दुधात बाळंतपणानंतर पहिला चीक म्हणजेच कोलेस्ट्रम बाळाची प्रतिकारशक्ती वाढवण्यास उपयुक्त ठरतो. त्यामुळे वारंवार सर्दी,खोकला, श्वसन विकार ,जुलाब, गॅस्ट्रो, न्यूमोनिया इत्यादी आजारांपासून होणारा धोका स्तनपानामुळे टळतो.

२. एलर्जी मुळे होणारे विकारही टळतात.

३. नवजात बालकांच्या बालमृत्यूचे प्रमाण ही घटते.

४. बाळांची बौद्धिक व शारीरिक वाढ चांगली होते

५. बाळाला जंतुरहित, पुरेसे पोषक असलेले आईचे दूध हे अमृतासमान आहे.

६. उपलब्ध आकडेवारीनुसार, स्तनपान दर सुधारल्याने दरवर्षी ८,२०,००० हून अधिक मुलांचे जीव वाचू शकतात.

७. आईच्या दुधात लोह, कॅल्शियम ,प्रथिने, मेद, मायक्रोन्यूट्रियंट्स यांचे प्रमाण योग्य असते जे बाळाच्या शारीरिक आणि मानसिक वाढीसाठी आवश्यक आहे.

**बाळाला स्तनपान दिल्याने मातेला होणारे फायदेही तितकेच महत्त्वाचे आहेत.**

१. आपल्या बाळास स्तनपान दिल्याने आईचा गर्भाशय पूर्वस्थितीस येतो. गर्भाशयाच्या आकुंचन प्रक्रियेस चालना मिळते.

२. स्तनपान दिल्याने मातेचा मेद कमी होतो व वजन घटते.

३. स्तनपानामुळे स्त्रियांची पुढील गर्भधारणा लांबण्यासही मदत होते.

४. संशोधन असे सांगते की काही प्रमाणात मधुमेह, रक्तदाब ,रक्तातील मेदाम्ले वाढणे , हृदय विकार होणे, स्तनांचा कर्करोग या शक्यता १९ ते २० टक्क्यांनी कमी होतात.अंदाजे ४.५ अब्ज लोकसंख्येला म्हणजे जगाच्या अर्ध्याहून अधिक लोकसंख्येला आवश्यक आरोग्य सेवांची पूर्ण व्याप्ती मिळत नाही, त्यामुळे अनेक महिलांना त्यांच्या बाळांना चांगल्या प्रकारे स्तनपान देण्यासाठी आवश्यक असलेला पाठिंबा मिळत नाही. यामध्ये एका महिलेच्या स्तनपानाच्या प्रवासात प्रशिक्षित, सहानुभूतीपूर्ण आणि आदरयुक्त आरोग्य सल्ला ,समुपदेशनाची उपलब्धता या गोष्टींचा समावेश करणं अत्यंत आवश्यक आहे. स्तनपान करणाऱ्या प्रत्येक स्त्रीने आपल्या बाळाला आपले दूध पुरेसे मिळून त्याचे चांगले पोषण व्हावे व ते निरोगी व्हावे म्हणून आपला आहार समतोल,सकस, पौष्टिक , सहज पचणारा असा राखणे आवश्यक आहे. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणत्याही औषधाचे सेवन करू नये. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय स्तनांवर बाहेरूनही कोणतही तेल, मलम, लेप लावू नये. तंबाखूचे सेवन, मद्यपान टाळावे, संतती प्रतिबंधक गोळ्या वैद्यकीय सल्ल्याशिवाय घेऊ नयेत. स्तनांमध्ये जास्त दूध साठवून ठेवू नये. स्तनपान देताना घाईने, गडबडीने देऊ नये.शांतपणे १५ ते २० मिनिटे वेळ काढून बाळाचे पोट भरून ते शांत होईपर्यंत त्याला स्तनपान द्यावे. बाळाच्या नाकावर दाब न पडेल अशा रितीने एका वेळेस एका स्तनावर पूर्ण पाजण्याचे कारण सुरुवातीच्या दुधात (फोर मिल्क) पाण्याचे प्रमाण जास्त असते व नंतरच्या दुधात (हाइंड मिल्क) स्निग्ध प्रथिनांचे प्रमाण जास्त असते. त्याने, बाळाची भूक भागते यानंतर बाळाला भूक असेल तर दुसऱ्या स्तनाचे दूध द्यावे.



डॉ. गौरी कहाते
स्त्री रोग व प्रसूती तज्ञ,
मेडिकल सब कमिटी मेंबर,
फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा
९९२३६ ४७६४८



दररोजच्या बाळाच्या स्तनपानाची गरज भागून त्याला पुरेसे स्तनपान मिळत आहे हे खालील लक्षणांवरून ओळखावे.

१. मूल दिवसातून सहा पेक्षा जास्त वेळा स्वच्छ लघवी करते.

२. बाळाच्या हालचाली व्यवस्थित असून ते तरतरीत दिसते.

३. त्याचे वजन प्रत्येक महिन्यात अर्धा किलो पेक्षा जास्त वाढते.

स्तनपान देण्यासाठी स्तनांचे आरोग्य प्रत्येक गरोदर स्त्रीने सांभाळले पाहिजेत.

स्तनाची स्वच्छता ठेवणे. जखम अथवा निपल क्रॅक्स, रिट्रॅक्टेड निपल्स असा काही त्रास वाटल्यास वैद्यकीय सल्ला घ्यावा. हल्ली शहरात बऱ्याच स्त्रिया नोकरी व कामधंदा यानिमित्ताने बाळंतपणानंतर लवकरच कामावर जातात. अजूनही अगदी मोजक्याच ठिकाणी किंवा मोठ्या शहरांमध्ये बाळांची आणि मातेची स्तनपान करण्यासाठी अनुकूल व्यवस्था तयार होऊ शकते पण , सर्व ठिकाणी नाही. अशा परिस्थितीत कामावर जाण्याआधी व घरी परतल्यानंतर स्तनपान द्यावेच. पण, घरी येईपर्यंतच्या मधल्या आठ ते नऊ तासात बाळाला घरीच अंगावरचे दूध तरी मिळावे .म्हणून, अशा स्त्रियांनी नोकरीवर जाण्याआधी घरीच प्रथम आपले हात पाण्याने स्वच्छ धुऊन मोठ्या तोंडाचे स्वच्छ रिकामे भांडे घेऊन, स्तनांमधील दूध त्या भांड्यात काढून भांडे नीट झाकून ठेवावे. नंतर त्यावर तारीख आणि वेळ लिहून ठेवावी. काढून ठेवलेलं दूध ४ तासात वापरायचं असेल तर ते रूम टेम्परेचरला ठेवलं तरी चांगलं राहतं. मध्ये बाळास भूक लागल्यानंतर स्वच्छ चमच्याने घरी ते दूध बाळास पाजता येते.ताजे काढलेले दूध रेफ्रिजरेटरच्या (मागे) थंड भागात ४ दिवसांपर्यंत साठवू शकता.वापरण्यापूर्वी, साठवलेले दूध सामान्य तापमानाला आणावे किंवा कोमट पाण्यात गरम करावे. जास्त गरम करणे टाळा.आईचं दूध साठवण्यासाठी पिशव्या मिळतात किंवा घट्ट झाकण्याचा काचेच्या बरणीतही आईचं दूध साठवता येतं. प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये दूध साठवू नका. त्यासाठी बीपीए फ्री कंटेनर वापरा. आईचं दूध फ्रिजच्या दारात साठवू नका. कारण फ्रिज उघडबंद केल्याने तिथलं तापमान सतत वरखाली होत असतं. प्रत्येक कंटेनरवर ते दूध कधी काढलेलं आहे हे स्पष्ट समजेल अशी चिठ्ठी लावा.आईचं दूध कधीही मायक्रोवेव्हमध्ये गरम करू नका. पिशवी / बाटली कोमट पाण्यात धरून ते कोमट करा. दुधातील स्निग्धांश वेगळे झाले असतील तर दूध नीट हलवून ते दुधात परत मिसळून घ्या. गोठवलेलं दूध एकदा रूम टेम्परेचरला आलं की ते २ तासाच्या आत वापरलं गेलं पाहिजे. ते पुन्हा गोठवून वापरू नका. आईचं दूध काढून ठेवल्याने ती जवळ नसतांनाही बाळाला आईचं दूध देता येऊ शकतं. त्याला वाढीच्या टप्प्यात या सकस आहारापासून वंचित रहावं लागत नाही. आता ह्युमन मिल्क बँक सारख्या सोयी पण मोठ्या शहरांमध्ये आहेत. तसेच एचआयव्ही बाधित मातांसाठी स्तनपान सुरक्षित करण्यासाठी, डॉक्टरांच्या सल्ल्याने एआरटी थेरपी घेणे आणि योग्य आहार योजनांचे पालन करणे आवश्यक आहे. आपल्या मनाचा आपल्या शरीरावर फार मोठा प्रभाव असतो.म्हणूनच, मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धींचे कारण, या उक्तीनुसार जर स्तनपान करणाऱ्या मातेने आहार, विहार, विचार याचा समतोल राखला तर तिचे आणि बाळाचे आरोग्यही उत्तम राहील.

---




# माळशिरस व पंढरपूरच्या अर्थकारणाला गती देणारा श्रीपूरचा कर्मयोगी कारखाना

**श्रीपूर (ता. माळशिरस) येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचा इतिहास पाहता राखेतून उडी घेवून स्वतःचे अस्तित्व सिद्ध करणाऱ्या फिनिक्स पक्षा प्रमाणे आहे. तो सूर्यासारखा तेजस्वी असून समृद्धी आणणारा म्हणून ओळखला जातो आज कर्मयोगी कारखान्याच्या प्रगती कडे पाहता म्हणूनच फिनिक्स पक्षाची आठवण येते . अर्थात ही किमया कारखानाचे संस्थापक कै . सुधाकरपंत परिचारक व त्यांच्या पश्चात कारखान्याची धुरा यशस्वी पणे सांभाळणारे अभ्यासू चेअरमन प्रशांतराव परिचारक त्यांना साथ देणारे उपाध्यक्ष कैलास खुळे सर्व संचालक मंडळ तर त्यांना तेवढ्याच तोला मोलाची साथ देत व्यवस्थापन कौशल्याच्या जोरावर कारखान्यास उत्युच्च शिखरावर नेणारे डॉ . यशवंत कुलकर्णी यांचे कडे जाते.**

अवसायानात निघलेला श्रीपूरचा दि. बृहन्महाराष्ट्र शुगर सि. हा खासगी कारखाना पंढरपूर तालुक्याचे लोकप्रीय माजी आ. कै. सुधाकरपंत परिचारक यांनी सन . १९८९ साली विकत घेवून तो पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या नावाने सहकारी तत्वावर चालू केला . केवळ १ हजार मे . टन. क्षमतेने चालून संपूर्ण गळीत हंगामा मध्ये लाख भर साखर पोती उत्पन्न करणारा कारखाना सुधाकरपंतांनी ताब्यात घेतल्यावर काटकसर, सचोटी व प्रामाणिकपण्याच्या जोरावर अल्यावधीत हा उद्योग यशोशिखरावर नेवून ठेवला .प्रथम सन १९९६ साली कारखान्याचे विस्तारीकरण करत अडीच हजार मे . टन गाळप क्षमता करणेत आली . याच काळात महराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यात पहिल्यांदा कन्डेन्सिंग रूट पद्धतीचा विज प्रकल्प उभा करून शासना कडून सहा कोट रुपयाचे उनुदान मिळवणारा एकमेव कारखाना ठरला. ऊसाचे वेळेत गाळप, सर्वाधिक साखर उतारा व जिल्हयात सर्वात जास्त दर देणारा म्हणून या कारखान्याने आपला दबदबा निर्माण केला. उत्तम व्यवस्थावना मुळे शेतकऱ्यांचा विश्वास संपादन झाला या मुळे दिवसें दिवस कार्यक्षेत्रात ऊसाची लागवड वाढू लागली. हे होत असताना कारखान्याचे संस्थापक व विद्यमान चेअरमन कै. सुधाकरपंत परिचारक यांचे २०२० मध्ये दुःखद निधन झाले ह्या घटनेने पांडुरंग परिवारावर मोठे संकट कोसळले परंतू त्यांच्याच आदर्श मानत व त्यांनी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करत माजी आ. प्रशांतराव परिचारक यांनी कारखान्याची धुरा समर्थपणे सांभाळत कारखाना उत्तम चालवला त्याचे परिणाम स्वरूप सातत्याने कारखान्यास विस्तारीकरण करणे अत्यावक्षक झाले.आज प्रतिदिन ८ ते ९ हजार मेट्रीक टन ऊसाचे गाळप करणेची क्षमता झाली आहे . हे करत असताना अर्थकारणाच्या बळकटी करणासाठी ४५ हजार लिटर प्रतिदिन क्षमता असणारी डिस्टलरी आज ९० हजार प्रतिदिन लिटर क्षमतेची करणेत आली. तर २४ मेगॅवॅट विद्युत प्रकल्पा सह सौर उर्जा प्रकल्प, सेंद्रीय खत निर्मिती प्रकल्प कार्यान्वित आहेत. अर्थात या कामी उपाध्यक्ष कैलास खुळे, सर्व संचालक, व्यवस्थापन अधिकारी , कामगार यांच्यातील समन्वय महत्वाचा ठरत आहे . कारखान्याने सातत्याने केलेल्या उत्तम कामगिरी बद्दल कारखान्याने देश व राष्ट्रीय पातळीवरील अर्धशतकाहून जास्त मानाचे पुरस्कार पटकावले आहेत. कारखान्याचे कार्यक्षेत्र पंढरपूर तालुका असल्याने या परिसरातून ऊस मोठ्या प्रमाणात येतो तर माळशिरस तालुक्यात कारखाना असल्याने याठीकाणचेही काही प्रमाणात शेतकरी सभासद आहेत तसेच शेकडो तरुणांच्या हाताला रोजगार मिळून अनेक कुटूंबाना रोजी रोटी देणारा उद्योग महत्वाचा दुवा आहे. एकूणच कर्मयोगी कारखान्या मुळे माळशिरस व पंढरपूर तालुक्याच्या विकास व अर्थकारणाला गती मिळत आहे. ही फार मोठी उपलब्धी आहे.



प्रकाश केसकर,
श्रीपूर
९८२२६५६३३९

---



# सोलापूर : प्रसिद्ध वैधकीय पर्यटन केंद्र

**जेव्हा एखादा रुग्ण उत्तम व कमी खर्चात उपचारासाठी दुसऱ्या गावी जातो, तेथे उपचारानंतर तो रुग्ण आणि त्यांच्यासोबत आलेली मंडळी गावी परत जाताना त्या गावातील पर्यटन स्थळांना भेट देतात व थोडी फार खरेदी करतात यालाच वैद्यकीय पर्यटन असे संबोधले जाते.**

सोलापूर म्हटलं की नजरेसमोर अनेक गोष्टी येतात त्यामध्ये सोलापूरची चादर, टॉवेल, नॅपकिन, अनेक साखर कारखाने, एक्स्पोर्ट दर्जाचे द्राक्षे, डाळींब, सिद्धेश्वर मंदिर, सोलापूरची शेंगा चटणी, हुरडा पार्टी, पक्ष्यांचं माहेरघर , स्मार्ट सिटी, विविध खाद्य संस्कृती व अलीकडील काही वर्षांमध्ये शेती या क्षेत्रात होणारी प्रचंड प्रगती याबरोबर आवर्जून लक्षात येणारी गोष्ट म्हणजे सोलापूर हे एक उत्तम वैद्यकीय पर्यटन केंद्र.

मी माझा अनुभव आपणासमोर मांडत आहे १९७५ पासून जसे मला कळते तसे आमच्या घरी आमचे अनेक नातेवाईक हे वैद्यकीय उपचार घेण्यासाठी कर्नाटकातून सोलापूरमध्ये आवर्जून येत आणि आमच्या घरी वास्तव्य करीत असत. अशीच काही परिस्थिती आमच्या घराच्या अवतीभवती असलेल्या अनेक लोकांच्या घरी पहावयास मिळायचे. जवळजवळ माझा मागील ४५ वर्षाचा अनुभव पाहता आजही अशा रुग्णांचा ओढा सोलापूरकडे असलेला पहावयास मिळतो आठवी इयत्तेत होतो तेव्हा सोलापुरातील वाडिया हॉस्पिटल, सिव्हिल हॉस्पिटल,अनेक प्रसिद्ध डॉक्टरांच्या नर्सिंग होममध्ये सोलापूरच्या आजूबाजूला असलेल्या अनेक जिल्ह्यातून तसेच लगतच्या राज्यातून अनेक रुग्ण उपचारासाठी सोलापूरला येत असत. आजही सोलापूरमध्ये अनेक जिल्ह्यातून व परराज्यातून रुग्ण उत्तम व कमी दरामध्ये उपचार मिळत असल्याने मोठ्या संख्येने येत असताना पाहतो. सोलापूर नजीकच्या महानगरात स्थायिक झालेले सोलापुरातील अनेक कुटुंबातील सदस्य हे वैद्यकीय उपचारासाठी परत सोलापुरात येतात. सोलापूर हे मागील अनेक दशकापासून एक उत्तम वैद्यकीय पर्यटन केंद्र असण्याची अनेक कारण आहेत त्यामध्ये प्रामुख्याने येथे असलेले वैद्यकीय क्षेत्रातील अनुभवी तज्ञ डॉक्टर्स, उत्तम व कमी दरामध्ये उपचार, उत्तम आधुनिक उपचार, अत्याधुनिक उपकरणांनी सज्ज असलेले नर्सिंग होम व मोठी रुग्णालय, उत्तम रुग्णसेवा, रुग्णांच्या आजाराच्या तपासणीसाठी असलेल्या उत्तम व अत्याधुनिक लॅबोरेटरीज, उत्तम पॅरामेडिकल स्टाफ, राहण्यासाठी वन स्टार ते फाईव्ह स्टार हॉटेल्स, सोलापूरच्या नजीक असलेले अनेक पर्यटन स्थळ समावेश होतो. वैद्यकीय पर्यटनाने इतर उद्योगधंद्यांना व व्यावसायिकांना लाभ होतो उदाहरणार्थ हॉटेल्स, लॉजेस, रेस्टॉरंट, लॉज, प्रवासी वाहने, पर्यटन केंद्रास आणि अनेक वस्तूंची खरेदीसाठी असलेली दुकाने वगैरे. सोलापूर हे शहर जवळच्या अनेक जिल्ह्यांना, महानगरांना, मराठवाडा, कर्नाटक राज्य व आंध्र प्रदेश यांना उत्तम रस्ते व रेल्वे जोडलेले असल्यामुळे त्याचा फायदा वैद्यकीय पर्यटनासाठी होत आहे.

मला सोलापूर मधील वैद्यकीय क्षेत्राबद्दल खूप अभिमान व आदर आहे. येथे असलेले वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत सर्व डॉक्टर्स, फिजोथेरपीस्ट,टेक्निशियन, पॅरामेडिकल स्टाफ, नर्सिंग स्टाफ,फार्मासिटिकल्स हे आपापल्या क्षेत्रात प्राविण्य मिळवलेले आहेत. सोलापुरातील अनेक तज्ञ डॉक्टर्स राज्यस्तरीयच नवे तर राट्रीयस्तरीय संघटनेवर उच्च पदावर कार्य करीत आहेत याचा सोलापुरातील प्रत्येक नागरिकासने अभिमान बाळगावे. सोलापुरात प्रामुख्याने ऑर्थोपेडिक सर्जरी, जॉईट रिप्लेसमेंट, आर्थ्रोस्कोपिक सर्जेरी, गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजी, प्लास्टिक सर्जरी, लॅप्रोस्कॉपिक सर्जरी, न्यूरोलॉजी, न्यूरोसर्जरी, किडनी प्रत्यारोपण, बालरोग शस्त्रक्रिया, कॅन्सर, फुफ्फुस रोगावरील तज्ज्ञ, वंध्यत्व उपचार, नेत्ररोग, युरोलॉजी, कार्डिओलॉजी, मानसोपचार, डेंटिस्ट, फिजिओथेरपिस्ट, आयुर्वेद तज्ज्ञ , होमिओपॅथी, आणि दंत चिकित्सा यावर अनेक अद्यावत नर्सिंग होम व रुग्णालयातून उत्कृष्ट कार्य होत आहे. सोलापुरात रुग्णाच्या रोगनिदानासाठी व उचारासाठी लागणारी आधुनिक उपकरणे उपलब्ध असून त्यामध्ये सिटी स्कॅन, एम.आर.आई.,लेसर थेरपी, आई.सी.यू.,व्हेंटीलेटर्स, लासिक उपकरणे वगैरे यांचा समावेश होतो.

माझा अनुभव असा आहे की रुग्णांना सोलापूर मधील मिळणारी रुग्णसेवा ही उत्तम दर्जाची मिळतेच त्याचबरोबर ती इतर महानगरापेक्षा कमी खर्चिक असते. सोलापूरमधील सर्व वैद्यकीय तज्ञ मंडळी हे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांबरोबर सुसंवाद करण्यासाठी योग्य तो वेळ दिला जातो यामुळे डॉक्टर व रुग्ण यांचं एक घनिष्ठ नातं निर्माण होतं. त्यामुळे रुग्ण व रुग्णाचे नातेवाईक यांचं समाधान होतं. सोलापुरात अनेक अत्याधुनिक शस्त्रक्रिया उपचार हे महानगराच्या मानाने अल्प दरात केल्या जातात. उदाहरणे देण्यासारखे अनेक उपचार क्रिया किंवा शस्त्रक्रिया यांचा उल्लेख करता येईल पण मी काही शस्त्रक्रिया यावर काही गोष्टी आपणास सोबत सामायिक करीत आहे. गुडघ्याचे सांधारोपण या शस्त्रक्रियेसाठी भारतातील महानगरामध्ये येणारा खर्च हा तीन लाखांमध्ये जातो पण हीच शस्त्रक्रिया सोलापुरात दीड ते दोन लाखांमध्ये केली जाते. मणक्याच्या आजारासाठी स्पायनल फ्युजन या शस्त्रक्रियेसाठी भारतातील महानगरामध्ये याचा खर्च तीन ते साडेतीन लाख पर्यंत जातो पण हीच शस्त्रक्रिया सोलापूरमध्ये दीड ते दोन लाखांमध्ये केली जाते. पित्ताशयातील खडे काढण्याच्या लॅप्रोस्कोपचे या शस्त्रक्रियेसाठी भारतातील महानगरामध्ये येणारा खर्च हा दोन ते अडीच लाखांमध्ये जातो पण हीच शस्त्रक्रिया सोलापुरात पंच्याहत्तर हजार रुपयात केली जाते. मागील दीड दोन वर्षांपूर्वी आलेल्या कोरोनाच्या महाभयंकर लाटेत सोलापूरच्या नजीक असलेल्या अनेक शहरातून तसेच महानगरातून व परराज्यातून मोठ्या प्रमाणात रुग्ण उपचारासाठी सोलापूरला प्राधान्य दिलेलं आढळत. मी अश्या बाहेरच्या शहरातून व महानगरातून सोलापुरात आलेल्या कोरोना रुग्णांना उपचारास अनेक रुग्णालयात ॲडमिट करण्यास मदत केली. मला सांगण्यास आनंद होतो कि हे रुग्ण बरे होऊन जाताना सोलापुरात मिळालेल्या उत्तम उपचार मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त करून येथील डॉक्टरांचे कौतुक केले. मागील चार-पाच वर्षात सोलापूरला जोडणारी सहा राज्य व राष्ट्रीय महामार्ग ही चार पदरी झाल्यामुळे रुग्णसेवा घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढलेली दिसते. त्यामध्ये प्रामुख्याने मागील ३-४ वर्षात मराठवाडा येथील अनेक रुग्ण सोलापूरला येत आहे. सोलापूर हे आंतराष्ट्रीय वैद्यकीय पर्यटन केंद्र बनण्यासाठी येथील विमानसेवा सुरु झाली आहे आणि नजीकच्या काळात सोलापूर हे महानगरांशी जोडली गेली तर वैद्यकीय पर्यटनला चालना मिळेल यात शंका नाही.

आपल्या सोलापूर हे उत्तम वैद्यकीय पर्यटन केंद्र असून याचा प्रत्येक सोलापूरकरांनी अभिमान बाळगावा. सोलापुरात मागील दहा-पंधरा वर्षांमध्ये अनेक अद्यावत उपकरणांनी सज्ज असलेले मोठी रुग्णालय उभी राहताना पहावयास मिळतात यामागील कारण असे आहे की सोलापूर व सोलापूरच्या लगतच्या अनेक शहर व राज्यातील रुग्णांचा सोलापुरातील रुग्णसेवेवरचा असलेला विश्वास.



- डॉ. व्यंकटेश मेतन
अस्थिरोगतज्ञ
९३७००८००९०





## गांधी ग्लोबल व्हिलेज

# एका शिक्षण संकुलाची यशस्वी वाटचाल




प्रा. डॉ. उमाकांत चनशेट्टी

अध्यक्ष ता. द. सोलापूर

९४२०४८८८७४


**महात्मा गांधीजींच्या डोळ्यासमोर जो भारत होता, तो सात-साडेसातलाख खेड्यात पसरलेला भारत होता. आपण ग्रामीण संस्कृतीचे वारसदार आहोत. आपल्या देशाची विशालता, लोकसंख्येची प्रचंडता, आपल्या देशाचे भौगोलिक स्थान व हवामान यामुळे ग्रामीण संस्कृती हीच आपली नियती आहे असे गांधीजींचे मत होते. पण या ग्रामीण संस्कृतीचा सारखा ऱ्हास चालूच आहे. हा ऱ्हास थांबवायचा असेल तर त्यांना शिक्षण व उद्योग या दोन्ही गोष्टी एकाच वेळी दिले पाहिजेत. एका बाजूस उपजीविकेस मदत करणारे व दुसऱ्या बाजूने मुलांच्या मनाचा विकास करून त्यांना स्वतंत्र लोकशाही समाजाचे नागरिक बनवणारे शिक्षण हीच भारताची खरी गरज आहे. हे महात्मा गांधीजींनी हेरले होते. जीवन, परंपरां नी गरजा यांचा सम्यक विचार करून 'नई तालीम' ची देणगी महात्मा गांधीजींनी भारताला दिली.**

महात्मा गांधी ग्लोबल व्हिलेज बोरामणीच्या परिसरातील मुले ही शेतकरी व शेतमजुरांच्या कुटुंबातील आहेत. निसर्गाच्या लहरीपणामुळे या भागातील अर्थव्यवस्था कोलमडली आहे. उदरनिर्वाहासाठी अनेक कुटुंबे शहराकडे धाव घेत आहेत. शेतात काम करणाऱ्यांची संख्या रोडावली आहे. या भागातील शिक्षित तरुणाला शेती श्रमाचे लाज वाटू लागल्याने तो शहरातल्या एखाद्या कंपनीत कमी पैशातील नोकरी करण्यात स्वतःला धन्य समजतो आहे. अशा एक ना अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. यावर एकच उपाय म्हणजे नई तालीम. महात्मा गांधीजींचे विचार व शिक्षण पद्धती रुजवण्यासाठी कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान च्या वतीने महात्मा गांधी ग्लोबल व्हिलेज या शिक्षण संकुलाची २०११ साली उभारणी केली गेली. या शिक्षण संस्थेत कृती द्वारे शिक्षण (डशरीपळपस लू ऊेळपस) देण्याचा प्रयत्न केला जातो. आज जवळपास ३० खेड्यातून साडेतीनशे विद्यार्थी दहावीपर्यंत शिक्षण घेतात तेही सीबीएसई या अभ्यासक्रमा वर आधारित. वास्तविक पाहता ग्रामीण भागामध्ये देखील क्षमता आहे. बुद्धिमत्ता आहे. परंतु केवळ परिस्थिती नसल्याने शहरांमध्ये जाऊन सीबीएसई सारखे दर्जेदार शिक्षण घेता येणे शक्य नव्हते म्हणून कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठानच्या वतीने अत्यंत माफक फी मध्ये दर्जेदार शिक्षण देण्याच्या हेतूने या संकुलाची उभारणी केली गेली. आज पावतो दहावीचे पाच तुकड्या बाहेर पडल्या. सांगायला अभिमान वाटतो की कोणत्याही प्रकारचे कोचिंग क्लास किंवा प्रायव्हेट ट्युशन न लावता, घरात इंग्रजीचा गंधही नसलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांनी दहावीच्या सीबीएसई बोर्ड परीक्षेत ९०% पेक्षाही जास्त गुण घेऊन यशस्वी झाले आहेत.



महात्मा गांधीजींच्या नई तालीम संकल्पनेनुसार शिक्षण देताना एक हात मातीत तर दुसरा हात संगणकाच्या कीबोर्डवर ठेवून जगाशी स्पर्धा करण्याचे कौशल्य देखील या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

### अटल टिकरिंग लॅब-ख चे धडे

सीबीएसई बोर्डाच्या अभ्यासक्रमाबरोबरच या विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) चे धडे मिळावेत, कोडींग कशा प्रकारे केले जाते हे शिकवण्यासाठी प्रात्यक्षिक ज्ञान देण्यासाठी ऊेळपस आणि ींळषळलळरश्र खपींशश्रश्रळसशपलश हे अभ्यासक्रम देखील पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना दिले जाते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर या संगणकीय युगामध्ये कशाप्रकारे करता येईल याची अनुभूती या ग्लोबल व्हिलेज मधील विद्यार्थी घेत असतात. त्याचबरोबर अटल इनोवेशन मिशन या केंद्र सरकारच्या योजनेतून या ठिकाणी अटल टिंकरिंग लॅब ची उभारणी केली गेली आहे. या अटल टिंकरिंग लॅब मध्ये मुलांना रोबोटिक्स आणि इतर इलेक्ट्रॉनिक डिव्हायसेस ची निर्मिती कशाप्रकारे केली जाते याचेही धडे दिले जातात. आज ग्रामीण भागातील हे विद्यार्थी थ्रीडी प्रिंटिंग, ऑर्डीनो ब्लूटूथ कंट्रोल डिव्हायसेस, ऑर्डीनो युनो अशा नानाविविध आधुनिक सामग्रीचा वापर करून रोबोटिक्स सारखे उपकरण या अटल टिंकरिंग लॅब मध्ये बनवतात. एवढेच नव्हे तर थ्रीडी प्रिंटिंग च्या माध्यमातून ींळपज्ञशीलरव या सॉफ्टवेअरमध्ये प्रत्यक्ष डिझाईन करून बनवलेल्या सुबक अशा वस्तूंची विक्री ही करतात.

महात्मा गांधीजींच्या नई तालीम संकल्पनेनुसार त्यांना शेतीपूरक उद्योगधंदे कसे करावे? शेतीमालावर प्रक्रिया कशी करावी? याचे देखील शिक्षण दिले जाते. वेगवेगळ्या वस्तूंची निर्मिती विद्यार्थी स्वतः करतात ज्यामध्ये गुलकंद, मोरावळा, उटणे, साबण, फीनेल, परफ्युम, नॅपकिन बुके, पायपुसणी असे अनेक वस्तू तयार करण्याचे कौशल्य या नई तालीमच्या माध्यमातून देण्यात येते. जेणेकरून शिक्षण आणि उद्योग हे एकाच वेळेला देण्याचा प्रयत्न या शाळेतून केला जातो. नई तालीम म्हणजे तरी काय?

### कर्मातून ज्ञान, ज्ञानातून व्यवहार आणि

व्यवहारातून जीवन शिक्षण꙳ फक्त पुस्तकी ज्ञान देण्यापेक्षा त्यांच्या हातात कौशल्य निर्माण करून स्वावलंबी जीवन जगण्यासाठी उपयुक्त असे ज्ञान या ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुलामध्ये देण्याचा प्रयत्न केला जातो. येथील शिक्षक उच्च विद्या विभूषित तर आहेतच, शिवाय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या पातळीवर उतरून त्यांना समजावून सांगून कृतियुक्त शिक्षण देतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या संकल्पना दृढ होतात आणि विद्यार्थी ही समजून घेऊन अभ्यास केल्यामुळे ते सीबीएसई सारख्या बोर्ड परीक्षा उत्तम गुणांनी यशस्वी होऊन उच्च शिक्षणासाठी झेप घेतात.

### कनिष्ठ महाविद्यालयाची सुरुवात


बोरामणी परिसरात फक्त कला व वाणिज्य शाखेची सोय होती. शास्त्र शाखा नसल्याने गैरसोय होत होती. या भागातील गरज ओळखून २०१४ साली शास्त्र कनिष्ठ महाविद्यालयाची सुरुवात करण्यात आली. कृषी शास्त्र हा विषय अभ्यासक्रमात ठेवून मुलांची नाळ जी मातीशी जोडलेली आहे ती अधिक घट्ट करण्याचा प्रयत्न केला गेला. या ग्लोबल व्हिलेज कनिष्ठ महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी आज वैद्यकीय शिक्षण घेऊन डॉक्टर्स झालेले आहेत.

### ग्लोबल व्हिलेज वरिष्ठ महाविद्यालयाची सुरुवात

बोरामणी येथे वरिष्ठ महाविद्यालय नव्हते. आजूबाजूच्या काही गावांमध्ये कनिष्ठ महाविद्यालय असल्याने या भागातील मुलींना बारावीपर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध होत होती. बारावीनंतर शहरात जाणे परवडत नसल्याने किंवा पालकांनी शहरात शिकण्यासाठी पाठवण्यापेक्षा त्यांचे हात लवकर पिवळे करून देऊन मुलींच्या शिकण्याला विराम देत होते. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठानच्या वतीने बारावीनंतरच्या शिक्षणाची सोय याच भागात करून देण्यासाठी म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी संलग्न असे कला, विज्ञान व वाणिज्य या तिन्ही शाखांचे वरिष्ठ महाविद्यालय २०२१ पासून सुरू केले. आज या महाविद्यालयात जवळपास ४३५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

### बी सी ए अभ्यासक्रमाची सुरुवात

आजचे युग हे संगणकाचे युग आहे. जर या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणकाचे अत्याधुनिक कौशल्य प्राप्त झाले तर या संगणकाच्या युगामध्ये ग्रामीण विद्यार्थी निश्चितच प्रगती करेल या हेतूने २०२४ पासून या ठिकाणी बीसीए अभ्यासक्रमाची मान्यता खउढए कडून मिळवली




आणि कंप्यूटर क्षेत्रात ग्रामीण भागातील विद्यार्थी कसे पुढे जातील यासाठी सुरुवात करण्यात आली. या अभ्यासक्रमात त्यांना फक्त अभ्यासक्रमातील पारंपारिक ज्ञान न देता आज नेमके या संगणकीय क्षेत्रात कोणत्या प्रकारच्या मनुष्यबळाची आवश्यकता आहे त्याची गरज ओळखून काही नामांकित आयटी कंपन्यांशी करार करून त्यांचे प्रोजेक्ट ही शिकत असतानाच हे विद्यार्थी या प्रोजेक्टवर काम करत आहेत.

या बोरामणीच्या माळरानावर बारा एकरच्या परिसरात हिरवीगार वनराईत नटलेल्या उत्तम शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठानने केलेली आहे.

### बा-बापू कुटी

या शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना महात्मा गांधींचे विचार, महात्मा गांधीजींचे जीवन याची माहिती व्हावी म्हणून या ठिकाणी बा - बापू कुटीची देखील निर्मिती केलेली आहे. या बापू कुटीत महात्मा गांधीजींच्या जन्म ापासून ते अंतापर्यंतचे चित्र प्रदर्शनी आहे. शिवाय आज व्हाट्सअप च्या माध्यमातून महात्मा गांधीजींच्या बद्दल जी चुकीची माहिती प्रसारित होत आहे, त्यांच्याबद्दल जे गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो आहे, हे गैरसमज दूर व्हावेत यासाठी वस्तुस्थिती दर्शवणारे लेखही फलकाच्या माध्यमातून या बापूकुटीच्या भिंतीवर ते लावण्यात आलेले आहेत. गांधी विचार हा आपल्याला उत्कृष्ट जीवन जगण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे, असा विचार विद्यार्थी बालवयातच आत्म सात करावे यासाठी हा प्रयत्न आहे. जे जे शहरात मिळते ते ते या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळावे किंबहुना त्याहीपेक्षा अधिक देण्याचा प्रयत्न या प्रतिष्ठानच्या म ाध्यमातून या ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुलामध्ये केला जातो. आपणही वेळ काढून एकदा या संकुलाला भेट देऊन येथील शिक्षण पद्धती समजून घ्यावे. ग्रामीण विद्यार्थ्यांशी संवाद साधावा. जेणेकरून आपल्यालाही आपल्या पाल्याचा विकास कशा पद्धतीने करावा याची अनुभूती घेऊ शकाल असे वाटते.

---

# सोलापूर : उत्तम पक्षी पर्यटन केंद्र




- डॉ. व्यंकटेश मेतन

वाईल्डलाइफ फोटोग्राफर

९३७००८००९०


**मी मागील २७ वर्ष पक्षी निरीक्षण करत असून त्यांनी वन्यजीवन आणि निसर्गाचा अभ्यास करीत आहेत. मी आजपर्यंत भारतातील ६०% जंगलाना भेट दिली असून आफ्रिकेतील मलावि, झिम्बाब्वे, केनिया, भूतान या देशातील तसेच इक्वेडोर, उत्तर अमेरिकामधील ॲमेझॉन जंगलाची अद्भुत सफारी यशस्वीरीत्या पार केल्या आहेत. मी भारतातील एकूण १३६९ पक्षी प्रजातीपैकी १००० पक्ष्यांचे निरीक्षण करून त्यांच्या नोंदी आणि छायाचित्रे काढली आहेत. माझ्या आजपर्यंतच्या अनुभवातून मला आपल्या सोलापूरमधील पक्ष्यांचे वैभव ठळकपणे दिसून येते आणि याचा मला अभिमान आहे.**

सोलापूर हे शहर अनेक कारणांनी ओळखला जातो. मागील काही वर्ष्यांपासून सोलापूरला पक्षी पर्यटन केंद्र अशी नवी ओळख मिळत आहे. सोलापूर जिल्ह्यातील फक्त २% एवढाच भूप्रदेश जंगलाने व्यापलेला आहे (वास्तविक तो ३०% ने व्यापला असावा). सोलापूर जिल्ह्यामद्धे वर्षभरात २७० हुन जास्त पक्ष्यांच्या प्रज्यातीं आढळतात. भारतातील २२% पक्ष्यांच्या प्रज्यातींचे सोलापुरात आढळतात. दर हिवाळ्यामद्धे परदेशातून

मोठ्याप्रमाणात परदेशी पक्षी येथे स्थलांतर करतात. मागील काही वर्षांपासून भारतातील अनेक पक्षीप्रेमी आणि वाईल्डलाईफ फोटोग्राफर सोलापूरला भेट देत आहेत. दिवसेंदिवस येथे येणाऱ्यांच्या संख्येत वृद्धी होत आहे.यामुळे सोलापूर हे पक्षी पर्यटनाच्या दिशेने वाटचाल करत आहे.




सोलापूर हा वन्यजीवनदृष्ट्या अत्यंत समृद्ध असून येथे अनेक दुमिळ पाणपक्षी, माळरानावरील पक्षी तसेच झुडपातील पक्षी पहावयास आढळतात. सोलापूर शहरात, शहराच्याजवळ आणि जिल्ह्यात पक्षिनिरीक्षणासाठी उत्तम स्थळे आहेत. त्यामध्ये शहरात कंबर तलाव, स्मृती वन विहार, सिद्धेश्वर वनविहार, होटगी तलाव, शहराजवळ हिप्परगा तलाव, नान्नज, बोरगाव, हिरज, कुरनूर धरण, यमाई तलाव, बोरामणी पाझर तलाव तसेच जिल्ह्यामध्ये पंढरपूर, अकलूज, माळिशरस, करमाळा, अक्कलकोट, पिलीव या तालुक्याचा समावेश होतो. काही महिन्यापूर्वी बोरामणी येथील गवताळ प्रदेशात महाराष्ट्र शासनाने सफारी सुरु केली आहे. सोलापूरमध्ये आढळणाऱ्या काही महत्वाच्या आणि दुमिळ पक्ष्यामद्धे तिरंदाज, सम ुद्री बगळा, पांढरा करकोचा, रोहित, कलहंस, चक्रवाक, मर्लिन बदक, चतुरंग बदक, तलवार बदक, मोठी लालातरी, आखूड बोटाचा सर्पगरुड, पांढुरका भोवंत्या, लाल डोक्याचा ससाणा, सामान्य क्रौन्च, माळढोक, कास्य पंखी कमळपक्षी, भारतीय धाविक, कंठेरी अर्ली, काळ्या डोकंच कुरव वैगरे पक्ष्यांचा समावेश होतो. एक उत्तम पक्षी पर्यटनासाठी लागणारे महत्त्वाचे स्तंभ म्हणजे सोलापूरला पोहोचण्यासाठी उत्तम महामार्ग व रेल्वेमार्ग वाहतूक,राहण्याची उत्तम सोय,सोलापूर शैलीचे जेवण, पर्यटन संबंधीचे कार्यालय, ट्रॅव्हल एजंट्स, इतर पर्यटन आकर्षणे, करमणूक व प्रवासीसाठी लागणाऱ्या सर्व सोयी उपलब्ध आहेत. या सर्व गोष्टीचा विचार करता सोलापूर हे भारतातील एक उत्तम पक्षी पर्यटन केंद्र बनू शकते. सोलापूर पक्षी पर्यटन केंद्र होण्यासाठी पुढील गोष्टी करणे आवश्यक आहे.

जिल्ह्यामध्ये सोलापूर शहराच्या आजूबाजूला सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये असलेले तलाव गवताळ प्रदेश माळरान छोटी जंगले तसेच यांचे संगोपन आणि संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी महाराष्ट्र सरकार, वनविभाग, वन विभागातील अधिकारी, कर्मचारी, सोलापुरातील सर्व नागरिकांची आणि सामाजिक सेवा करणाऱ्या संस्थेची एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे.सोलापुरात योग्य ठिकाणी पक्षी निरीक्षण आणि छायाचित्रे काढण्यासाठी लपणग्रह बांधली पाहिजेत. सोलापूर पक्षी पर्यटन केंद्र झाल्यास आपल्या सोलापूर मधील असलेल्या पक्ष्याच्या वास्तवाची सर्व ठिकाणे संरक्षित करण्यास मदत होईल. मागील ५ वर्षात वातावरणाचा समतोल बिघडलेला आहे याम ुळेच मागील काही वर्षात परदेशातून येणाऱ्या पक्षांचे प्रमाण कमी झाले आहे. 'निसर्गाचा नाश म्हणजे मानव जातीचे नाश.' हे मानवांना माहित असूनही त्याकडे संवेदनशीलपणे न पाहता हेतुपुरस्सर दुर्लक्ष्य करीत आहे हि मोठी शोकांतिका आहे. चला तर प्रत्येकाने थोडासा हातभार लावू या. 'जस आपल्याला स्वतःच्या घराबद्दल प्रेम असते त्याच भावनेने आपण प्रत्येक पक्षी आणि प्राण्यांची नैसर्गिक वसाहती सुरक्षित ठेऊ या.



### पक्षी निरीक्षण करताना घ्यावयाची काळजी

काही पक्षी ठराविक मोसमातच दिसतात त्यामुळे पक्षीनिरीक्षणासाठी योग्य मौसम आणि दिवस ठरविणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. पक्षीनिरीक्षणासाठी सकाळी सूर्योदयापासूनचे दोन-तीन तास आणि सूर्यास्ताच्या अगोदरचे दोन-तीन तास हि उत्तम वेळ असते. पक्षीनिरीक्षणासाठी आपल्या अवतीभोवतीच्या भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास असावा लागतो. पक्षीनिरीक्षणासाठी निघताना आपल्यासोबत एक उत्तम प्रतीचा बायना कुलर, छायाचित्रे काढायची असल्यास उत्तम प्रतीचा कॅमेरा, पक्षांची माहिती असलेली छोटी पुस्तके, निसर्गाशी समरूप होणारा पोशाख असावा. पक्षी निरीक्षण करताना पक्षी आणि आपल्यामध्ये योग्य ते अंतर ठेवूनच करावात, छायाचित्रे काढताना पक्षांच्या अगदी जवळ जाणे टाळावे, पक्ष्यांना कोणत्याही प्रकारचा धोका / भीती निर्माण होईल अशा हालचाली करू नयेत. आपल्या देशातील शिकार कायद्यांचे जाणून घ्या आणि त्यांचे पालन करा. पक्षी निरीक्षणानंतर आपण पाहिलेल्या पक्ष्याची नावे या ठिकाण याची वहीत लिहून नोंद करावी.

### पक्ष्यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याचे मार्ग

पक्ष्यांचे संवर्धन आणि संरक्षण करण्याचे काही ठराविक उत्तम असे मार्ग मी आपणासमोर मांडीत आहे. प्रत्येक नागरिकाने याचे पालन केले तर आपला निसर्ग समतोल राहील याची मला खात्री आहे.

जेंव्हा कीटक नियंत्रणासाठी रसायनांचा वापर केलेले धान्य उंदीर, कीटक, छोटे प्राणी,पक्षी खातात जेंव्हा ह्याची शिकार करणारे पक्षी त्यांना भक्ष म्हणून खातात त्या पक्ष्याच्या जीवास धोका होतो आणि अनेक वेळा ते मृत्युमुखी पडतात. यासाठी कीटकनाशकाचा उपयोग कमी होऊन नैसर्गिक कीटक नियंत्रणावरील उपायावर भार द्यावा. ह्यावर पूर्णपणे नियंत्रण आणण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी शेतीची तंत्रे बदलून सेंद्रीय शेती करून सेंद्रिय पिकांचे उत्पादन करावे.

आपल्या आसपासच्या वातावरण व जमिनीतील म ातीच्या कस यानुसार आणि तेथील पक्ष्याना लागणाऱ्या नैसर्गिक वनस्पती आणि फळझाडे मोट्या प्रमाणात लावावीत. आपण पक्ष्यांसाठी आपल्या घरावर किंवा अंगणात त्यांचे अन्न, पाणी आणि सुरक्षित जागी घरटी ठेवावीत.

आपण आपला रिकामा वेळ आपल्या नजीकच्या निसर्गात फेरफटका मारून पक्षी निरीक्षण करा आणि निसर्गाचा आनंद घ्या. आपल्या भागातील सर्व पक्षी तसेच धोकादायक प्रजातींचे संरक्षण करण्यासाठी संवर्धन गट / संस्था संवर्धनाच्या प्रयत्नांमध्ये सामील होऊन सक्रियपणे कार्य करा. एक निसर्गप्रेमी म्हणून मी आपणा सर्वांना नम्रपणे सांगतो की आपण आपल्या आजूबाजूला असलेल्या निसर्ग, जंगले आणि यातील वन्यजीवन याची माहिती आणि त्याचं महत्त्व जाणून घ्यावी.











एकही सुट्टी न घेणारी व अत्यंत अल्पावधीत नावारुपास आलेली एकमेव

## निलेश गायकवाड क्रिकेट अॅकॅडमी

मुख्य प्रशिक्षक - निलेश गायकवाड

- सहाय्यक प्रशिक्षक -

विष्णू गायकवाड, विनोद पाटील, आबीदअली शेख, राहुल म्हेत्रे, दीपक सुरवसे, शिरीष लोखंडे

अॅकॅडमीचे वैशिष्ट्ये

- सर्व खेळाडूंकडे वैयक्तिक लक्ष
- प्रत्येक आठवड्यात क्रिकेट सामने
- प्रत्येक खेळाडूस सामना खेळण्याची संधी
- सर्वात अल्प फी
- जिल्हा संघात प्रत्येक वर्षी पाच ते सहा खेळाडूंची निवड

स्थळ : रेल्वे मैदान, भैय्या चौक सोलापूर

वेळ : स. ७ ते ९.३० व ४ ते ६.३०

संपर्क मोबाईल नंबर ८९९९५५८७०४




## श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठान सोलापूर

संस्थेचे सदस्य-अभिजीत व्हनकळस, प्रकाश आळ्ळे, आकाश लखोटिया, दिनेश मंत्री, गणेश येळमेली, शामकुमार मुळे, रविशंकर जवळे, महेश ढेंगले, राजेश केकडे, केशव भैय्या, श्रीरंग रेगोटी, श्रीकृष्ण लड्डा, श्रीपाद सुत्रावे, सौरभ करकमकर, बसवराज परचंडे, नागेश गडगे, शंकर बिलागंडी, शुभम हंचाटे



दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनास

हार्दिक शुभेच्छा!

- शुभेच्छुक -

डॉ. उज्वल मलजी
सौ. आरती मलजी

क्रीडा शिक्षक

दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनास

हार्दिक शुभेच्छा!

## सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटना


डॉ. राजीव प्रधान
अध्यक्ष


झेड. एम. पुणेकर
सचिव

सोलापूर तरुण भारत

४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

४१ वा वर्धापन दिन...



मा.राजसाहेब ठाकरे
मनसे पक्षप्रमुख



मा.अमित ठाकरे
मनसे युवा नेते

मा.बाळा नांदगावकर
मनसे नेते

मा.दिलीप(बापू) धोत्रे
मनसे नेते

शुभेच्छुक

मा.प्रशांतराव गिड्डे
जिल्हा अध्यक्ष

मा.नारायण गोवे
जिल्हा समन्वयक

मा.चंद्रकांत पवार
जिल्हा उपाध्यक्ष

मा.धनाजीराव गडदे
तालुकाध्यक्ष

सौ.भारती चौगुले
महिला जिल्हाध्यक्ष

## महाराष्ट्र नवनिर्माण सेना

मंगळवेढा शहर व तालुका



रेन्शी संगीता सुरेश जाधव
सेन्सेई भुवनेश्वरी व
सेन्सेई मिहिर सुरेश जाधव

संचालक

## रुद्र अॅकॅडमी ऑफ मार्शल आर्टस व योग

आणि

## ट्रेडिशनल व स्पोर्ट्स कराटे असोसिएशन सोलापूर

यांचेतर्फे

दै. तरुण भारतच्या ४१ व्या वर्धापनदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

तरुण भारत

४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

गड्डायात्रेतील सुप्रसिध्द

१९६० पासून 'जोशी बंधूंचा'

भाग्यश्री

बेस्ट चिवडा

नवी पेठ, सोलापूर




दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास

हार्दिक शुभेच्छा!



## न्यु इरा पब्लिक स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज

शुभेच्छुक

चिखलठाण ता. करमाळा, जि. सोलापूर



दैनिक सोलापूर तरुण भारतच्या ४१ व्या वर्धापनदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

देशासाठी पदक मिळविण्याचा ध्यास

राष्ट्रीय धावपटू साईश्वर व श्रद्धा केशव गुंटूक

दैनिक सोलापूर
तरूण भारतच्या
वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा!

होनमुर्गी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची १०० टक्के कर्जवसुली झाल्याबद्दल सोसायटी चेअरमन सेक्रेटरी व सर्व संचालक मंडळ यांचे अभिनंदन!

चेअरमन



शुभेच्छुक

## संचालक मंडळ सोसायटी व ग्रामस्थ होनमुर्गी

मा. बसवराज हसापुरे

सोलापूर तरुण भारत

वर्धापनदिन

चिरायु होवो..!



## कार्तिक अॅटोमोबाईल्स

लांडगे वाईन शॉपच्या बाजूला, अक्कलकोट

प्रो.प्रा.किशोर लांडगे
Mo.9850743624

ए. जी. पाटील इन्स्टिट्युटस्तर्फे वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

SHANTI EDUCATION SOCIETY'S

## A.G. PATIL POLYTECHNIC INSTITUTE

("NBA" Accredited Programs)

| COURSES OFFERED IN DIPLOMA ENGINEERING | |
|---|---|
| Mechanical Engineering - 60 | E&TC Engineering - 60 |
| Computer Engineering - 60 | Civil Engineering - 60 |
| Electrical Engineering - 60 | |

डिप्लोमा प्रवेशाकरीता संपर्क : 8888813097 & 8888878725

SHANTI EDUCATION SOCIETY'S

## A.G. PATIL INSTITUTE OF TECHNOLOGY

("NAAC" Accredited)

| COURSES OFFERED IN DEGREE ENGINEERING (B.Tech) | |
|---|---|
| Mechanical Engineering - 60 | E&TC Engineering - 60 |
| Computer Engineering - 60 | Civil Engineering - 60 |

B.Tech. इंजिनिअरींग प्रवेशाकरीता संपर्क : 9604199680 & 9405548125

■ प्रथम व थेट द्वितीय वर्ष प्रवेश ■

Diploma व Degree : संस्थास्तर व कॅम्प राऊंडनंतर शिल्लक जागांवरील प्रवेश प्रवेशाचे वेळापत्रक व इतर तपशिलाकरीता खालील संकेतस्थळाला भेट द्यावे

**Diploma :** www.agppi.edu.in; **Degree :** www.agpit.edu.in

Dr. V. V. Potdar
Principal

Dr. M. A. Chougule
Campus Director

Shri. S. A. Patil
President



Near Saiful, Vijapur Road, Solapur - 413008.




# सह्याद्री फाऊंडेशनच्या माध्यमातून नेताजीभाऊंची जनसेवा!

## बोरामणी, उळे-कासेगाव पंचक्रोशीत वाढतोय लौकिक !





बोरामणी पंचक्रोशीतील बळीराजा, युवा वर्ग, महिला वर्ग, शालेय विद्यार्थी आणि कामगारांच्या कल्याणासाठी 'सह्याद्री फाऊंडेशन'च्या माध्यमातून कायम माझा काम प्रयत्न राहणार आहे. या पंचक्रोशीचा कायापालट करण्यासाठी जलसंधारण, पर्यावरण, शिक्षण, आरोग्य, क्रीडा, धार्मिक, सामाजिक विकास करणार असल्याचा दृढविश्वास सह्याद्री फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष, उळेचे उपसरपंच तथा भाजपाचे युवा नेते नेताजीभाऊ खंडागळे यांनी दैनिक तरूण भारतच्या विशेष मुलाखतीत व्यक्त केला. दरम्यान, स्थापत्य अभियंता असलेल्या नेताजीभाऊंनी अल्पावधीतच राजकारण अन् समाजकारणाची चांगलीच मोट बांधली असल्याचे त्यांच्या कार्यावरून दिसून येते.

**युवा नेते नेताजीभाऊ गंगाधर खंडागळे** (B.E.(Civil),LL.B.) हे सध्या दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळेगावचे उपसरपंच आहेत. यामुळे ग्रामीण भागातील जनतेच्या अपेक्षा, शेतकरी, शेतमजूर आणि कामगारांचे जनजीवन त्यांनी अगदी जवळून पाहिले आहे. ते अभियंते असल्याने त्यांना नोकरी करून पैसा मिळविता आला असता मात्र सामाजिक कार्य करता आले नसते. यामुळे त्यांनी गोरगरिब नागरीक आणि शेतकऱ्यांना मदतीचा हात कसा देता येतो? याचा अभ्यास करून ते राजकारण आणि समाजकार्यात उतरले आहेत. गरीब माणसांना केवळ शासनाच्या योजना कळत नसल्याने आणि त्यांना ग्रामीण भागात योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याने अनेक लाभार्थी नागरिक राज्य आणि केंद्र सरकारच्या योजनांपासून कोसोदूर असतात. ग्रामीण भागात घरकुल योजना, नळ पाणी पुरवठा, रस्तेविकास, दिवाबत्ती, पिकविमा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी मार्गदर्शन करणे अशा विविध कामांतून नेताजीभाऊ यांनी लोकप्रियता मिळविली आहे. त्यांनी जीवनाच्या वाटचालीत जी यशोशिखरे गाठली; त्यामध्ये अनेकांचा कळत नकळत हातभार लागला आहे. त्यांचा शैक्षणिक प्रवास सांगताना नेताजीभाऊ यांनी सांगितले की, प्रथमत: मी एक अल्पभूधारक शेतकरी ते यशस्वी बांधकाम अभियंता होण्याचा मान माझ्या आई वडिलांना आणि गुरूजनांना देतो कारण त्यांनीच माझी योग्य जडणघडण केली आणि योग्य असा मार्ग दाखविला. कारण त्यांनी दिलेली संस्कार अन् ज्ञानाची शिदोरी मला आयुष्यभर पुरणार आहे.



• अविनाश गायकवाड
वरिष्ठ उपसंपादक
९४२१८७६३४०



सह्याद्री फाऊंडेशन व नेताजीभाऊ खंडागळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करताना आमदार सचिन कल्याणशेट्टी व इतर मान्यवर.




जय हनुमान तालीम संघाच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरात आपल्या सवंगड्यांसोबत रक्तदान करताना नेताजीभाऊ खंडागळे.

### विद्यार्थी दशेपासूनच भाऊंना राजकीय आवड

शालेय जीवनापासूनच राजकारणाची आवड असलेल्या भाऊंनी महाविद्यालयातील विद्यार्थी संघटना तयार करून विद्यार्थी प्रतिनिधी पदाची जबाबदारी सांभाळली होती. यानंतर आता राजकीय प्रवासातही स्वत:च्या गावात ग्रा. पं. निवडणूक लढवून ती वन वे जिंकली आणि सत्तास्थापनही केली. आता उळेगाव, कासेगाव व बोरामणी पंचक्रोशीसाठी गोरगरिब आणि गरजुंना मदत करून समाज सुस्थितीत आणण्यासाठी प्रयत्न करण्याचा विडा नेताजीभाऊंनी उचलला आहे. गेल्या २० वर्षांपासून सह्याद्री फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक कार्य चालू केले आहे. याचा फायदा बोरामणी पंचक्रोशीतील नागरिकांना होत आहे.

### युवा वर्गासाठीही सह्याद्रीचे योगदान

तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकी वाढविण्यासाठी चर्चासत्रे, व्याख्यान, प्रदर्शन, युवक महोत्सवाचे आयोजन करतो. वाचन संस्कृती वाढवण्यासाठी पुस्तक भेट योजना,अभ्यासिका,ग्रंथालय चालवतो. समाजातील गरजुंसाठी रोगनिदान व उपचार यातून आरोग्य सेवा केली जाते. दरवर्षी क्रीडा स्पर्धा भरवल्या जातात. नवोदीत खेळाडूंना मार्गदर्शन केले जाते, गिर्यारोहण. दुर्ग किल्ले भ्रमंती सारख्या उपक्रमातून युवकांना प्रेरणादायी इतिहास व खरा भारत समजून घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

### राजकीय क्षेत्राला घातली समाजसेवेची सांगड

मी शाळा, आई-वडील अन् शिक्षकांसह समाजाला धन्यवाद देतो कारण त्यांनी मला घडवले. तर आता समाज घडवण्याची माझी जबाबदारी आहे. सह्याद्री फाउंडेशनच्या माध्यमातून समाजकार्य सुरु आहे. कृषी, जलसंधारण, पर्यावरण, शिक्षण, आरोग्य आणि क्रीडा क्षेत्रात काम सुरु आहे. हे सर्व शाळा, आई-वडील अन् शिक्षक यांच्यामुळे शक्य झाले. भविष्यातही ते समाजसेवाच करीत राहणार आहेत.

### २०० मतांच्या फरकाने आणले उळेगावचे पॅनल

मी प्रथमत: गावच्या राजकीय आखाड्यात उतरलो. या निवडणुकीत मी जीवाचं रान केले आणि १२ सदस्य असलेले पॅनल २०० मतांच्या फरकाने निवडून आणले आणि आमच्या पक्षाचाच सरपंच आणि उपसरपंच केला. सध्या नेताजीभाऊ भाजपामध्ये सक्रीय पदाधिकारी म्हणून काम करतात आणि या उळेगावात त्यांचीच सत्ता असल्याने जनहिताची अनेक कामे आता मार्गी लागत आहेत. भाजपा नेते आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून बोरामणी पंचक्रोशीतील सर्वसामान्य जनतेची विविध कामे करण्याचा त्यांनी सपाटा लावला आहे.



बोरामणी येथे कुस्तीस्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकाविलेल्या पैलवानाचा सत्कार करताना नेताजीभाऊ, रफिक पैलवान, सरपंच राज साळुंखे, राजू हळसगे.



उळेगाव, कासेगाव व बोरामणी पंचक्रोशीत नेताजीभाऊंनी वह्या वाटप केल्यानंतर विद्यार्थ्यांनी आनंद द्विगुणीत केला.



### वह्यावाटप कार्यक्रमांमुळे पालकांतून चैतन्याचे वातावरण

**दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळेगाव, कासेगाव आणि बोरामणी पंचक्रोशील वडजी, बक्षीहिप्परगे, मुळेगांव तांडा, मुळेगांव, दोड्डी, बोरामणी, वरळेगांव, तांदुळवाडी, पिंजारवाडी, मुस्ती, संगदरी, कासेगांव, गंगेवाडी, उळेवाडी, उळे या गावाची पहिली गाठीभेटीची फेरी पूर्ण झाली आहे. त्या गावच्या सर्व समस्याही जाणून घेतल्या आहेत. या समस्या सोडविण्यासाठी नेताजीभाऊंनी त्यांचा शब्दही दिला आहे. दरम्यान, या भागातील १५ गावे, १८ तांड्यावरील ४० शाळांतील विद्यार्थ्यांना ११ हजार वह्या वाटप केल्याने मात्र पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. तर आरोग्यविषयक शिबिरांचाही अनेकांना फायदा झाला.**

### मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदतीचा हात

नेताजीभाऊंनी बोरामणी पंचक्रोशीतील गरजू लोकांना, विशेषत: महिलांना अल्पदरात औषध उपचार उपलब्ध करणे तसेच चिकित्सा, रोगनिदानासाठी मार्गदर्शन शिबिरे घेतली. याचबरोबर रक्तदान शिबीर, आरोग्य शिबिराबरोबर नेत्र तपासणी शिबीरही घेतले. याचा फायदा सर्वसामान्यांना झाला. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून सर्वसामान्यांना मदतीचा हात देण्याचा प्रयत्न ते करीत आहेत.

### भावी पिढीच्या आरोग्यावरही भाऊंचे लक्ष

वेगवेगळ्या खेळांचे मार्गदर्शन करणे, स्पर्धा आयोजित करणे जेणेकरून तरुणांमध्ये सांघिक भावना, सहकार्याची भावना वाढेल. तसेच तरूणांची तंदुरूस्ती आणि आरोग्य चांगले राहील. जेणेकरून भविष्यात तरुणवर्ग व्यसनापासून दुर राहील, त्यामुळे अभ्यासात आणि खेळात लक्ष्य देईल. तसेच तरूणांना शिवाजी महाराजांच्या इतिहासाची माहिती होण्यासाठी आणि तंदुरूस्ती आणि साहस वाढवण्यासाठी विविध दुर्ग, किल्ले, भेटी देणे, गिर्यारोहण करणे, शिबिरे आयोजित करणे व काही पर्यटनस्थळांना भेटी देणे, असे उपक्रम ते राबवितात.



उळेगाव पंचक्रोषित वृक्षारोपण करताना जिल्हा पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, नेताजीभाऊ व पोलिस कर्मचारी.

### १४ गावच्या सिंचनाचे काम घेतले अजेंड्यावर

गेल्या अनेक वर्षांपासून बोरामणी पंचक्रोशीतील १४ गावच्या शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न प्रलंबित आहे. या भागाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली हा सिंचनाचा विषय आम्ही विकासकामांच्या अजेंड्यावर घेणार आहोत. हा सिंचनाचा प्रश्न मार्गी लागला तर भविष्यात या भागाचे सुजलाम्-सुफलाम् होईल. याचबरोबर पर्यावरणावरही आता आमचे काम चालू आहे.

### नेताजीभाऊंची तळागाळातील लोकांसाठी तळमळ

नेताजी भाऊंना शाळा-महाविद्यालय सुरू करणे, चालवणे, ग्रामीण भागात शिक्षण घेण्यासाठी पालकांना आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, प्रोत्साहन देणे, शिष्यवृत्ती देणे, ग्रामीण भागातून पुण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना राहण्यासाठी सोय करणे. तरुणांना प्रोत्साहन देणे, करिअर विषयक मार्गदर्शन करणे फार आवडते. समाजाप्रती जाणीव वाढवण्यासाठी चर्चासत्रे, व्याख्याने, युवक महोत्सव, आणि प्रदर्शनांचे आयोजन ते करतात. नेताजीभाऊंनी आजतागायत बोरामणी पंचक्रोशीत ११ हजार वह्यांचे वाटप केले आहे. तळागाळातील जनतेचे जीवन सुधारावे, ग्रामीण विद्यार्थी भरपूर शिकावेत, अशी त्यांची नेहमी तळमळ दिसून येते.

### सह्याद्रीद्वारे अशी होतात शेतकऱ्यांची कामे

जमिनीतील पाण्याची पातळी वाढवण्यासाठी छोटी तळी, बंधारे, नाला ओढे खोलीकरण, बांधबंदिस्ती, पाणी आढवणे जिरवणे, विहीर, बोरवेल पुनर्भरण करणे, सुक्ष्म सिंचन वापरणे, पाणी वाचवणे, त्यावर मार्गदर्शन आणि प्रबोधन करणे, जेणेकरून पिण्याचा आणि शेतीच्या पाण्याची गरज भागेल. याचा फायदा मोठ्या शेतकऱ्यांसह अल्पभूधारक शेतकऱ्यांनाही होतो.



शालेय विद्यार्थ्यांना सायकल वाटप करताना नेताजीभाऊ आणि ग्रामस्थ दिसत आहेत.



उळेगाव, कासेगाव व बोरामणी पंचक्रोषीतील विविध शाळातील विद्यार्थ्यांनी सीमेवरील सैनिकांसाठी तयार केलेल्या राख्या पाठविताना सह्याद्री फाऊंडेशनचे पदाधिकारी.




क्रीडास्पर्धेत नैपुण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करताना वरिष्ठ पोलिस निरीक्षक नामदेव शिंदे, नेताजीभाऊ आणि पोलिस कर्मचारी.




## उजनी जलाशयात तंत्रज्ञानाद्वारे पक्षीसंवेदन :

# एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचा अभिनव प्रयोग

**महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात वसलेलं उजनी जलाशय हे केवळ पाण्याचं स्रोत नाही, तर ते एक जिवंत जैवविविधतेचं दालन आहे. दरवर्षी हजारो स्थलांतरित आणि स्थानिक पक्ष्यांच्या आगमनाने हा परिसर चैतन्याने फुलून जातो. या विशाल जलाशय परिसरात हजारो पक्ष्यांनी आपली वसाहत केली आहे. त्यामुळे येथे दरवर्षी एक रंगीबेरंगी निसर्गमय उत्सवच असतो. त्यांना पाहण्यासाठी देशभरातून अनेक पर्यटक, पक्षीनिरीक्षक व अभ्यासक येथे आवर्जून भेट देतात आणि या जैवविविधतेने भारावून जातात. गुलाबी फ्लेमिंगो, बार-हेडेड गूझ, करकोचं, बदकं, बगळे आणि अनेक रंगीबेरंगी पक्ष्यांचा मुक्त संचार येथे एक नयनरम्य दृश्य उभं करतो. या पक्ष्यांच्या उपस्थितीने उजनी जलाशय हा एक जैवविविधतेचा 'स्वर्ग' म्हणून ओळखला जातो.**



या पक्ष्यांची अचूक मोजणी करणं मात्र आजही मोठं आव्हान आहे. जलाशयाचं क्षेत्र सुमारे ३५० चौ. कि.मी. एवढं असल्यामुळे पारंपरिक पद्धतीने पक्षीसंवेदन करणं हे खूप कष्टदायक, वेळखाऊ आणि तांत्रिक अडचणींनी भरलेलं काम आहे. अशा कठीण प्रसंगात एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाने



डॉ. स्तुती एन. आहुजा

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, सोलापूर

स्थानिक संस्था आणि शासन यांच्याशी सहकार्य करून एक अभिनव आणि युगानुकूल उपक्रम हाती घेतला आहे. हा उपक्रम पारंपरिक पद्धतींपेक्षा वेगळा आणि अधिक प्रभावी आहे, कारण यात आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केला गेला आहे. ड्रोनच्या साह्याने आकाशातून जलाशयातील पक्ष्यांच्या हालचाली टिपणे, डिजिटल कॅमेऱ्यांच्या माध्यमातून रंगीत, स्पष्ट हाय रिझोल्यूशनचे फोटो व व्हिडीओ घेणे आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (श्र) वापरून पक्षीमोजणीकरिता अचूक आकडे संचयित करून विश्लेषण करणे हा या प्रकल्पाचा मुलभूत उद्देश आहे. पारंपरिक मोजणीसाठी जिथे अनेक तास लागतात, तिथे आता या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने काही मिनिटांतच तंतोतंत माहिती मिळू लागली आहे. त्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया सुरक्षित, वेगवान आणि अधिक अचूक होणार आहे. या प्रकल्पाचे खरे वैशिष्ट्य म्हणजे विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग. चार महिन्यांच्या कालावधीत या विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून पक्षीसंवेदन मोहिमांमध्ये सहभागी होत पक्ष्यांच्या संवेदनशील जीवनशैलीचा अभ्यास आणि निसर्गाच्या अधिक जवळ जाण्याचा अनुभव घेतला. विद्यापीठाने शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न ठेवता, प्रत्यक्ष अनुभवातून कौशल्य विकसित करणे हीच या प्रकल्पाची खरी प्रेरणा आहे. हे कार्य केवळ शैक्षणिक उपक्रम न राहता, एक व्यापक सामाजिक जबाबदारी म्हणून साकारले जात आहे.





सामान्यतः विद्यापीठांमधील प्रकल्प हे केवळ अभ्यासक्रमापुरतेच मर्यादित राहतात. विद्यार्थ्यांनी तयार केलेले अनेक प्रकल्प कधीच वास्तवाशी भिडत नाहीत. परंतु जेव्हा हेच विद्यार्थी प्रत्यक्ष सामाजिक व निसर्गाशी निगडित सम स्यांवर काम करतात, तेव्हा शिक्षणाचा खरा अर्थ उलगडू लागतो. अशा प्रकल्पांमधून त्यांना संशोधन, डेटा संकलन, संघभावनेतील समन्वय, टीमवर्क आणि रिअल-टाइम अंम लबजावणी या सर्व गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव त्यांना मिळतो.



या उपक्रमामुळे शासनाच्या जैवविविधता संवर्धनाच्या प्रयत्नांनाही नवे बळ मिळालं आहे. हा प्रकल्प केवळ उजनीपुरता मर्यादित न राहता, भविष्यात महाराष्ट्रातील अन्य जलाशय, पक्षी अभयारण्ये आणि संवेदनशील परिसंस्थांमध्येही उपयुक्त ठरेल. शासन, संशोधक, स्थानिक नागरिक आणि शैक्षणिक संस्था, या सर्वांनी मिळून ही वैज्ञानिक-सामाजिक चळवळ पुढे नेण्याची आवश्यकता आहे. हा उपक्रम केवळ पक्षीगणनेपुरता मर्यादित नाही तर निसर्गप्रेम, विज्ञान आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर संगम आहे. विद्यापीठाच्या दृष्टिकोनातून पाहिलं तर हा उपक्रम अध्ययनाचा विषय न राहता, एक सजग व सवेंदनशील नागरिक घडवण्यासाठीची प्रक्रिया आहे आणि हेच एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे खरे बळ आहे.

# कार्यकारी संचालकपदाची यशस्वी तपपूर्ती

**कोणताही उद्योग यशस्वी होण्यासाठी व्यवस्थापन कौशल्य महत्वाचे असते. आज कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या प्रगती कडे पाहता प्रकर्षाने हे जाणवते. डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी पांडुरंग साखर कारखान्याची कार्यकारी संचालक म्हणून धुरा सांभाळून १२ वर्ष म्हणजे एक तप पूर्ण झाले.**



या कार्यकाळात पांडुरंग कारखान्याचा आलेख उंचावत गेला असल्याचे दिसून येते अकौंट सारख्या जटील विषयात त्यांनी पी एच डी मिळवली असून उत्तम व्यवस्थापनाच्या माध्यमातून गळीत हंगाम यशस्वी पार पडण्यासाठी मशिनरीं मध्ये अत्यावश्यक सुधारणा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, यामुळे कमी कालावधीत जास्त गाळप, सर्वाधिक साखर उतारा, या सुधारणांमुळे शेतकरी सभासदांचा वेळेत ऊस गाळप होत आहे. याबरोबरच सातत्याने सर्वाधिक ऊस दर देण्यात अंग्रेसर. कारखाना अंतर्गत व बाहेर स्वच्छता, वृक्षारोपण, रेन हार्वेस्टिंग यावर भर, आर्थिक शिस्त या सर्वांचा परिणाम म्हणून कारखान्यास अनेक मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. कार्यकार्य संचालक म्हणून काम करत असताना साखर उद्योगातील त्यांचा अभ्यास व अनुभवाचे जोरावर त्यांची महाराष्ट्र राज्य एम . डी . असोशिएशनच्या उपाध्यक्षीपदी बिनविरोध तर साखर आयुक्तांच्या विविध अभ्यास गटावर त्यांची निवड करण्यात आली. राज्य पातळीवरील वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट चा उत्कृष्ठ कार्यकारी संचालक म्हणून पुरस्कार तर नुकताच दिल्ली येथे शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन ऑफ इंडियाचा मानाचा सम जला जाणारा इंडस्ट्री एक्सलंस पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे. एकूणच डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्या कार्यकारी संचालक म्हणून यशस्वीते कडे पाहता तपपूर्तीचे समाधान देवून जाणारी कारकिर्द म्हणावी लागेल. अर्थात या यशाचे श्रेय ते स्वर्गीय लोकनेते कै. सुधाकरपंत परिचारक व विद्यमान चेअरमन प्रशांतराव परिचारक यांना देतात कारण त्यांनी मला काम करणेची मोकळीक दिली म्हणून हे शक्य झाल्याचे डॉ. यशवंत कुलकर्णी सांगतात.

# संकटात पाठीशी सदैव उभे ठाकणारे सद्गुरु ईश्वरानंद स्वामी

**परमेश्वरी शक्तीला सगुण रुपात कुठे प्रगट व्हावेसे वाटेल सांगता येत नाही. तिच्या मनीचे आपण कसे जाणू शकणार.. भक्तांना अभय देणारे, संकटावर मात करण्यास शक्ती देणारे,असे एक शक्ती स्थान सोलापूरमधेच, विमानतळाच्या मागेच आहे.**

बऱ्याच वेळा गूढ एकांतात जन माणसापासून दूर अशी हीस्थानेअसतात, निरव शांती,आणि संत सहवासात ही राजराजेश्वरी मौन स्वरुपात जग कल्याणासाठी जणु तपश्चर्याच करत आहे. येथे प्रसिद्धीचा झगझगाट नाही. आणि म्हणूनच स्थापनेनंतरही हे शक्ती स्थान अज्ञात राहिले. तेव्हा त्या भागात वस्ती कमी, दळण वळणाची साधने मर्यादित. तरीही लांबुन लांबून आंध्र, कर्नाटक या भागातील जाणकार भक्त शिष्य तेथे येत असत.

ही वरदायिनी येथे कशा स्वरुपात उभी आहे?हि च्या स्थापनेमागे कुणाची परम तपस्या याची उत्कटता तुम्हाला लागली असेल. ह्या मठाचे प्रेरणा स्थान आहेत प. पू. सिद्धारूढ स्वामींच्या परंपरेतील प.पू. बसवारूढ स्वामींचे शिष्य प पू. श्री ईश्वरानंद स्वामी..,. त्यांच्या अथक देवी उपासनेचे, व तपश्चर्ये चे फल आज येथे सगुण साकार स्वरुपात येथे आहे. सुहास्य वदना, अष्टभुजा, सिंहासनाधिष्टीत, संगमरवरातील देवी , आणि अपूर्व असे गोपूर युक्त श्री चक्र , गुरुंचे समाधीस्धान, हे सर्व भक्ती ज्ञानाचे पीठ आहे. या पवित्र भूमीत सद्गुरु शिष्य संप्रदायाची अनेक वर्षे साधना घडलेली आहे. अगदी पहिली सुरवात झाली ती ओं नमः शिवाय या मंत्राच्या कोटी जप यज्ञाने. अनेक देवी अनुष्ठाने येथे झाली. उपनिषद कालीन गुरु शिष्य नाते प. पू. अप्पाजींनी जोपासले. निरपेक्ष वेदांत ज्ञान येथे संक्रमीत आजही होत आहे. विचार सागर, वृत्ती प्रभाकर, विचार चंद्रोदय असे प्रक्रिया ग्रंथ, निजगुण शिवयोगी लिखीत परमानुभवबोधे, कैवल्य पद्धती असे कानडी



रेवती पेंडसे

पुणे

मो. ९७६३७४२५०७

अद्वैत ज्ञानपर ग्रंथ येथे ४०,५०वर्षे चालविले जातात. अनेक शिष्यांनी याचा लाभ घेतला आहे. अक्कलकोट येथील स्वामी शरण यांचे पट्टशिष्य प पू बसवारूढमहास्वामीजी नी लावलेला परमार्थाचा वेल गगनावर चढवला तो प पू अप्पाजींनी.. खूप मोठा शिष्य संप्रदाय ,अगदी जत, मुचंडी अशी गांवेच्या गावे ईश्वरानंद स्वामींचे शिष्य आहेत.



सर्वांच्यात एकत्व पाहणाऱ्या स्वामींच्या कृपेने येथे अनेक लोक येतात आणि येथील विशुद्ध प्रेमाने दिपून जातात. कृतार्थ होतात स्वतः च्या पदरचे खाऊ घालून मग प्रेमाने ज्ञान देणारे असे प्रत्यक्ष परमार्थ जगणारे अप्पाजी. येथे देवीला वास करून रहावे असे वाटले यांत नवल काय..शंकर अद्वैत तत्व, देवी उपासना, संकटात पाठीशी सदैव उभे ठाकणारे सद्गुरु ईश्वरानंद स्वामी.


देवी बगळांबा प्रसन्न झाली स्वामीना.कशी? अनेक वर्षे सिद्ध पर्वत... रायचूर जिल्ह्यातील शिंदनूर तालुक्यातील, तुंगभद्रेपासून जवळ हे स्थान, येथे वारंवार जाण्याचा छंद अप्पाजीना लागला. चिदानंद अवधूत यांच्या उपासनेतून कुमारी रुपातील बगळांबा येथे नांदते... सिद्धांचे मनोरथ पूर्ण करणारी ही देवी. तिच्या उपासनेने तेथे असलेल्या गोपूर युक्त श्री चक्राची स्थापना करण्याची प्रेरणा देवीने स्वामींना दिली आणि हे अद्भुत शक्ती स्थान निर्माण झाले. श्री चक्र उपासकांना हे ज्ञातच असेल कीं गोपूर युक्त श्री चक्राचे साधे दर्शनही दुर्लभ. अनेक सप्तशतीचे पाठ व उपासनेनंतर ही देवी एक जागृत स्थान बनली आहे. १...२००७ साली पहिलासहस्त्र चंडी याग संपन्न झाला. २....१६ डिसेंबर २०१८ ते २५ डिसेंबर दुसरा सहस्त्र चंडी याग संपन्न झाला ३... कोटी कुंकूमार्चन विधी १७ ते १९ मार्च २३ साली झाला. ४....अती रुद्र स्वाहाकार २६ ऑगस्ट ते १ सप्टेंबर आता २४ साली संपन्न झाला .मातृशक्ती पुरस्कार, जीवन गौरव पुरस्कार दिले गेले अन्नदान, ज्ञानदान, सप्तशती पठण अशी तिन्ही अंगे संपन्न झाली. प.पू. ईश्वरानंद स्वामींचा परीवार तसा मोठा. आता सध्याचे सुविद्य मठाधीश प पू. शिवपुत्र स्वामी तीच धुरा पुढे नेत आहेत. पपू अप्पाजी हे परमार्थातील लढवय्ये होते. तब्येत थोडी ठीक नसतानाही त्यांच्या आशिर्वादाने त्यांचे सत्शिष्य शिवपुत्र स्वामीनी मठ विशाल केला आहे. गोशाळेचा प्रकल्प खुणावत आहे. चालते बोलते चैतन्य असे ईश्वरानंद स्वामी, प्रसन्न हास्य, अकृत्रिम प्रेम मूर्ती, शिष्यांचा सर्व भार सहज आपल्यावर घेणारे, शुन्यातून हे विश्व प्रेमाचे वलय अनेक तपस्येचे फल पुढील पिढीला देऊन गेले

मरका गुरु त्याचा रडका चेला त्याचा परमार्थ चुलीत गेला या सांगण्यातले सार लक्षात घेऊन शिष्यांचा प्रवास आता चालू झालाय नुकतेच स्वामी ब्रह्मलीन झाले. पण तत्व रुपाने ते आपल्यातच आहेत गुरु नाही देह गुरु आहे तत्व करी हा विवेक शांत चित्ते.

आणि आपले शिवपुत्र स्वामीही त्याच तत्परतेने या जागृत शक्तीस्थानी तोच वसा पूढे नेण्यास सिद्ध झाले आहेत. तीच उर्जा प्रदान करण्यास ते सिद्ध आहेत. या तुम्ही इथे ,अनुभवा हे स्थान, समाधी दर्शन घ्या. येथील निरलस, बाल स्वरूप, निर्व्याज, निरपेक्ष आपुलकीने तुमचे जीवन धन्य होईल. गुरु चरणी सविनय.




# सिंहगड : एका शैक्षणिक चळवळीचा प्रेरणादायी शैक्षणिक प्रवास




**सिंहगड इन्स्टिट्यूट्स ही संस्था केवळ एक शैक्षणिक केंद्र नसून, विद्यार्थ्यांच्या भविष्याचे विश्वासार्ह आणि सामर्थ्यशाली अधिष्ठान आहे. शैक्षणिक गुणवत्ता, नवनवीन उपक्रम आणि मूल्याधिष्ठित दृष्टिकोन यांच्या संगमातून ही संस्था आधुनिक भारताचे अभियंते, वैज्ञानिक आणि उद्योजक घडवते. शिक्षण म्हणजे केवळ माहिती नव्हे तर जीवनाचे दिग्दर्शन. सिंहगड संस्थेचा शैक्षणिक दृष्टिकोन म्हणजे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालून, त्यांना सामाजिक भान, नैतिकता आणि नागरिकत्त्वाच्या जाणिवेसह सज्ज करणे हा आहे.**

### संस्थेची स्थापना आणि उद्दिष्टे

१९९३ साली संस्थापक अध्यक्ष प्रा. एम. एन. नवले यांच्या दूरदृष्टीतून सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीची स्थापना पुणे येथे झाली. ग्रामीण भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांना दर्जेदार तांत्रिक शिक्षण देऊन समाजोपयोगी अभियंते आणि प्रशासक घडविणे, हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट राहिले आहे.

आज या संस्थेत प्री - प्रायमरी सीबीएसई संलग्नित शाळांपासून अभियांत्रिकी, फार्मसी, मॅनेजमेंट, हॉटेल मॅनेजमेंट, वैद्यकीय, डेंटल तसेच अध्यापक महाविद्यालय व इतर सर्व प्रकारच्या महाविद्यालयातून दरवर्षी साधारण एक लाख विद्यार्थी आपले शिक्षण घेत आहेत. त्यामुळे सिंहगडमध्ये

केजीपासून पीएच डी. पर्यंतचे शिक्षण उपलब्ध आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

### सिंहगड सोलापूर कॅम्पस: विकासाचा नवा अध्याय

२०१० मध्ये सोलापूरच्या केगाव येथील माळरानावर सिंहगड अभियांत्रिकी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. ९० एकर परिसरात 'आआयटी'च्या धर्तीवर उभारलेल्या इमारती, निसर्गरम्य परिसर आणि आधुनिक पायाभूत सुविधा यामुळे केगावचा कॅम्पस विद्यार्थ्यांच्या घडवणुकीस पोषक ठरला आहे.

सध्या या संकुलात सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्यूनिअर कॉलेज तसेच अभियांत्रिकी महाविद्यालय कार्यरत आहे. ४०० विद्यार्थी संख्येने सुरुवात झालेल्या संकुलात सध्या ३००० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दरवर्षी सुमारे ५०० अभियंते या संस्थेतून बाहेर पडतात.

### शैक्षणिक गुणवत्ता आणि यशाचे सूत्र

एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय () ही केवळ शिक्षणसंस्था नाही, तर विद्यार्थी घडविणारी संस्कारशाळा आहे. चांगला माणूस व दर्जेदार अभियंता घडवणारी संस्था म्हणून सिंहगडची ओळख आहे. नियमित लेक्चर, अकॅडमिक क्वालिटी, प्राध्यापकांचा टीचर लर्निंग प्लॅन, प्लेसमेंटपूर्व तयारी आणि प्लेसमेंटमधून सर्वाधिक विद्यार्थ्यांना संधी,




रामकृष्ण लांबतुरे
सोलापूर
मो.९८८११९२३१०


अशा जमेच्या बाजू केगाव येथील एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आहेत.

आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा जमाना सुरू झाला तरीदेखील ''ह्यूमन कॅन नॉट बी रिप्लेसड्'', या उक्तीप्रमाणे विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचे स्थान कायमच अमूल्य राहिले आहे. विद्यार्थी शिकतो नोकरीसाठी, त्यामुळे प्लेसमेंटच्या माध्यमातून किंवा विद्यार्थी स्वतःचा व्यवसाय, उद्योग सुरू करावेत यासाठी सिंहगड संस्था नेहमीच विविध उपक्रम, मार्गदर्शन शिबिरांचे (स्टुडंट डेव्हलपमेंट अँण्ड करिअर कौन्सिलिंग) आयोजन करते. त्यामुळे दरवर्षी महाविद्यालयाचे प्रवेश अगदी फुल्ल असतात.

सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात दीड हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. २०१४ मध्ये श्री. संजय नवले हे कॅम्पस डायरेक्टर व डॉ. शंकर नवले यांनी प्राचार्य म्हणून पदभार घेतला. तेव्हापासून सोलापूर सिंहगड चा प्रगतीचा आलेख उत्तरोत्तर वाढतच राहिला. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना चांगल्या कंपन्यांमध्ये जॉब मिळायला हवा, अनेकांना सरकारी नोक-यांमध्ये देखील संधी मिळावी, आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी देशात, विदेशात चमकायला पाहिजेत, यासाठी त्यांचा अट्टाहास असतो.

कॉलेजला विद्यापीठाकडून उत्कृष्ट महाविद्यालय, उत्कृष्ट प्राचार्य, उत्कृष्ट संस्था असे पुरस्कार मिळाले आहेत. बंगलुरूचा नॅशनल अकेडमिक एक्सलन्स पुरस्कार देखील मिळाला आहे. तसेच नॅक कडून सलग दोन वेळेस ''अ'' श्रेणी प्राप्त झाली आहे. याशिवाय सांस्कृतिक महोत्सवात, स्मार्ट इंडिया हॅकेथॉन स्पर्धेतही या कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली आहे. विद्यार्थी हाच ब्रेण्ड ॲम्बेसिडर मानून संस्थेची वाटचाल सुरू आहे.

### प्रमुख वैशिष्ट्ये

● दर्जेदार अध्यापन आणि नियमित लेक्चर्स ● मुला - मुलींसाठी स्वतंत्र स्टडी सेशन ● प्लेसमेंटपूर्व तयारी आणि प्रभावी प्लेसमेंट सेल ● स्टुडंट कौन्सिल, करिअर मार्गदर्शन उपक्रम ●'' प्रणाली १५२० विद्यार्थ्यांवर प्रत्येक शिक्षकांचे लक्ष असते. ● गुणवत्ता आणि मान्यतेची ओळख कडून दोन वेळा ग्रेड ● बंगलोर नॅशनल अकॅडमिक एक्सलन्स पुरस्कार ● विद्यापीठाचे उत्कृष्ट महाविद्यालय, प्राचार्य आणि संस्था पुरस्कार ● स्मार्ट इंडिया हॅकेथॉन, सांस्कृतिक स्पर्धांतील विद्यार्थ्यांची कामगिरी ● विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास ● येथे शिक्षण केवळ पुस्तकी मर्यादेत न राहता विचार, सर्जनशीलता आणि मूल्याधिष्ठित दृष्टिकोन यांचा विकास करते.

### ठळक उपक्रम

● स्पर्धा प्रवेशानंतर लगेच ● १४,५०० पुस्तकांसह सुसज्ज ग्रंथालय व ४०० विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासिका ● सुसज्ज क्रीडांगण, जिम,कॅन्टीन, मुला - मुलींसाठी स्वतंत्र व अत्यंत सुरक्षित हॉस्टेल्स ● अंतर्गत मार्फत विविध उपक्रम ● विद्यार्थी वाहतुकीसाठी ● स्वतः च्या बससेवा विविध मार्गावरुन उपलब्ध

### टिचर-गार्डीयन द्वारे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विशेष लक्ष

प्रॉब्लेम ॲण्ड प्रोजेक्ट बेसड लर्निंगवर महाविद्यालयाचा भर आहे. कॉलेजमधील प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोचता यावे, त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांना मार्गदर्शन करून त्यांना उत्तम शिक्षण घेता यावे, या हेतूने सिंहगड संस्थेतर्फे टिचर-गार्डीयन (शिक्षक-पालक) उपक्रम राबविला जातो. संस्थेतील प्रत्येक विद्यार्थी हा आपल्या कुटुंबातील सदस्य असल्याचे मानून एका प्राध्यापकाकडे १५ ते २० विद्यार्थ्यांची जबाबदारी देण्यात येते. त्यातून प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अडचणी समतात, योग्यवेळी त्या विद्यार्थ्यांना भविष्याची पायवाट घालून दिली जाते. त्यामुळे आपण कशासाठी अभियांत्रिकीचे शिक्षण घेतोय, याची जाणीव त्यांना होते. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या निकालावर चांगला होत असल्याचे दिसून येते आहे.

### कॅम्पस डायरेक्टर यांचा संदेश श्री. संजय एस. नवले

सहसचिव, एसपीएसएम व कॅम्पस डायरेक्टर ''तंत्रज्ञानाचा वेग लक्षात घेता, आज विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान नव्हे, तर आंतरराष्ट्रीय दर्जाचे कौशल्य आणि दृष्टिकोन आवश्यक आहे. आमचा प्रयत्न विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचा विकास करताना, त्यांचे एक समाजाभिमुख आणि मूल्याधिष्ठित व्यक्तिमत्त्व घडवण्याकडे असतो.''

### प्राचार्यांचे मनोगत - डॉ. शंकर डी. नवले

''अभियांत्रिकी ही केवळ ज्ञानाची गोष्ट नाही, ती कल्पनाशक्ती आणि समस्यांवर उपाय शोधण्याची कला आहे. आमचा भर प्रकल्पाधारित शिक्षणावर असून, विद्यार्थ्यांचा वैचारिक आणि व्यावसायिक विकास घडवण्यासाठी आम्ही कार्य करतो.''


# आगामी काळात सहकाराला अच्छे दिन

**महाराष्ट्राच्या व सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण विकासात सहकाराचे मोठे योगदान आहे. सहकाराने या जिल्ह्यातील शेती, उद्योग आणि शेतकरी समृद्ध केला. पत नसलेल्या शेतकऱ्यांना उद्योगाने, सहकाराने पत निर्माण करून दिली. सहकारात ज्यांचे आर्थिक व्यवस्थापन चुकले, ज्यांनी सहकाराचा वापर स्वार्थासाठी केला ते संपले. जे तग धरून राहिले, ज्यांनी बदलत्या काळानुसार बदल केला ते टिकले आहेत. सहकार आता कात टाकतोय. त्यामुळे येणाऱ्या काळात सहकाराचे भविष्य हे उज्वल आहे.**

### लक्षणीय...

- सहकाराला ११० वर्षांहून अधिक परंपरा
- सहकाराने आत्मसात केले बदलते तंत्रज्ञान
- तळागाळातील व्यक्तींची निर्माण केली पत
- ग्रामीण विकासाला लावला मोठा हातभार
- ९७ व्या घटना दुरुस्तीने सभासदांवर मोठी जबाबदारी

विविध परंपरा, संस्कृती अशी ओळख असलेल्या भारताची अर्थव्यवस्था ही मिश्र स्वरूपाची आहे. ब्रिटिश भारतात असताना १९०४ मध्ये या देशात सहकार रुजवायला सुरवात झाली. १९०४, १९१२ आणि १९२५ मध्ये बॉम्बे स्टेट को.ऑप. सोयायटी कायदा आला. या कायद्याने महाराष्ट्रात सहकार रुजवायला सुरवात झाली. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर १९६० मध्ये महाराष्ट्राचा स्वतः चा सहकार कायदा अस्तित्वात आला. हा कायदा नंतरच्या काळात आशिया खंडासाठी दिशादर्शक ठरला. स्वातंत्र्यपूर्व काळात (कै.) यशवंतराव चव्हाण, वैकुंठभाई मेहता यांच्यासह सहकार तत्त्वचिंतक नेतृत्वामुळे सहकार महाराष्ट्रात रुजला.




सहकार अर्थशाखा असल्याने अर्थशास्त्राचे पूर्ण निकष सहकारी संस्थांना लागू होतात. सहकारामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात औद्योगिक, कृषी व आर्थिक क्रांती झाली. सध्या महाराष्ट्रात ६० प्रकारच्या सव्वा दोन लाख सहकारी संस्था कार्यरत आहेत. विविध सेवा सहकारी संस्था, गृहनिर्माण संस्था, साखर कारखाने, दूध संघ, सूत गिरण्या, नागरी बँका, सेवक पतसंस्था, नागरी व बिगरशेती पतसंस्था, ग्रामीण व शेती पतसंस्था, जिल्हा मध्यवर्ती बँका यामुळे महाराष्ट्राचा ग्रामीण व शहरी भाग समृद्ध झाला आहे.

१९८०-९० पर्यंत सहकार सक्षम होता. त्यानंतरच्या काळात सहकाराला घरघर लागली. सहकार चळवळ ज्यांच्या हातात होती त्यातील काही जणांनी गैरवापर केला. अर्थशास्त्रीय दोषामुळे व नैसर्गिक संकटांमुळे या संस्था अडचणीत आल्या. १९९० नंतर जागतिक अर्थव्यवस्था बदलत गेली. मुक्त अर्थव्यवस्थेत स्पर्धा वाढली. जिल्हा बँका, पतसंस्था आर्थिकदृष्ट्या अडचणीत येऊ लागल्या. २००० ते २०१० या कालावधीत ग्रामीण भागाला पतपुरवठा करणाऱ्या संस्थांच मोडकळीस आल्याने राज्यातील शेतकऱ्यांचा आर्थिक कणा मोडला. राष्ट्रीयीकृत बँका फक्त सधन शेतकऱ्यांना पतपुरवठा करत असल्याने ग्रामीण भागातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना आता कोणी वाली राहिला नाही. ग्रामीण भागातील शेतकरी उभा करायचा असेल तर या संस्थांना उभा करणे आवश्यक आहे.




श्रीकांत मोरे
ज्येष्ठ अर्थतज्ञ, सोलापूर
मो.७०२०६०००२४


नोटाबंदीच्या निर्णयाचा काहीच फायदा आर्थिक क्षेत्रातील सहकारी संस्थांना झाला नाही. या सर्व संस्था संकटांतून बाहेर पडल्या आहेत. बदलत्या काळानुसार आता सहकारी संस्थांनीही बदल स्वीकारले आहेत. आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात केले आहे. सध्या सहकारात उभा असलेल्या संस्था या शासनाच्या पाठबळाव्यतिरिक्त स्वबळावर उभ्या आहेत. सहकारात येत असलेल्या नव्या पिढीचाही सहकाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक आणि सकारात्मक आहे. त्यामुळे या सहकारी संस्थांना येत्या काळात चांगले भविष्य आहे. सहकारी संस्थेत सभासद सजग असणे महत्वाचे आहे.

९७ व्या घटना दुरुस्तीमुळे सहकारातील सभासदांवर मोठी जबाबदारी दिली आहे. सक्रिय व निष्क्रिय सभासद अशी वर्गवारी केली आहे. निष्क्रिय सभासदांना मतदानापासून वंचित ठेवण्याचीही तरतूद या घटना दुरुस्तीत केली आहे. सहकारासाठी आवश्यक असलेला महत्त्वाचा वदल या दुरुस्तीत झाल्याने येत्या काळात सहकार चळवळ अधिक मजबूत होईल असा विश्वास आहे. सहकारी अर्थप्रणाली ही यशस्वी होणे ही काळाची गरज आहे. आजसुद्धा देशात ग्रामीण भागात, डोंगराळ भागात, जंगलव्याप्त भागात, अनेक किनारपट्टीच्या भागात आर्थिक विकास झालेला नाही. ३० ते ४० टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली असून लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे. या सगळ्यांसाठी सहकारी अर्थव्यवस्था विकसित होणे महत्त्वाचे आहे. यामुळे रोजगार निर्मिती, ग्रामीण उद्योगधंदे वाढीस लागतील. देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेमध्ये सहकाराचा अधिक सहभाग वाढेल. सहकारात अनेक अडचणी असल्या तरी सहकार यशस्वी झाला पाहिजे यासाठी केंद्र पातळीवरून प्रयत्न चालू आहेत. त्यासाठी विद्यमान सहकार मंत्री मा. अमित शहा यांना धन्यवाद दिलेच पाहिजेत.

# सांगोल्यातील प्राचीन व पौराणिक मंदीर : म्हसोबा देवस्थान



**सांगोल्यातील भुईकोट किल्ल्याच्या मध्यभागी म्हसोबा देवस्थान हे मंदिर आहे. सदर देवस्थान हे अतिशय प्राचीन व पौराणिक आहे. येथे दर्शनासाठी गेल्यास मंदिरातील गाभाऱ्याच्या मध्यभागी श्री म्हसोबा देवस्थान राजांची शेंदुर लावलेल्या मोठ्या मुर्तीचे दर्शन होते. हे मंदिर दक्षिणाभिमुख आहे. मंदिरा समोरील कट्ट्यावर साती आसरा माऊली म्हणजेच म्हसोबा देवस्थान किल्लेदारांच्या सात बहिणीचे गोल कन्या रुपी मुर्तीचे दर्शन होते. तसेच देवस्थानचे वाहन हत्ती ऐरावातचे दर्शन होते. मंदिरास प्रदक्षिणा पूर्ण करताना पाठीमागील बाजूस देवस्थानची मोठी बहिण व भाऊजी यांचे दर्शन होते. पाठीमागे उजव्याबाजुस देवस्थानचे दुसरे रुप चोरडीनडीचा म्हसोबा यांच्या शिलारुपी मुर्तीचे दर्शन होते. डाव्याबाजुस श्री क्षेत्र लोटेवाडी म्हसोबा देवस्थानचे दर्शन होते. मंदिराच्या समोरील बाजूस इतिहास कालीन मोठे लिंबाचे झाड असून झाडाच्या गोल कट्ट्याच्या मध्यभागी अनेक देवस्थानच्या मूर्तीचे दर्शन होते. मंदिरापासून डाव्याबाजूस काही अंतरावर एक चौकोनी ऐतिहासिक विहीर आहे. याच विहिरीचे पाणी पूर्वी प्यायला व देवाला अंघोळ घालण्यासाठी वापरत असे. तसेच विहिरीच्या शेजारी प्राचीन असे श्री नरसोबाचे मंदिर आहे.**


नवसाला पावणारे देवस्थान अशी प्रसिद्ध ख्याती या देवस्थानाची आहे. हिंदू परंपरेनुसार भाविक भक्त एखादे काम लवकर व मुदतीत व्हावे म्हणून या देवाला कौल लावायची प्रथा आहे. या तालुक्यातील असो किंवा अन्य तालुक्यातील लोक शेतात विहिरीला पाणी लागू दे म्हणून ते येणाऱ्या पिका पर्यंत नवस बोलून ते विहिरीला लागलेले पाणी, पिक किंवा धनधान्य देवाला वाहण्याची प्रथा आजपर्यंत म्हणजेच अजून चालू आहे.

सदर देवाला नवस फेडताना भाविक देवास जरीचा फेटा, शेला पागोटे, धोतर भगवे अथवा पांढरे, पंचा, चांदीचा घोडा व लाकडी बैल जोडी असे अर्पण करतात. काही भक्त पाच अथवा सात नारळाचे तोरण बांधतात. तसेच चांदी व सोन्याच्या वस्तू दान देण्याची प्रथा आहे. या देवास नवस बोलण्याची ही जुनी प्रथा असून इतिहास कालीन पण आहे. या देवस्थानास प्रामुख्याने दक्षिणेकडील राज्यातील भाविकांची




दिपक भाकरे
सांगोला
मो.९४२१०७४६३०


संख्या मोठ्या प्रमाणात आहे. तसेच दर अमावस्या व पौर्णिमेस नारळ फोडण्यासाठी येणाऱ्या भाविक भक्तांची गर्दी अतिशय मोठ्या प्रमाणात आहे. या देवस्थानची यात्रा ही आषाढ महिन्यात असते. त्यावेळेस सांगोला शहरातील व तालुक्यातील तसेच आसपासच्या सर्व तालुक्यामधून वृद्ध, माताभगिनी, लहान बालगोपाळ, तरुण भाविक भक्त गोड व खारा नैवेद्य दाखवण्यासाठी व देव दर्शनासाठी जमा होतो. या देवस्थानची रोज सकाळी व संध्याकाळी नित्य नियमितपणे मुख आरती केली जाते.




पुजा अर्चा करण्याचा मान हा बाबा पुजारी (मो. नं.९८८१८२३६४७) व बालम पुजारी (मो.नं. ९५१८७२३५०८) यांना वंश परंपरेने चालत आला आहे. तसेच त्यांच्या बरोबर अन्य पुजारी ज्याच्या त्याच्या हिस्यातील दिवसा प्रमाणे पुजा अर्चा करतात.




तरुण भारत
जाहिरात आपली, सन्मान महाराष्ट्राचा
४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

BALAJI
SAROVAR PREMIERE
solapur
A DIVISION OF BALAJI AMINES LIMITED



Solapur First World Class Luxury Destination
: Office :
9/1A/1, Aasra Chowk, Hotgi Road,
Solapur - 413 224
Ph. 0217-2310824 Web.: www.balajiamines.com

तरुण भारत
दैनिक सोलापूर
तरुण भारत
वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
सोलापूर जिल्हा शैक्षणिक
कलाशिक्षक संघ, सोलापूर
सर्व पदाधिकारी व सदस्य

दैनिक सोलापूर तरूण भारतच्या
वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा!



महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष
विष्णु भाऊ कसबे
महादेव महाराज भोसले
पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष
नागेश जाधव
नूतन जिल्हाध्यक्ष
शुभेच्छुक
समर्थ देडे
सचिव
लहुजी पेंटर कामगार युनियन
मा. वसंत देडे
जिल्हा संपर्क प्रमुख
लहुजी शक्ती सेना सोलापूर जिल्हा

सोलापूर
तरुण भारत
४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
Hotel
Ambassador
Executive
95/1, Murarji Peth, Near Old Pune Naka,
S.T.Stand Road, Solapur
0217-2322388 M.: 9699066102







मा.प्रा.डॉ.तानाजीराव सावंत
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य

मा.प्रा.शिवाजीराव सावंत
चेअरमन भैरवनाथ शुगर उद्योग समुह


तरुण भारत
जाहिरात आपली, सन्मान महाराष्ट्राचा
सोलापूर
तरुण भारत
४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!



मा.अनिल(दादा) सावंत
व्हा.चेअरमन भैरवनाथ शुगर

शुभेच्छुक
भैरवनाथ शुगर वर्क्स लि.
युनिट नं.३, लवंगी, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!



कामगार नेते
माजी चेअरमन
मा.चांगदेव सोनवणे
मा.भालचंद्र साखरे
मा.केरबा माने
शुभेच्छुक
- मा.चांगदेव सोनवणे (कामगार नेते)
- मा.भालचंद्र साखरे (माजी चेअरमन, मनपा चतुर्थ श्रेणी कर्मचारी पतसंस्था, सोलापूर)
- मा.केरबा माने आणि मित्र परिवार, सोलापूर

सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिन चिरायु होवो..!
जनसेवक
लोकनेते






कै. आमदार बाबासाहेब तानवडे
कै. दत्ता (अण्णा) तानवडे

सुयश इंडस्ट्रीज
SUYASH
INDUSTRIES
SINCE 1966
४४, उत्तर कसबा, पांजरपोल चौक
बस स्टॉप जवळ, सोलापूर - ४१३ ००७
शुभेच्छुक
तानवडे परिवार
मा. प्रविण तानवडे
मो. : ९४२१०४००३३
मोनोब्लॉक पंपस्, सबमर्सिबल पंपस्, सेल्फ प्राईमिंग पंपस्, ओपनवेल पंपस्, पीव्हीसी पाईप्स, ड्रिप इरिगेशन, स्प्रिंकलर, केबल वायर, स्टार्टर


MEDICAL
SPORT



पंतप्रधान
गृहमंत्री
प्रदेश अध्यक्ष
मुख्यमंत्री
श्री. नरेंद्रजी मोदी
श्री. अमितजी शहा
श्री. रविंद्र चव्हाण
श्री. देवेंद्रजी फडणवीस
दैनिक सोलापूर
तरुण भारतच्या
४१ व्या वर्धापन दिनास
हार्दिक
शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. निनाद प्रभाकर पटवर्धन
नगरसेवक
महाळुंग-श्रीपूर नगर पंचायत तथा भाजपा पश्चिम
महाराष्ट्र अध्यक्ष पंचायतराज व ग्रामविकास विभाग


सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
ॲड.निलेश दत्तात्रय जोशी
ॲड.यशश्री निलेश जोशी
Office : Flat No.5, Yeashri Apartment, 930, North Sadar Bazar, Near Rangbhavan, Solapur. Ph.: 0217-2310735
Office : Plot No.62, 'Anusuya' Vishal Nagar, in front off V.M. Mehata High School, Jule Solapur - 4. Ph.: 0217-2343184
Cell : 9422650422, 9370183874


शिवसेना
लोकप्रिय दैनिक
तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
सतिश शिवणे
सरोजताई गायकवाड
बापू खडके
मोहसीन सय्यद
रविनाथ तांबोळकर
भास्कर जाधव
भागवत प्रल्हाद वंगे
दशरथ जगताप
निवृत्ती सुर्यवंशी
सचिन सुरवसे
प्रितम माने
संतोष देशमुख
सुलभा हाले
किरण बिराजदार


दैनिक सोलापूर
तरुण भारतच्या
वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा!
ॲड. मिलींद थोबडे
शुभेच्छुक
ॲड. रितेश थोबडे
मा.अध्यक्ष तथा विद्यमान सदस्य
बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र
ॲन्ड गोवा
उच्च न्यायालय मुंबई


सोलापूर
तरुण भारत
४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
जाहिरात आपली, सन्मान महाराष्ट्राचा
आशीर्वाद
मा.श्री.श्रीकांत मोरे
चेअरमन, मनोरमा बँक
मा.सौ.शोभा मोरे
चेअरमन, मनोरमा मल्टिस्टेट
मा.श्री.संतोष सुरवसे
व्हा.चेअरमन, मनोरमा बँक
मा.सौ.अस्मिता गायकवाड
कार्याध्यक्षा, मनोरमा बँक
मा.सौ.शिल्पा कुलकर्णी
व्हा.चेअरमन, मनोरमा मल्टिस्टेट
मा.सौ.मिताली मोरे
कार्याध्यक्षा, मनोरमा मल्टिस्टेट
मा.श्री.सुमित मोरे
ब्रॅन्ड ॲम्बेसिडर तथा संचालक
मा.सौ.ऋचा मोरे-पाटील
ब्रॅन्ड ॲम्बेसिडर तथा संचालक
सोलापूर जिल्ह्यातील
प्रथम क्रमांक प्राप्त
अग्रगण्य बँक
सहकारातून सृध्दीकडे
वाटचाल करणारी
सतत सात वर्षे
0% थकबाकी
असणारी एकमेव बँक
शुभेच्छुक
मनोरमा को.ऑप. बँक लिमिटेड । मनोरमा मल्टिस्टेट को.ऑप.क्रेडिट सोसायटी
व मनोरमा परिवार, सोलापूर




**उजनीचे पाणी कुरनुर धरणात आणणे देगाव एक्सप्रेस कॅनॉल प्रकल्प ग्रामदैवत श्री मल्लीकार्जुन मंदिराचा जिर्णोध्दार , अक्कलकोट बसस्थानक निर्मिती महाराष्ट्रातील मॉडेल बसस्थानक बनवणे,नगरपरिषद पाणी पुरवठा तालुक्यातील रस्ते विकास जलसंधारण कामे जलजीवन मिशनच्या अंतर्गत कामे ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास बरोबर अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकास योजना असे विकासाची अनेक प्रश्न अक्कलकोट विधानसभा मतदार संघाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल अशी दैदिप्यमान कामागिरी करूनही ना गर्व ! ना रुबाब !सामान्य माणसाला कधीही कोठेही सहज संपर्क असलेला आपला माणुस म्हणून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा उल्लेख करावा लागेल.**

## आमदार कल्याणशेट्टीमुळे

# नभुतो न भविष्यती विकासकामे मार्गी

पश्चिम महाराष्ट्रात सर्वांत जास्त रेकॉर्ड ब्रेक नभुतो न भविष्यती असा विकास निधी आमदारकीच्या पहिल्याच टर्ममध्ये आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी आणला दैनिक तरुण भारतने विधानसभा निवडणुक होण्यापुर्वीच आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची विधानसभेत दुसऱ्यांदा आमदार म्हणून एन्ट्री निश्चित होणार असे भाकित वर्तवले होते . सुजाण जनतेन सत्यात आणल . कै पंचप्पा कल्याणशेट्टी सर साधी राहणीमान ,अंत्यत स्वाभीमानी , ध्येय निष्ठा आणि त्यानी जी स्वप्न उराशी बाळगली होती ती स्वप्ने आज आमदार कल्याणशेट्टी सत्यात उतरवित आहेत ही फार मोठी उपलब्धी आहे . अक्कलकोट मतदारसंघाच्या सर्वांगिण विकासाची ही सुरवात आहे . विकासाच्या फास्ट ट्रॅकवर अक्कलकोटला आणुन संपुर्ण महाराष्ट्रात नव्हे तर देश पातळीवर अक्कलकोट तीर्थक्षेत्र कसे आणता येईल असाच प्रयत्न आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या चौफेरविकास कामाची गती वरून अंदाज बांधता येईल . दस्तुरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमदार सचिन कल्याणशेट्टी यानां म्हणत असत आमदारकीच्या पहिल्याच टर्म मध्ये सर्वच कामानां मंजुरी घेतलात . दुसऱ्या टर्मच्या आम दारकीच्या काळात काहीतरी विकास कामे करण्यास कामे ठेवा असे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या कार्यपद्धतीवर गौरवपुर्ण उल्लेख करताना जाहिर सभेत उल्लेख केला होता.

**मोठी उपलब्धी :** तीर्थक्षेत्र अक्कलकोट विकास आराखड्यास मंजुरी अक्कलकोट स्वामी समर्थांच्या पदस्पर्शाने व लीला कार्याने पावन झालेली भुमी दिवसागणिक येथे येणाऱ्या भाविकांची संख्या प्रचंड वाढत आहे या अनुषंगाने वाढिव पायाभुत सुविधा ड्रेनेज पाणी रस्ते मंदिर परिसर सुशोभित करणे वाहन तळ विकास स्वच्छता गृह उद्यान विकास व्यापारी संकुल अनुषंगिक कामे याकरिता आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी तीर्थक्षेत्र विकास आराखडा शासनाकडे पाठपुरावा करत ३६८ कोटी रुपयाचा निधी मंजुर करून घेतला .

अक्कलकोट नगरपरिषद अंतर्गत रस्ते विकास काम अंतर्गत एम एस ईबी चौक ते हन्नुर रोड व्हाया हसापुर रोड रस्ता १७ कोटी , वटवृक्ष स्वामी महाराज गेट ते मुरलीधर मंदिर महाद्वार रस्ता ३.७२ कोटी एमएसईबी चौक ते अन्नछत्र मंडळ पर्यतचा रस्ता ४७ .२४ कोटी मंगरुळे चौक ते कारंजा चौक पर्यंत रस्ता २४ .१५ कोटी , एम एस ईबी चौक ते रिलायन्स पंप उड्डान पुल रस्ता १५ कोटी हे सर्व रस्ते सिमेंट कॉक्रीट चे होत आहेत . दोन्ही बाजुला मोठे फुटपाथ पावसाळी गटार पाईप रस्ता दुभाजक आणि दिशादर्शक फलक सर्व सुविधा सह हे रस्ते तयार होणार आहेत . नगरोत्थान प्रकल्पातुन १२९ कोटी रुपयाचा निधी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मंजुर केल्याने थोडयाच दिवसात अक्कलकोट शहराचे चित्रच बदलेले पहावयास मिळणार आहे . सध्या ही कामे प्रगती पथावर आहेत .



**उजनीचे पाणी कुरुनुर धरणात**

अक्कलकोट आणि दक्षिण सोलापुर तालुक्याच्या दुष्काळी भागात उजनी धरणाच पाणी मिळवून देण्याचा संकल्प आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केला . सुधारीत प्रशासकीय मान्यता ४१२ कोटी निधी मिळवून अथक प्रयत्नाने उजनीचे पाणी एकरूख उपसा सिंचन योजनेतुन दोन्ही तालुक्यात पोहचले . दुध नी मैंदर्गी अक्कलकोट नगर पालिकाना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा यासह ५१ गावा मधील २५ हजार एकर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे दक्षिण सोलापुर तालुक्यातील २१ गावातील १७ हजार ५०० एकर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे .

देगाव एक्स्प्रेस कालवा पुर्णत्वाने विकास कामाचे शिखर गाठणार देगाव जोड कालवा एक्स्प्रेस सिंचन योजना पुर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध झाल्याने तालुक्याचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे . अक्कलकोटसह दक्षिण सोलापुर तालुक्याचे सिंचन क्षेत्र वाढणार आहे . देगाव कालवा आणि देगाव उपसा सिंचन योजना ही उजनीच्या डाव्या कालव्या वरील कारंबा शाखा च्या ५३ किमी वरून ही शाखा निघते . या प्रकल्पातील ९५ % कामे पुर्ण झाली आहेत . देगाव जलसेतुची लांबी १८८६ मीटर आहे . देगाव उपसा सिंचन योजनेतील वितरण कुंड आणि त्याच्या वितरिका क्र . १ व २ त्याचे पाच वर्षासाठी परिचलन व देखभाल दुरुस्ती साठी ३४९ . ४ ५ कोटी रुपयाचा निधी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मंजुर करून आणला आहे . दक्षिण सोलापुर मधील १० गावे अक्कलकोट मधील २५ गावना या योजनेचा लाभ होऊन ४२५० ० बेचाळीस हजार पाचशे एकर जमीन सिंचन क्षेत्राखाली येणार आहे .




नंदकुमार जगदाळे

अक्कलकोट

मो.८८८८७४०७८०


**बसस्थानकाचे लवकरच होईल लोकार्पण**

अमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पाठपुराव्यामुळे अंत्यत जलदगतीने महाराष्ट्रातील एक मॉडेल बसस्थानकाची निर्मिती अनेक वादळे व संकटे पार करून तीर्थक्षेत्र अक्कलकोटमध्ये साकार होत आहे हे काम प्रगती पथावर आहे . बसस्थानक तीन मजली आहे . अक्कलकोट तीर्थक्षेत्री भाविक अचानक प्रवसाने मध्यरात्री नंतर जरी उतरले तर अशा लोकाना रात्री भक्त निवासाची सोय या बसस्थानकात असणार आहे अशी सोय असलेले महाराष्ट्रातील बहुधा पहिलंच बसस्थानक असावे . बसेससाठी २२ फलाट असणार आहेत शिवनेरी शिवशाही शिवाई अशा बसेससाठी स्वतंत्र प्रतिक्षालय वाहक चालक विश्रांती कक्ष हिरकणी कक्ष आरक्षण कक्ष स्वतंत्र महिला विश्रांती कक्ष वाहक चालक विश्राती कक्ष , अत्याधुनिक स्वच्छता गृह., सर्व सोयीनी युक्त कॅटीन एसटी कर्मचारी अधिकारी यांच्यासाठी स्वतंत्र कक्ष असणार आहे . दुचाकी रिक्षा चारचाकी वाहनासाठी स्वतंत्र वाहन तळ व ११ मोठे व्यापारी गाळे या बसस्थानकात आहेत . लवकरच हे बसस्थानक प्रवाशांच्या यात्री पर्यटक स्वामी भक्ताच्या सेवेसाठी रुजु होण्यासाठी सज्ज होत आहे .

ग्रामदैवत मल्लीकार्जुन जीर्णोध्दार ग्रामदैवत श्री मल्लीकार्जुन मंदिराचे एकुण क्षेत्रफळ तीन हजार चौरस फुट आहे .२५० वर्ष जुने ग्राम दैवत श्री मल्लीकार्जुन मंदिराचे जीर्णो उद्धाराचे कामही प्रगती पथावर आहे सुमारे ६ कोटी रुपए खर्च अपेक्षित आहे . पर्यटन विकास महामंडळ व आमदार फंडातुन या मंदिराच्या नवनिर्माणासाठी ४.५ ० कोटी रुपए निधी उपलब्ध करून दिला आहे हेमाडपंथी शैलीवर मंदिराची बांधणी आहे . वर्षानुवर्ष हे बांधकाम टिकावे मजबुत रहावे असे अधुनिक सामुग्री व तंत्रज्ञान वापरून आकर्षक नक्षीदार हे दगडी कोरीव कलाकुसरीने युक्त बांधकाम पुर्ण केले जात आहे . ग्रामदैवत श्री मल्लीकार्जुन मंदिराने तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीच्या वैभवात व शौभे त वाढ होणार आहे . यामुळे तीर्थक्षेत्री येणाऱ्या पर्यटक यात्री भाविकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे .

पर्यटनास चालना मिळणार असुन यामुळे पर्यटन उद्योग वाढिस लागुन अनेकाना यामुळे हॉटेल टुरिस्ट लॉज निवास व्यवस्था आदि अनेक रोजगाराच्या संधी निमाण होणार आहेत यामुळे अनेक बेरोजगाराना यामुळे काम मिळणार आहे . अक्कलकोट शहरात भुमिगत गटार योजना १६८ . ७९ कोटी खर्च अपेक्षित आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी शासनाच्या नगरोत्थान महाअभियानातर्गत अक्कलकोट शहराच्या भुमीगत गटार योजना मंजुर करून घेतली आहे अक्कलकोट शहराच्या पुढील ३० वर्षा पर्यंत लोक संख्या वाढीचा विचार करून भुमीगत गटार योजना कृती आराखडा तयार केला आहे एकूण ८ ५ .७ किलो मिटरची ड्रेनेज लाईन आहे शहरातील सखल भागामुळे चार ठिकाणी पंपिग स्टेशन असणार आहेत . एकूण ११ हजार ६ ७५ मालमत्ता घरांचे सांडपाणी जोडणी प्रस्तावित आहेत ही योजना दोन टप्या त पुर्ण होणार आहे .




दुधनी अक्कलकोट रोड रेल्वे स्टेशन उड्डान पुल आमदार सचिन कल्याण शेट्टी यांच्या शासन दरबारी सतत पाठपुरावा केल्यामुळे जवळ पास १०० कोटी रुपयाचा निधी साठी मंजुरी मिळाली आहे . पितापुर हरणा नदीवर दोन पुल मंजुर निधी १०.५ कोटी मुस्ती येथे पुलासाठी मंजुर निधी ७.५ कोटी किणी सुलतान पुर बोरी नदीवरील पुल साठी १३ कोटी मैंदर्गी रोड बोरी नदी वरील पुलाची ऊंची वाढविण्यासाठी ३५ कोटी रुपए निधी मंजुर करण्यात आला आहे . आमदार जनसुविधाकामे मुख्यमंत्री सहाय्यता निधीची कामे मोठया प्रमाणात झाली आहेत . विवेकानंद प्रतिष्ठान अक्कलकोट तर्फे दरवर्षी अध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली गोरज मुहूर्तावर सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. विवेकानंद प्रतिष्ठान अक्कलकोट सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरण, आरोग्य, क्रीडा, अध्यात्म आदी अनेक क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे. विवेकानंद प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरातील लोकांना प्रोत्साहन देण्याचे कार्य निरंतर सुरु आहे. समाजातील सर्व स्तरातील लोकांना सामाजिक उपक्रमातून एकत्रित आणून समाजात बंधुत्व निर्माण करण्याचा प्रयत्न विवेकानंद प्रतिष्ठान करीत आहे. लग्न हा भारतीय जीवन संस्कृतीचा कणा आहे. विवाह हा एक जीवनातील महत्वाचा टप्पा आहे. आजच्या महागाईच्या काळात सर्वसामान्यांना लग्नाचा खर्च व नियोजन करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. समाज ऋण व विवाह वेळी येणाऱ्या अडचणी या सर्व गोष्टींचा विचार करून आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली विवेकानंद प्रतिष्ठानच्या माध्यमातून सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करीत आहेत. आजपर्यंत ५५६ जोडपी विवाह सोहळ्यामध्ये विवाहबद्ध झाली आहेत व अनेक वधू-वरांच्या संसाराला गती दिली आहे. विवेकानंद प्रतिष्ठान सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे हे १ ३ वे वर्ष आहे. विवाह सोहळ्यासाठी अक्कलकोट शहरासह तालुक्यात, स्वामी विवेकानंद नागरी पतसंस्था, मल्टीस्टेट, लोकमंगल सुपर बाजार अक्कलकोट आदी ठिकाणी माहिती केंद्राची व्यवस्था करण्यात येते. या विवाह सोहळ्यात नोंदणी केलेल्या वधू-वरास विवाहाचे कपडे, वऱ्हाडी मंडळीच्या भोजनाची सोय, स्वतंत्र मेकअप करण्याची व्यवस्था, वधूस मणी मंगळसूत्र व जोडवे देण्यात येतात. ताट, वाटी, ग्लास प्रत्येकी ५ नग, स्टील हंडा, स्टील डबा, तांब्या आदी संसारोपयोगी साहित्य दिले जाते.

वधू- वरांची अक्कलकोट शहरातून मार्गावरून वरात काढली जाते. प्रत्येकाच्या धर्माप्रमाणे विवाह लावून दिले जातात. नवदाम्पत्यांना संसाराबद्दल योग्य समुपदेशन वैद्यकीय मार्गदर्शन केले जाते. सुखी संसारातून पहिली मुलगी जन्मात आल्यास मुलीच्या नावे २००० ची ठेव पावती देण्यात येते. विवाह सोहळा शिस्तबद्ध सुरेखरीतीने पार पडण्यासाठी प्रतिष्ठानच्या सदस्यांची वेगवेगळे समिती गठीत केल्या जातात त्याप्रमाणे प्रतिष्ठानचे सर्व सदस्य कार्य करीत असतात.

> विवेकानंद परिवार अनेक सामाजवि क उपक्रम राबविते यामध्ये रक्तदान शिबिर आरोग्य शिबिर रामदेव बाबाचे योग शिबिर गणेशोत्सव व्याख्यानमाला रद्दीतुन शिक्षण व गुणवंता विदयार्थ्यानां शिष्यवृत्ती देऊन आर्थीक मदत बेरोजगाराना पतसंस्था माध्यमातुन कर्जपुरवठा कोपीड काळात रुग्णाना उपचार गरीबाना अन्नधान्य किट वाटप असे अनेक सामाजिक उपक्रमाची बिजे विवेकानंद परिवाराने रोवली या बीजाचे आज मोठ्या वटवृक्षात रूपातंर झाले विवेकानंद परिवारान समाजाला समृद्धीकडे नेणारे नेतृत्व दिले. दिवेकानंद परिवाराचे सर्व सदस्यांनी सामाजसेवेचे व्रत अंगीकारले आहे . परिवाराचे सर्व सदस्यांनी सामुदायिक विवाह सोहळा तालुक्यात लोकचळवळ या पद्धतीने राबविण्याचा मापदंड बनविला.

---

# सोलापूरची चाटसंस्कृती..!!

**प्रत्येक शहरातील एखाद्या हॉटेलमधल्या.. एखाद्या ठेल्यावरच्या विशिष्ट पदार्थांची एक खासियत असते.. चव असते ज्यामुळे ती ठिकाणं पिढ्यानपिढ्या तिथल्या खाद्यप्रेमींसाठी 'हॉटस्पॉट' असतात.! तुम्ही पुणेकर असाल तर 'फर्ग्युसन' जवळच्या 'वैशाली'चा मसाला डोसा (सद्या पुण्यात फक्त मसाला डोशाचेच असंख्य प्रकार बनविणारी स्पेशलायझड हॉटेल्स आहेत पण वैशाली म्हणजे'या सम हा'.), नासिकचे असाल तर 'बुधा हलवाई'ची गरम गरम जिलेबी (उपासाची जिलेबी ही स्पेशालिटी) आणि सोलापूरकर असाल तर पार्कवरच्या 'भैया'ची पाणी पुरी !**

ही त्यातली काही प्रसिद्ध नावं.! तसं आपण प्रत्येक पाणी पुरी वाल्याला आणि 'चाट'वाल्याला भैय्याच म्हणतो. पण सोलापूरच्या ह्या पार्कवरील भैय्याशी सोलापूरची मागील साठ सत्तर वर्षांची खाद्यसंस्कृती निगडीत आहे. लहानपणी मी 'हरिभाई'चा विद्यार्थी असताना ह्या भैय्याच्या भेळ पाणीपुरीची पहिल्यांदा ओळख झाली. कारण त्याची 'हा' माल बनविण्याची भट्टी आमच्या शाळेच्या आवारात होती. मग मधल्या सुट्टीत डबा नेला नसेल तर तिथं जाऊन भेळपाणीपुरीवर ताव मारायचा. (त्यावेळी चार आण्याला वीस पाणीपुरी मिळायच्या आता वीस रूपयाला चार!)

ही भैय्याची गाडी मग चार वाजता पार्ककडे जायची आणि संध्याकाळी साडेसात आठपर्यंत रिकामी होऊन परत जाताना दिसावयाची..!

तसं चाट किंवा पाणी पुरी हा प्रकार उत्तर हिंदुस्थानी. पाणी पुरी हे मराठीतलं त्याचं चालू नाव असलं तरी त्याचं जन्मनाव 'गोलगप्पे' ( नाव आणि जन्मनाव हे माझं ज्योतिष शास्त्रीय ज्ञान!).

महाराष्ट्रात इतर ठिकाणी किंवा उत्तर हिंदुस्थानात तिची एक ठरलेली रेसिपी आणि चव असते. कोळशाच्या शेगडीवर रटरटत ठेवलेला रगडा आधी पुरी मध्ये भरायचा आणि त्यावर चिंच गूळाच तिखट मिश्रण असलेलं पाणी घातलं की झाली ही पाणी पुरी तयार..!

प्रत्येक शहराच्या आवडीनिवडी प्रमाणे त्यात थोडाफार बदल, पण बाकी 'मुळपीठ' वरचंच..णि अशी ही पाणी पुरी विकणारे उत्तर हिंदुस्थानी भैय्ये आज महाराष्ट्रातल्या प्रत्येक शहरात गल्लोगल्ली दिसतात. पण सोलापूरच्या ह्या भैय्याच्या पाणी पुरीची चव आणि लज्जत 'हटके' आहे जी बाहेर कुठेही चाखायला मिळत नाही...! चिंच गुळाबरोबरच हिरवी मिरची कोथिंबीर पुदिना आणि चाटचा मसाला ह्यांच्या 'कॉंबीनेशन' मधुन तयार झालेलं झणझणीत पाणी आणि व कांदा शेव किंवा बुंदीचे तरंग असणारी ही पाणी पुरी जेंव्हा एकामागोमाग एक आपल्या जिभेवर येते, तेंव्हा तिचा ठसका हिसका आणि तडका काही औरच असतो..! आणि अशी ही पाणी पुरी फक्त सोलापूरात आणि सोलापूरातच मिळते.!




तशी 'चाट'च्या प्रकारातली ही सगळ्यात धाकटी बहीण.. चटणी पुरी ही जुळी बहीण. भेळ ही सगळ्यात मोठी तर कचोरी पाव चटणी ह्या मधल्या बहिणी! म्हणजे भेळेपासून सुरवात करून पाणी पुरीनं ढेकर द्यायची ! त्यातल्या भेळ आणि कचोरी बरोबर मिळणारी 'चटणी' आणि तिची चव ही सोलापूरची आणखी एक खासियत. फुटाणे आणि डाळं ह्यांच्या मिश्रणाने बनवलेली थोडीशी घट्ट चटणी घातलेली कचोरी किंवा चटणी पुरी खाणं ही एक भन्नाट अनुभूती आहे...


कृष्णकेशव देशमुख


आजकाल पंचतारांकित हॉटेलमध्ये ही पाणी पुरीची 'डिश' 'सर्व्हं' केली जाते पण गाडी वर उभं राहून पाणी पुरी खाण्यात जे 'थ्रील' आहे ते मंद प्रकाशात, फोमच्या चेअरवर बसून प्लेटमध्ये खाण्यात अजिबात नाही....अशी ही अफलातून पाणी पुरी खाणं ही सुद्धा एक कला आहे! पाणी पुरी खाताना हाताच्या कोपरापर्यंत येणारं पाणी ओघळु न देणं आणि पुढची पाणी पुरी यायच्या आधी तोंडातली पाणी पुरी ठसका न लागता खाणं ह्याला एक कौशल्य लागतं जे कुठल्याही 'स्कील इंडिया' सारख्या स्कीम मध्ये ही मिळणार नाही..!

सोलापूरात मिळणारी भेळ आणि इतर शहरात मिळणारी भेळ यांच्या चवीत आणि ती तयार करण्याच्या कृतीत फारसा फरक नाही. चुरमुरे किंवा मुरमुरे , फरसाण कांदा टोमॅटो काकडी किंवा कैरीचे बारिक पीस हे ह्या भेळीचे कॉमन शिलेदार! पण भेळीला खरी चव आणि लज्जत हे सगळे शिलेदार जेंव्हा एखाद्या पातेल्यात एकमेकांच्या गळ्यात गळा घालतात आणि चिंच गुळाच्या पातळ चटणीत एखाद्या मोठ्या चमच्यानं फिरवल्यावर चिंब भिजतात तेंव्हाच चढते ! आणि त्यात बारीक शेवेचं आणि टोमॅटोच्या कापाचे प्रमाण थोडसं वाढवलं की झाली आपली सोलापूरची 'चमन भेळ' तयार ! पण ह्या भेळीला आपल्या सोलापूरात चमनभेळ का म्हणतात हे एक गुढचं आहे ..!!



चाटच्या गाडीवर मिळणारी कचोरी आणि पावचटणी ही मात्र फक्त आणि फक्त सोलापूरची खासियत आहे आणि त्यांच हे अफलातून कॉम्बिनेशन महाराष्ट्रात तुम्हाला कुठल्याही चाटच्या गाडीवर सापडणार नाही !

कचोरी हा तसा गुजरात राजस्थान इकडचा खाद्यपदार्थ. पण तिकडे मिळणारी कचोरी (तशी ती सोलापूरातल्या कुठल्याही 'स्वीट मीट मार्ट'मध्ये मिळते.) आणि सोलापूरात भेळच्या गाडीवर मिळणारी कचोरी या जुळ्या बहिणी असल्यातरी दोघींच रूप आणि अंतरंग मात्र सीता और गीतासारखं !

दोघीही दिसायला गोल गरगरीत असल्या तरी राजस्थानी कचोरीची 'स्कीन' जाडसर तर आपली सोलापूरी कचोरी नितळ अंगाची. मसाला ठासून भरलेली स्वीट मीट मार्ट'मध्ये मिळणारी कचोरी खुसखुशीत पण गोडसर स्वभावाची तर सोलापूरची गाडीवरची कचोरी , पोटात शेव कांदा आणि 'चिंगु चटणी' भरलेली तिखट आंबट तूरट..! सोलापूरकरांसारखीच अघळपघळ आणि मोकळ्या ढाकळ्या स्वभावाची! अशी ही शेलाट्या बांधाची रसरसलेली..

शेवकांद्याचा टोप घालून नटलेली आणि पावचटणीच्या स्लाईसवर विराजमान झालेली सोलापूरची कचोरी और एक दो भैय्या अशी फर्माईश होऊन आपल्या एकामागून एक पोटात गेली की ब्रम्हानंदी टाळी लागणं म्हणजे काय याची प्रत्यक्ष अनुभूती येत असते त्यानंतर टाळूला चिटकेपर्यंत आणि गळ्याला येईपर्यंत पाचपन्नास पाणीपुरया पोटात रिचवल्या की या 'चाट सोहळ्याची तृप्त सांगता होते ! आणि मग त्या रात्रीचं जेवणं 'कॅन्सल' होणार हे ओघाने आलंच !

एकंदरीतच सोलापूरच्या खाद्य विश्वात अशा खूप गोष्टी आहेत , ज्याच्यी चव आणि ढव सोलापूरा व्यतिरिक्त बाहेर फार क्वचितच आढळते. त्यामुळंच जगाच्या पाठीवर कुठेही गेलेला सोलापूरकर जेंव्हा सोलापूरात येतो तेंव्हा पहिल्यांदा त्याच पाऊल हमखास भेळपाणीपुरीच्या गाडीकडे वळतं !

सोलापूरातल्या ह्या पार्कवरल्या भैय्या ची (मोठ्या भैय्याच नाव आठवत नाही पण त्यांचा मुलगा नरसिंग भैय्या माझा मित्र होता तो ही वारला) आणि त्यानंतर तिसरी पिढीच्या आज शहरात दोन ठिकाणी दोन वेगवेगळ्या गाड्या झाल्या आहेत. (एक संगमेश्वर कॉलेजजवळ आणि दुसरी नव्यापेठेत ) पार्कवरच्या चौपाटीच रूपांतर 'चायना टाउन' झालेलं आहे.

सोलापूरच्या 'चाटसंस्कृती'च आदिस्थान असलेल्या ह्या भैय्याच्या गाडीबरोबरच डाकबंगल्याजवळची 'बाबुराव'ची भेळ गाडी , हुतात्मा बागेच्या गेटवरचा चव्हाण भैय्या आणि मुबारकची 'किटकॅट'ची गाडी , टिळक चौकातली 'जयभवानी'ची (माऊली स्वीटच्या मागे) भेळ गाडी ही सोलापूरातली चाटप्रेमींची आणखी काहीं चवीष्ट ठिकाणं ! ह्यातली काहीं आता बदलत्या काळाबरोबर नाहिशी झाली आहेत. दुपारी आवडती भाजी आणि शिकरण असल्यामुळे जेवण चापून झालय. संध्याकाळ झाली तरी पोट अजून गच्च आहे.. रात्री जेवणाची अजिबात इच्छा नाही !

तर मग कोणत्याही भैय्याच्या गाडीवर जाऊन दोन प्लेट पाणीपुरी खाल्ली की काय बिशाद आहे पोट 'नॉर्मल' न होण्याची..!! मी चाललोय.. येताय का तुम्ही?




**प्राचीन भारतातील शिल्पकलेची आधुनिक आवृत्ती म्हणजे सोलापुरात नव्याने उदयास आलेले अक्कलकोट रोडवरील चन्नवीर नगर येथील श्री वीरतपस्वी मंदिर. नव्याने तयार झालेल्या अक्कलकोट रोडवरील पुलावरून जाताना दुरूनच उंचच उंच दाक्षिणात्य पद्धतीचे गोपूर, गोपुरावरील सुंदर नक्षीकाम, स्फटिकाप्रमाणे चकाकणारे मंदिराचे कळस व गगनचुंबी मूर्ती पाहून आपोआपच पावले या मंदिराकडे वळतात. या भव्य-दिव्य मंदिराच्या निर्मितीसाठी तब्बल ३० वर्षे लागली असून बृहन्मठ होटगी संस्थानने याची निर्मिती केली आहे.**

# बृहन्मठ होटगी संस्थानचे वीरतपस्वी मंदिर

## (श्रावण विशेष)




प्रमोद रमेश हंचाटे

मुख्याध्यापक हिं.प्रा.शाळा

मो. ८१४९१८२१३५


### बृहन्मठ होटगी संस्थान

सोलापूर जिल्ह्यातील मौजे होटगी येथील श्री बृहन्मठ होटगी हे अति प्राचीन मठ आहे. श्रीशैल पीठाच्या अधिपत्याखाली या मठाचा कारभार चालतो इ.स.५ व्या शतकात या मठाचे अध्यक्ष श्री. ष. ब्र. मल्लिकार्जुन शिवाचार्य यांनी या मठाचे जीर्णोद्धार केले. याचे दस्तऐवज आजही मठात सुरक्षित आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात इ.स.१९२३ मध्ये या मठाच्या गादीवर श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य आरुढ झाले. यांचा जन्म ५ ऑक्टोबर १९०९ रोजी गुलबर्गा ( कलबुर्गी ) जिल्ह्यातील तळवारगेरी या गावात झाला. स्वामींचे बालपणीचे नाव सिद्धलिंगय्या हे होते. वीरेश्वर हे त्यांचे पिताश्री आणि गौरम्मा त्यांचे मातोश्री होत. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना सोलापूर येथील 'वारद संस्कृत पाठशाळेत' पाठविण्यात आले. त्यांची कुशाग्र बुद्धिमत्ता आणि संस्कृत भाषेच्या अभ्यासातील प्रगती पाहून कुलपती वे.पं.श्री. जगदीश शास्त्रीजींना अतिशय आनंद झाला. श्री. चन्नवीर स्वामी हे संस्कृत भाषेतील काव्यतीर्थ ही परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्याचवेळी बृहन्मठ होटगीचे सदभक्त मठासाठी अधिपतीची निवड करण्यासाठी श्री वारद संस्कृत पाठशाळेत आले तेव्हा शास्त्रीजींनी सदभक्तांना श्री चन्नवीर स्वामींची ओळख करून दिली. त्यांच्या ब्रम्हचर्याचे आणि विद्वतेचे तेज पाहून सर्व सदभक्त संतुष्ट झाले आणि श्री होटगी बृहन्मठाचे अधिपती म्हणून त्यांची निवड केली. त्यानंतर इ.स. १९२५ मध्ये श्री माळकवठा हिरेमठाचे अधिपती प.पू.ष.ब्र.श्री पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते श्री.ष.ब्र. चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी असे नामकरण करून त्यांना श्री होटगी बृहन्मठाचे अधिपती म्हणून महाभिषेक करण्यात आला. चन्नवीर शिवाचार्य स्वामींनी धर्माबरोबरच शिक्षणाचाही प्रसार केला. सोलापूरचे दानशूर भक्त श्री मल्लिकार्जुन वाकळे यांनी स्वतःच्या मालकीची उत्तर कसब्यातील जागा दिली. इ.स. १९३९ मध्ये मेंगाणे, भोगडे, थोबडे, हब्बू, हिरेहब्बू, मसरे इ.भक्तगणांनी आर्थिक सहाय्य देवून श्री. नागप्पा अब्दुलपूरकर यांच्या देखरेखीत कसब्यांचे बांधकाम पूर्ण केले. स्वामीजींनी तेथे 'श्री मव्दिरशैव गुरुकुल' नावाची संस्कृत पाठशाळा सुरू केली. व भवानीपेठत सिद्धलिंगाश्रम वसतिगृह सुरू केले. वीरतपस्वी महास्वामी दूरदृष्टीचे होते. त्यामुळेच त्यांनी इ.स.१९४५ साली एम.आय.डी.सी. जवळची अक्कलकोट रोड वरील ४८ एकर जमीन विकत घेतली. परंतु दुर्दैवाने ६ फेब्रुवारी १९५६ रोजी ते शिवैक्य झाले. ६ फेब्रुवारी १९५६ रोजी या मठाच्या गादीवर श्री.ष. ब्र. तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी आरुढ झाले. ते वीरतपस्वींच्या अतिशय जवळच्या सानिध्यात होते. त्यांनी वीरतपस्वी स्वामींचे कार्य अतिशय जवळून पाहिले होते. या अनुभवाच्या जोरावर तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य स्वामींनी आपल्या कार्याला सुरुवात केली. इ.स. १९५८ मध्ये त्यांनी बृहन्मठ होटगी संस्थानची स्थापना केली. व त्या अंतर्गत इ.स.१९८४ साली अक्कलकोट रोड येथील जागेवर श्री वीरतपस्वी शिक्षण संकुलची स्थापना केली व राहीलेल्या जागेत इ.स १९९० साली श्री वीरतपस्वी मंदिराची संकल्पना मांडून मंदिर निर्माण कार्यास सुरुवात केली.वीरतपस्वी मंदिराची स्थापना- तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य स्वामी यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट रोड येथील ३३ एकर जागेत इ स.१९९० साली सुरू झालेले मंदिर निर्माण कार्य इ.स.२००९ साली पूर्ण झाले. यासाठी तब्बल १९ वर्षाचा कालावधी लागला व त्यासाठी ६ कोटी रुपये खर्च आले. महास्वामींनी 'सिद्धांत शिखामणी' या पवित्र ग्रंथामधल्या स्थलानुरूप महादेवाचे पिंड, मंदिर बांधकाम, महाद्वार बांधकाम केले. ध्यानमंदिर, वीरतपस्वी मंदिर व आचार्य मंदिर या तिन्ही मंदिराची निर्मिती अतिशय कलात्मकतेने केली. या मंदिराच्या उद्घाटन समारंभाप्रित्यर्थ ४ मे २००९ ते १५ मे २००९ पर्यंत अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि.४ मे रोजी सकाळी ९ वा. श्रींच्या मूर्तीची मिरवणूक वीरतपस्वी मंदिराजवळ पोहोचल्यानंतर श्रीशैल पीठाचे जगद्गुरु सूर्यसिंहासनाधिश्वर श्री श्री श्री १००८ जगद्गुरु उमापती पंडिताराध्य शिवाचार्य यांच्या हस्ते गोपूरांचे उद्घाटन होऊन जगद्गुरुंचे गोवत्स समवेत महाद्वार प्रवेश झाला. त्यानंतर पाचही जगद्गुरूंच्या उपस्थितीमध्ये व सर्वपक्षीय राजकीय नेत्यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि.१५ मे रोजी 'श्री' च्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा, कळसारोहण, पूर्णाहुती, १३२ सामुदायिक विवाह सोहळा, लक्षदीपोत्सव, शोभेचे दारूकाम होऊन धर्मसोहळ्याची सांगता झाली.

मंदिराचा विस्तार-

मंदिराचे निर्माण कार्य पूर्ण झाल्यानंतरही तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्यानां समाधान लाभले नव्हते. त्यांनी लिंगोद्भव जगद्गुरु पंडिताराध्य यांची १०८ फुटाची मूर्ती, १००८ शिवलिंगाची प्रतिष्ठापना, १४ फुटाचा नंदी, १००८ सुवासिनी, १००८ पारायण करणाऱ्या भगिनी, सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा आदी कार्यक्रम करण्यासाठी संकल्प केला. त्यानुसार कार्यही सुरू झाले. परंतु त्यांना शरीर साथ देत नव्हते ते आजारी पडले. व थोड्याच दिवसात म्हणजे दि.२० डिसेंबर २०१७ रोजी ते अनंतात विलीन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचा संकल्प मठाधिपती श्री.ष. ब्र.धर्मरत्न डॉ. मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी यांनी पूर्ण केला. संकल्पसिद्धीचा दिमाखदार सोहळा १७ एप्रिल २०१८ ते २७ एप्रिल २०१८ या कालावधीत पार पडला.

### मंदिराचे वर्णन

श्री वीरतपस्वी मंदिराच्या परिसरात प्रवेश करण्यापूर्वीच दूर अंतरावरूनच दाक्षिणात्य पद्धतीचे गोपूर (महाद्वार) दृष्टीस पडते. कमानीतून आत शिरताच गोपूराच्या डाव्या व उजव्या बाजूस हत्तीचे ६ फुट उंच व ७ फुट लांब मूर्त्या तुमच्या स्वागतासाठी सज्ज दिसतात. १०८ फूट उंच महाद्वाराकडे मान उंच करून पाहताना क्षणभर आपण सोलापूरात नसून दक्षिण भारतात असल्याचा भास होतो. गोपूरावर विविध देवी-देवतांच्या सुंदर, सुबक मूर्त्या कोरण्यात आलेल्या आहेत. गोपूरच्या २०-२२ फुटी महादरवाज्यातून आत प्रवेश करताना ऐतिहासिक किल्ल्यात प्रवेश करत असल्याचे वाटते. आत प्रवेश करताच उजव्या बाजूस नजर फिरवल्यास वीरतपस्वी शिक्षण संकुलाची पसरलेली इमारत व डाव्या बाजूस श्री गुरु निवासाची पर्णकुटी दिसते. यामध्ये स्वामीजी व त्यांचे भक्तगण राहतात. महाद्वारातून उतरताच हिरवेगार बगीचा निर्माण करण्यात आला आहे. रंगी-बेरंगी सुंदर फुलांनी, झाडा- झुडपांनी सजलेल्या बागेने मंदिराच्या सौंदर्यात आणखी भर पडते. थोडे पुढे चालल्यानंतर सुबक नक्षीकाम केलेले ४१ फुटी धर्माची पताका फडकवत ठेवणारा ध्वजस्तंभ दृष्टीस पडतो. ध्वजस्तंभाच्या पुढे पाच मुख व दहा भूजा असलेले शिवशंकराची मूर्ती आहे. त्यासभोवताली कारंजाची रोषणाई करण्यात आली आहे. त्यापुढे लाल संगमरवरी दगडात कोरण्यात आलेला शिवशंकराचे वाहन नंदी आपले लक्ष वेधून घेतो. १०-१५ पायऱ्या वर चढून गेल्यानंतर मुख्य मंदिराला चिटकून बाहेरच्या पूर्व कोपऱ्यात श्री गणेशाचे व पश्चिम कोपऱ्यात जगदंबेचे छोटे मंदिर आहे. मुख्य मंदिरात प्रवेश केल्यानंतर जवळपास १ एकर जागेत विस्तीर्ण ध्यानमंदिराची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामध्ये एकाच वेळी १५०० ते २००० भक्त सहज ध्यान करू शकतात. ध्यानमंदिरानंतर गाभाऱ्याच्या पूर्व कोपऱ्यात विठ्ठल रुक्मिणीची सुबक मूर्ती व पश्चिम कोपऱ्यात गुरु शिष्यांची भित्तीचित्र कोरण्यात आले आहे. गाभाऱ्याच्या भिंतीला चिटकून सभोवताली जवळपास ४० देवी देवतांच्या मुर्त्या आहेत व त्यासमोरील जागेत वर्तुळाकार बारा ज्योतिर्लिंगाची स्थापना करण्यात आली आहे. या दोहोंच्या मध्ये सात-आठ फुटाचे प्रदक्षिणामार्ग सोडण्यात आले आहे.

मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करताच ६ फूट उंच व ९ फूट लांब असलेले पंचमुखी परमेश्वराचे भव्य- दिव्य लिंगाचे दर्शनाने पाहणाऱ्यांचे देहभान हरपते. ३६ बाय ३६ फुटाच्या भव्य गाभाऱ्यात परमेश्वर लिंगांच्या पाठीमागे श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य यांची ७ फुटी मूर्ती पाहिल्यानंतर स्वामींच्या अस्तित्व अजूनही मंदिरातच असल्याचे जाणवते. त्यांच्या आजूबाजूला श्री रेणुकाचार्य, श्री दारुकाचार्य, श्री एकोरामा, श्री पंडिताराध्य, श्री विश्वराध्या ऋषींच्या मुर्त्या कोरण्यात आले आहेत. मंदिराचे शिखर जमिनीपासून १०८ फूट उंच आहे.

मंदिराच्या मागील बाजूस जगद्गुरु पंडिताराध्य यांची १०८ फुटाची भव्य मूर्ती व मूर्ती समोर २० फूट नंदी व मूर्ती सभोवताली १००८ शिवलिंगाची रचना करण्यात आली आहे. व या सर्वांचे प्रवेशद्वार पाच मुख असलेल्या सर्पाच्या मुखातून करण्यात आले आहे. सुंदर व सुबक दगडी कलाकुसरीने नटलेला मंदिर परिसर, हिरवेगार बगीचा व उंच मूर्ती पाहिल्यानंतर या मंदिराला पूर्ण होण्यास ३० वर्षे का लागली याची उकल होते. मठाचे मठाधिपती श्री.ष.ब्र.चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या नेतृत्वाखाली तसेच काशी पिठाचे जगद्गुरु श्री श्री श्री १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्वराध्य शिवाचार्य महास्वामी यांच्या दिव्य नेतृत्वाखाली व संस्थेचे सचिव शांतया स्वामी व सर्व संचालक मंडळ हे अत्यंत परिश्रमाने उभारलेल्या या विस्तीर्ण परिसरात पसरलेल्या मंदिराचा डोलारा समर्थपणे सांभाळत आहेत.




### पर्यटकांचे आकर्षण-

श्रावणमास, महाशिवरात्री, गुरुपौर्णिमा व श्री वीरतपस्वी आत्मज्योत रथोत्सव निमित्त येथे मोठी यात्रा भरत असते. या काळात भाविक इतक्या मोठ्या संख्येने मंदिरात येतात की रस्ते बंद होतात. तसेच प्रत्येक गुरुवारी रात्री ८ वाजता श्री वीरतपस्वी पालखी निमित्य अनेक भाविक भक्तांची गर्दी होत असते. या मंदिरातील शिवलिंग, श्री वीरतपस्वी स्वामींची मूर्ती व अन्य सर्व देवतांचे दर्शन घेऊन भक्तगण कृतकृत्य होत असतात. स्थानिक पर्यटकांबरोबरच परगावाहून व परराज्यातून येणाऱ्या पर्यटकांना सुद्धा हे मंदिर एक पर्वणी ठरत आहे. परगावाहून व परराज्यातून येणारे पर्यटक सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिर व अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ मंदिरांना आवर्जून भेट देतात. वीरतपस्वी मंदिर हे या दोन्ही मंदिराच्या मार्गावर असल्याने येथे भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. भाविक आणि भक्तगण धार्मिक कार्यासाठी तर मंदिरात येतातच परंतु त्याचबरोबर अनेक पर्यटक वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना पाहण्यासाठी येथे भेट देतात. त्याचबरोबर मंदिरामध्ये बाग निर्माण करण्यात आली लहान मुले व वृद्ध यांचे आकर्षणाचे केंद्र बनले आहे.






क्रियाशील' महिला नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्ष सोलापूर जिल्हा युवती जिल्हाध्यक्षा सौ विनंतीताई अवधूत कुलकर्णी....

# राजकारणातून समाजकारण करणाऱ्या धाडसी महिला नेतृत्व विनंतीताई कुलकर्णी

**माढा तालुक्यातील उपळाई खुर्द या गावच्या क्रियाशील व धाडसी महिला नेतृत्व म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाच्या सोलापूर जिल्हा (ग्रामीण) महिला युवती जिल्हाध्यक्षा सौ विनंती अवधूत कुलकर्णी ह्या त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्यामुळे अल्पावधीतच परिचित झाले आहेत. त्यांनी राजकारणाची सुरुवात माढा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष माढा तालुका महिला अध्यक्षा हे पद भूषवल्यानंतर काही कालावधीतच त्यांनी आपल्या कामाच्या जोरावर सोलापूर जिल्हा युवती जिल्हाध्यक्षा हे पद मिळवले.**

---

महिलांचे सक्षमीकरण व्हावे महिलांचे अडीअडचणी दूर व्हाव्यात व त्या राजकारणात सक्रिय व्हावे या उद्देशाने सौ विनंतीताई कुलकर्णी यांनी राजकारणाच्या माध्यमातून समाजकारण सुरुवात केली.

**स्त्रियांचा आवाज बुलंद करणाऱ्या विनंतीताई कुलकर्णी....**

राजकारणाच्या माध्यमातून समाजकार्याच्या ध्यास असणाऱ्या व महिलांच्या सक्षमीकरणासाठी झटणाऱ्या विनंतीताई कुलकर्णी यांनी पदवी शिक्षणानंतर विधी शिक्षण पूर्ण करत जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिलांच्या प्रगतीसाठी युती जिल्हाध्यक्षा या पदावर राजकारणाबरोबर समाजकारण करत असताना त्यांनी राजकारणाच्या माध्यमातून समाजकारण करणाऱ्या युवा नेत्या म्हणून यांच्याकडे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिला मोठ्या अपेक्षेने पहात आहेत. महिलांनी राजकारणात यावे ही भूमिका मांडून एक वेगळी वाट निवडणाऱ्या सौ. विनंती अवधूत कुलकर्णी यांच्या आक्रमक आणि कल्पक नेतृत्वामुळे महिलावर्गामध्ये नव्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

**राजकीय क्षेत्रात काम करण्याची आवड....**

स्त्रियांनी सक्षम झाले पाहिजे. राजकारणात पुढे आले पाहिजे. राजकारणात राहून समाजकारण करता येते. प्रत्येकाच्या सुखदु:खामध्ये सहभागी होता येते, असं सर्वजण व्यासपीठावरून बोलत असतात. पण प्रत्यक्षात राजकारण आणि समाजकारण करण्यासाठी महिलांनी घराबाहेर पडण्याचे प्रमाण तेव्हढे नाही. पण सौ. विनंती अवधूत कुलकर्णी ह्या अपवाद ठरल्या आहेत. बीकॉम आणि एलएलबीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पूर्णवेळ राजकारण आणि समाजकारणात उडी घेण्याचा निर्णय घेणाऱ्या सौ. विनंतीताई यांना पूर्वीपासूनच या क्षेत्राची आवड होती. शिवाय राजकीय क्षेत्रात ओळख मिळविलेले घराणे सासर म्हणून मिळाले तर पतीचा खंबीर पाठिंबा मिळाल्याने त्या मनापासून राजकीय आणि सामाजिक कार्यात समरस झाल्या आहेत.

**पक्षातील दिग्गजांचा आदर्श डोळ्यासमोर....**

माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार साहेब, माजी खासदार तथा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील साहेब, संसद रत्न खासदार सुप्रियाताई सुळे विद्यमान खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सौ. विनंतीताई राजकीय कार्य करत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामधील समाजकारण, सर्वधर्मसमभाव याबद्दलची भूमिका त्यांना मनापासून आवडली. त्या आणि त्यांचे कुटुंब जातीभेद कधीच मानत नाहीत.

**मनुष्य ही एकच जात....**

मनुष्य ही एकच जात मानणाऱ्या सौ. विनंतीताई कुलकर्णी यांच्यामते, समाजाची सेवा करण्यासाठी राजकारणातून पाठबळ मिळते. या पाठबळाच्या जोरावर मुली व महिलांना सक्षम बनवण्यास मदत होते. महिलांचे प्रश्न मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होते. समाजाची सेवा करता येते. म्हणून त्यांना राजकारणाची आवड निर्माण झाली.

**सासरचा राजकीय वारसा....**

सौ. विनंतीताई कुलकर्णी यांना राजकीय वारसा त्यांचे सासरे कै. मधुकर नारायण कुलकर्णी यांच्यापासून मिळाला आहे. ते उपळाई खुर्द गावातील विविध कार्यकारी सोसायटीचे २५ वर्ष बिनविरोध चेअरमन व पंधरा वर्षे ग्रामपंचायत सदस्य होते. याबरोबरच शालेय जीवनापासून राजकारण व समाजकारण याची आवड असल्याने त्या आज राजकीय क्षेत्रात जनतेसाठी विविध विकास कामे करत आहेत.

**खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या माध्यमातून कार्य....**

ही विकास कामे खासदार धैर्यशील उर्फ भैय्यासाहेब मोहिते-पाटील यांच्या माध्यमातून करत असताना उपळाई खुर्द येथील गावदेवी मंदिरास निधीसाठी प्रयत्न केला आहे उपळाई खुर्द व परिसरातील गावांसाठी पाणीपुरवठा करण्यात त्या योगदान देत आहेत. शेतकऱ्यांना सुरळीत वीजपुरवठा व्हावा यासाठी रास्ता रोको करून शेतकरी व उद्योगधंद्यासाठी लाईट मिळावी यासाठी प्रयत्न करत आहेत.



**सामाजिक बांधीलकीतून रक्तदान शिबिर**

शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने रक्तदान शिबिर घेऊन 'रक्तदान हेच श्रेष्ठदान' असल्याने शिवतेजसिंह मोहिते विनंतीताई यांनी १०२ जणांचे रक्तदान करवून घेत सामाजिक बांधिलकी जपली आहे. तसेच गावातील जिल्हा परिषद वस्ती शाळेतील विद्यार्थ्यांना साऊंड सिस्टिम दिल्या अनेक गोरगरीब विद्यार्थ्यांना आजपर्यंत जे जे शक्य आहे ते ती मदत केली गोरगरिबांच्या लग्नासाठी मदत करता आली गरजूंना वैद्यकीय मदत केली. मस्साजोग येथे कै सरपंच संतोष देशमुख कुटुंबियाला भेट देऊन त्यांच्या लढ्यास विनंतीताई यांनी आपला पाठिंबा दिला आहे. आंतरवाली सराटी येथे मराठायोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणात त्यांनी सक्रिय सहभाग सहभाग घेतला आहे.

**ग्रामपंचायती निवडणुकात सहभाग....**

गेल्या पाच वर्षापासून ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये सक्रिय होत असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवती माढा तालुका अध्यक्ष झाल्यापासून त्यांना पूर्णवेळ पक्षाचे काम करता आले. त्यांनी केलेल्या तालुकास्तरावरील कामाची दखल घेत खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार अभिजीत आबा पाटील, आमदार नारायण आबा पाटील यांनी उपळाई खुर्द गावामध्ये सत्कार समारंभासाठी येऊन जिल्हाध्यक्षपद देत त्यांच्यावर फार मोठा विश्वास दाखवला आहे. खासदार सुप्रियाताई, सक्षणाताई, शितलदेवी मोहिते पाटील यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सौ. विनंतीताई ह्या महिला महिलांच्या सुखदु:खामध्ये सहभागी होण्याचा प्रयत्न करत तालुक्यातील आणि जिल्ह्यातील गोरगरीब महिलांसाठी काम करण्यासाठी त्या प्रयत्न करत आहेत. सौ. विनंतीताई यांच्या वाढदिवसाच्या दिवशी पंढरपुरातील नवरंगे अनाथ मुलींचे बालकाश्रम यांना जेवण देत त्यांनी आपला वाढदिवस साजरा केला. त्याचे त्यांना मनस्वी समाधान वाटले. तसेच आत्ता सुरू असलेल्या राजमाता जिजाऊ रथयात्रेचे स्वागत पूर्ण सर्व महिला भगिनी व गावातील नागरिकांच्या मदतीने उत्स्फूर्तपणे केले.

**महिला व मुलींसाठी विविध विकासकामे....**

भविष्यात महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिर,
युवती व महिलांसाठी गृह लघुउद्योग
विद्यार्थिनींसाठी मुलींचे वस्तीगृह

एमपीएससी यूपीएससी करणाऱ्या विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनालय उभारण्यासाठी प्रयत्न सुरू महिला सक्षमीकरणासाठी लघुउद्योग उभारण्याचा मानस असून त्यासाठी त्या लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा करणार आहेत.

**भगवान परशुराम पुरस्कार प्राप्त....**

सौ.विनंतीताई कुलकर्णी यांना नुकताच त्यांच्या कामाची दखल घेत सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल भगवान परशुराम या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हे त्यांनी केलेल्या कामाची एक पोचपावतीच म्हणावी लागेल.



# कामगार पुत्र ते डॉ. कुमारदादा करजगी : एक संघर्षमय प्रवास

**समाधानाच्या छताखाली झोपलो असतो तर स्वप्न पूर्ण झाले नसते म्हणून मी संघर्षाच्याच गावामध्ये वस्ती केली, वाट सोपी नव्हती निवडायची म्हणून निवडली नाही छोट्याश्या होडीने खवळलेल्या सागराशी कुस्ती केली माझ्या पायाच्या कातड्यानी रूतणाऱ्या काट्याशी दोस्ती केली तेंव्हा कुठे नशिबाने दिवस बदलायची तसदी केलीअसा एक संघर्षमय प्रवास म्हणजे एक मिल कामगार पुत्र ते डॉ.कुमारदादा करजगी गिरणगावातील गिरणी कामगारांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी दादा पुढे आले.दादांनी मिलच्या गेटसमोर सुरु केलेल्या आंदोलनाची दखल मिल मालकाने घेतली नाही पण दादांच्या अथक संघर्षाची दखल हायकोर्टाने व भारतातील वृत्तपत्र समूहातील एक अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या ' टाईम्स ऑफ इंडिया 'ने घेतली आणि दादांच्या संघर्षाला यशस्वी करून गेली.या यशस्वी लढ्यानंतर दादांनी आता दुसरे स्वप्न पाहिले होते.**

---

सोलापूर ही उद्योगनगरी बनावी.त्यासाठी सोलापूरात उच्चदर्जाचे शिक्षण देणारी संस्था निर्माण करून होतकरू मुलांना दर्जेदार शिक्षण व इथेच त्यांच्या हाताला काम मिळवून देणे.या गोष्टीचा विचार करीत असताना दादांवर एक अस्मानी संकट कोसळले.त्यांचा एकुलता एक मुलगा देवाने हिरावून नेला.यातून बाहेर पडण्यासाठी त्यांनी देवाशीच संघर्ष करायचे ठरविले.तू माझा एक मुलगा नेला म्हणून काय झाले उद्या मी हजारो मुलांचे पालकत्व निभावेन अशी भूमिका मांडत असताना पुण्यातील एक नामांकित शिक्षण संस्था सोलापुरात शिक्षण संकुलासाठी जागा शोधत होती.त्या संस्थेला दादांनी स्वत:च्या मालकीची मोफत १० एकर जागा स्व.नागेश करजगी यांच्या स्मरणार्थ दान दिली.त्या संस्थेने १० एकर जागेवर स्व.नागेश करजगी ऑर्किड इंजिअरिंग कॉलेजची उभारणी करून तत्कालिन भारताचे मिसाईल मॅन अशी ओळख असणारे माजी राष्ट्रपती डॉ.अब्दुल कलाम यांच्या हस्ते कॉलेजचे उदघाटन केले..आजच्या घडीला हे कॉलेज भारतातील उत्कृष्ट कॉलजेच्या यादीत ३६ व्या क्रमांकावर आहे.तरी देखील दादांच्या मनात खंत होतीच माझ्या मुलाची उणीव भरून काढण्यासाठी रोज हजारो मुलं दादांच्या नजरेसमोर असणे गरजेचं होतं.म्हणून दादांनी २०१२ साली नागेश करजगी ऑर्किड स्कुलची उभारणी केली.सुरुवातीला १३१ विद्यार्थ्यांपासून सुरु झालेली शाळा आज १९०० हुन अधिक विद्यार्थ्यांना घडवीत आहे.या शाळेतून जगाशी स्पर्धा करणारा विद्यार्थी घडला पाहिजे अशी खूणगाठ दादांनी बांधली होती.





ही दुसरी लढाई सन २०१२ मध्ये पूर्ण होताना दिसत होती. दादांनी नेत्रदीपक अशी नागेश करजगी ऑर्किड स्कुलची इमारत,यामध्ये सोलापुरातील पहिले डिजिटल इंटरऍक्टिव्ह क्लास रूम,पहिले वन टू वन डिजिटल लर्निंग लॅब,टॉकिंग ट्री,सुसज्ज संगणक लॅब,रोबोटीक लॅब,प्रशस्त असे क्रिडांगण,सर्व सोयीयुक्त प्रसाधन गृहे,आर.ओ.युक्त शुद्ध पिण्याचे पाणी अशा दर्जेदार सुविधा या शाळेतून दिल्या जात आहेत.

कोरोना काळात संपूर्ण शिक्षण व्यवस्था मोडकळीस येत असल्याचे चित्र आपल्या समोर निर्माण झाले होते. पण दादांनी आपल्याशाळेतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून विद्यार्थ्यांसाठी शाळेच्यावतीने ९९९ क्रमांकाने स्वतंत्र असे टी.व्ही.चॅनेल सुरु करून कोरोना काळात देखील शिक्षणाची संधी निर्माण करून दिली.

आज नागेश करजगी ऑर्किड स्कुल मध्ये आर.एस.पी.व स्काऊट गाईड च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना परराज्यातील ठिकाणांना भेटी देऊन तिथली संस्कृती, आचार विचार,खाद्य प्रकार यांची ओळख करून देण्यात येते. आपल्या शाळेतील विद्यार्थी सदृढ व सक्षम बनला पाहिजे म्हणून दादा प्रत्येक वर्षी शाळेत नेत्र व दंत तपासणी,आरोग्य शिबिराचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते.विद्यार्थ्यांना अर्थकारण समजावे म्हणून शाळेत दोन दिवशीय फन फेअर चे आयोजन केले जाते ज्यातून विद्यार्थी कोणाचीही मदत न घेता आपले स्वत:चे ज्ञान वापरून व्यवहार करतात.या सर्व उपक्रमामागे दादांचे एकच ध्येय असते ते म्हणजे माझा विद्यार्थी भविष्यात कितीही संकटे आली तरी तो लढला पाहिजे आणि स्वत:च्या पायावर उभा राहिला पाहिजे.

शाळेतील प्रत्येक समारंभात दादा कायम सांगत असतात. 'झुंजायचं असेल तर भीतीला मागे ठेवा,स्वप्नांसाठी लढा,एक दिवस तुमचाच असेल..'दादांच्या या शिकवणी नुसार शाळेतील विद्यार्थी

तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या गुणवत्तेचा दर्जा सिद्ध करीत आहेत. शाळेचे माजी विद्यार्थी जे आता उच्च शिक्षण घेत आहेत असे ओम अवस्थी याने डायव्हिंग मध्ये तर कु. आर्या यादव हिने कराटे या ऑलंपीक खेळ प्रकारात आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट खेळाडू म्हणून त्यांनी मेडल मिळिवले आहेत. त्याच बरोबर अनेक विद्यार्थी आज शाळेच्या माध्यमातून जिल्हास्तरीय,राज्यस्तरीय राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत सहभागी होत आहेत व आपल्या कौशल्याच्या जोरावर आपल्या कामगिरीचा ठसा उमटवित आहेत. शिक्षण विभागात घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षेत उत्तुंग असे यश विद्यार्थी कायमच प्राप्त करीत असतात.या विद्यार्थ्यांच्या कर्तबगारीने शाळेचा नावलौकिक वाढत चालला आहे.त्याच बरोबर शाळेच्या सर्व शिक्षकांच्या अनुभवी मार्गदर्शनाने चित्रकला,संगीत,नृत्य आधी क्षेत्रात विद्यार्थी आपले कलाविष्कार सादर करून आपल्या कलेला न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहेत.या सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना आपल्या चातुर्याच्या जोरावर एकसंघ ठेवणाऱ्या शाळेच्या प्राचार्या रुपाली हजारे यांनी पॅरिस येथील सेमिनारमध्ये आपल्या शाळेचे व आपल्या अनुभवाचे विचार आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचवून नागेश करजगी ऑर्किड स्कुल ही आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यास यशस्वी ठरले आहेत. या सर्व विभागाच्या जोरावर आजपर्यंत शाळेस आंतरराष्ट्रीय स्तरावर मानाचे समजले जाणारे आय.यू.ई.एफ.थर्ड रिजनल कॉनक्लेव अँड एज्युकेशन एक्सलन्स अवॉर्ड,आय.यू.ई.एफ तर्फे देण्यात येणारा उत्कृष्ट नियोजन बद्ध शाळा म्हणून बेस्ट पॅडेमिक मॅनजेड स्कुल अवॉर्ड,शाळेतील शिक्षण पद्धतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला म्हणून आय.यू.ई.एफ. तर्फे बेस्ट डिजिटल स्कुल अवॉर्ड, तसेच या सर्व विभागांना व्यवस्थितपणे हाताळून आणि योग्य मार्गदर्शन करणाऱ्या बेस्ट प्रिंसिपल म्हणून आय.यू.ई.एफ. बेस्ट प्रिन्सिपल ऑफ द इयर अवॉर्ड,त्याच बरोबर यावर्षीचा मिमांसा स्कुल अवॉर्ड प्राप्त झालेले आहेत.

दादांच्या कार्याची दखल घेत दादांना आजपर्यंत महात्मा गांधी इंटरनॅशनल अवॉर्ड,भारत विद्या रतन अवॉर्ड,संगीत कला मंच कडुन जीवनगौरव आणि सर्वात महत्वाचा म्हणजे दादांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची दखल अमेरिकेतील कॅलिफोर्निया पब्लिक युनिव्हर्सिटीने घेऊन त्यांना शिक्षण क्षेत्रातील ' डॉक्टरेट' पदवी दिली.दादांच्या या यशोगाथेबद्दल सांगायचे म्हणाल्यास एवढेच म्हणता येईल की,' मावळताना आपण सूर्य आहोत याची जाणीव जपता यावी,कधी क्षितिजा पलीकडे जाण्याची तयारी ठेवता यावी,ठेवता यावी धमक मनगटात विजयी केशर उधळण्याची तोपर्यंत तत्व आणि अस्तित्वाची लढाई लढता यावी..'



डॉक्टरेट पदवी घेताना आनंदाचा क्षण.



Talking Three Classroom




Robotics Lab




# निसर्ग संवर्धनासाठी झपाटलेला एक अवलिया



**डॉ. मनोज देवकर**
(पर्यावरण दूत इको नेचर क्लब)

डॉ. मनोज देवकर Botanist यांची ट्री मॅन म्हणून सर्वत्र ख्याती आहे. असा एक निसर्ग संवर्धनासाठी झपाटलेला 'ट्रीमॅन' ३६५ दिवस निरंतर वृक्ष लागवड व संवर्धनासाठी कार्यरत असणारे इको नेचर क्लब निसर्ग संवर्धन सहकारी संस्थेचे मुख्य प्रवर्तक आहेत या संस्थेच्या माध्यमातून अनेक पर्यावरण मित्र विद्यार्थी , संस्था,शिक्षक वर्ग अधिकारी वर्ग यांना एकत्रित करून हा पर्यावरण संवर्धनाचा चळवळ ही मोठ्या प्रमाणात उभी केलेली आहे शासनाच्या विविध पुरस्काराने व विद्यापीठाच्या पर्यावरण दूत म्हणून ओळखले जाणारे मनोज देवकर हे सातत्याने नागरिकांमध्ये पर्यावरणाची आवड वृक्ष लागवडीसाठी सर्वांना प्रोत्साहित करत आहेत . या पर्यावरण चळवळीमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांनी आवाहनही केलेले आहे या चळवळीमध्ये सहभागी होण्यासाठी या क्रमांकावर ९६२३५३८९९९ तुम्ही संपर्क साधून पर्यावरण मोहिमे मध्ये सहभागी होऊ शकता..



दैनिक सोलापूर तरूण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!


ना कोणत्या पक्षाचा.. ना कोणत्या धर्माचा.. महासंघ फक्त चालकांचा...

**वाहतूक संघटना संयुक्त महासंघ**
महाराष्ट्र राज्य
VAHTUK SNGHATNA SANYUKTA MAHASANGH
मुख्य कार्यालय : ३२ डी. दक्षिण सदर बाझार, मौलाली चौक, सोलापूर



महासंघ बिनव्याजी सोसायटी
पत्ता : कादरी हॉस्पिटलसमोर कुमठा नाका रोड, नई जिंदगी, सोलापूर

मा. रियाजभाई सय्यद
प्रदेश अध्यक्ष
शुभेच्छुक
वाहतूक संघटना संयुक्त महासंघ सर्व पदाधिकारी



दैनिक सोलापूर तरूण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

**श्रध्दा एंटरप्रायजेस**
बि - बियाणे, किटक नाशके, रासायनिक खते, ॲस्पी स्प्रे पंप्स्, महाबीज अधिकृत विक्रेते.
अधिकृत विक्रेते
महाबीज
ASPEE SPRAYERS
महाबीज, इफ्को एमसी, पारीख सीडस् गुजरात, गंगा कावेरी सीडस्
१, उत्तर कसबा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पांजरापोळ चौक, सोलापूर
प्रोप्रा, विजयकुमार सी. कुसेकर
Mo. : 9822 25 8746, 9370 82 5008, 9850 24 0760

तरुण भारत
वर्धापन दिनास आमच्याही लाख-लाख शुभेच्छा!
- शुभेच्छुक -
**सोलापूर जिल्हा भूमी अभिलेख सेवकांची सहकारी पतसंस्था, सोलापूर**
चेअरमन शिवदास शितोळे
व्हा.चेअरमन संजय उंब्रजकर
व सर्व संचालक मंडळ, सोलापूर

तरुण भारत
दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

मंद्रुप येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी क्र.१ च्या चेअरमनपदी दत्तात्रय रजपूत तर व्हाईस चेअरमनपदी शकुंतला शिळ्ळे यांची निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन..!



मार्गदर्शक मा.सिद्राम हेळकर, तंटामुक्ती अध्यक्ष
मार्गदर्शक मा.बाळु उत्तरे, भाजपा नेते
मा.सुभाष (बापू) देशमुख, आमदार, दक्षिण सोलापूर
मा.रेवणसिध्द मेंडगुदले
मा.गौरीशंकर मेंडगुदले
मा.मनीषभैय्या देशमुख, युवा नेते



मा.दत्तात्रय रजपूत
चेअरमन

संचालक मंडळ : शरणप्पा ख्याडे, निखिल देशपांडे, विठ्ठल राठोड, बाळासाहेब कोरे, मदप्पा ख्याडे, रेवणसिध्द हेळकर, दुंदव्वा नंदुरे, अमोगसिध्द काळे, चंद्रकांत मायनाळे, मळसिध्द शेंडगे

हेमंतकुमार स्वामी, भगवान व्हनमाने, प्रभाकर कोरे, पिरप्पा शिंगडगाव, आप्पु शास्त्री, सातप्पा जोडमोटे, महादेव लोभे, धरेप्पा म्हेत्रे, महादेव शिळ्ळे, चंद्रकांत ख्याडे, आप्पाशा शिळ्ळे, कांतु नंदुरे, शिवराज कालदे, शिवपुत्र जोडमोटे, दयानंद ख्याडे, शिवानंद लोभे, महेश मेंडगुदले, निलेश होळकर, रवी शिळ्ळे, महेश हेळकर, सौ.भारती नंदुरे, राजकुमार रजपूत, प्रभूलिंग नरूटे, शिवानंद मोघलाई, भिमा म्हेत्रे, आप्पासाहेब सिंदखेडे, शिवाल नंदुरे,
सचिव : महिबूब पठाण



मा.शकुंतला शिळ्ळे
व्हा.चेअरमन

शुभेच्छुक : विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी क्र.१ मंद्रुप

तरुण भारत
जाहिरात आपली, सन्मान महाराष्ट्राचा
सोलापूर तरुण भारत
४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

QUALITY ELECTRICALS
A/12 Vidya Vihar, Near Pankha Bawadi, 162/17, Rly. Lines, Solapur - 413 001
Email: pethequality@yahoo.co.in ● qualityelect11@gmail.com
V.R. Pethe
B.E. (Elec.)
(0217) 2311149
9850077799




# साक्षात्कारी संत
# श्रीगुरुदेव प्रो रा. द. रानडे

**गुरुदेव रा. द. रानडे यांच्या संप्रदायाला निंबरगी संप्रदाय असे म्हणतात. कारण तो निंबरगी महाराजांच्या नावाने सुरू झाला आहे. निंबरगी महाराज हे गुरुदेवांचे आजेगुरू. या संप्रदायात देण्याला महत्त्व आहे, निंबरगी महाराज सांगतात कधीही कोणापुढे हात पसरायचा नाही. एकदा श्रीगुरुदेवांचे गुरु श्रीभाऊसाहेबमहाराज यांनी भजन चालू असताना त्यांचे शिष्य कन्नूरचे स्वामी त्यांच्या डोक्यावर त्यांचे दोन हात धरले. हे कन्नूर स्वामी जंगम होते व ते भिक्षा मागत असत. त्यांनी महाराजांना विचारले आपणअसे का केले? तर श्रीभाऊसाहेब-महाराजांनी कन्नूर स्वामीनां सांगितले, 'तू आता भिक्षा मागणे सोडून दे' तुला आता काहीही कमी पडणार नाही. नंतर एकदा श्रीभाऊसाहेबमहाराज कन्नूरस्वामींच्या शेतावर गेले होते. तेथे एक जागा दाखवून स्वामीनां म्हणाले की येथे विहीर खण. त्या दुष्काळी प्रदेशात विहिरीला पाणी लागले व कन्नूरस्वामींच्या शेतात अमाप पीक येऊ लागले. कन्नूरस्वामींनी भिक्षा मागणे सोडले. देवासाठी दिले तर देव आपल्याला भरभरून देतो. सर्व संत आपल्याला 'देत राहा' असेच सांगतात.**

गुरुदेव रा. द. रानडे यांची माहिती सर्वांना आहेच. आदर्श विद्यार्थी, नाणावलेले शिक्षक, विद्वान लेखक, साक्षात्कारी संत ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची विविध अंगे सर्वश्रुत आहेत. पण सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी 'गुरुपण' जे अनेक जणांनी मिरवले तसे कधीच मिरवले नाही. ते अत्यंत नम्र होते. अलाहाबाद विद्यापीठात असताना उपनिषदावरील पुस्तकांची च.. च्या विद्यार्थ्यांना मोठीच्या मोठी यादी त्यांनी लिहून दिली पण तेथे स्वतःच्या पुस्तकाचा उल्लेख कटाक्षाने टाळला. एकदा असे झाले की संस्कृतच्या एका प्राध्यापकांच्या हातात ती पुस्तकांची यादी पडली, ती वरून नजर फिरवल्यावर ते विद्यार्थ्यांना म्हणाले की, 'प्रोफेसर रानडे यांनी स्वतः उपनिषदावर पुस्तक लिहिले आहे ते तर तुमच्या या यादीत कुठे दिसत नाही.' विद्यार्थी गुरुदेवांकडे आले व विचारू लागले की सर, तुम्ही तुमचे स्वतःचे उपनिषदावरील पुस्तक या यादीत का सांगितले नाही ? यावर गुरुदेव म्हणाले, मी स्वतः तो विषय शिकवतो आहे मग त्या पुस्तकाची जरूरी काय ? उेपीर्ीीलींळींश डीींशू जष णरिपळीहरवळल झहळश्रेीहू या गुरुदेवांच्या ग्रंथाने गुरुदेवांची कीर्ति जगभर झाली. तो पर्यंत पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या पारिभाषिक शब्दात उपनिषदातील तत्त्वज्ञान कोणी सांगितले नव्हते. त्या तत्त्वज्ञानाला गुरुदेवांनी नवा वेश चढवला.

गुरुदेवांचे चरित्र वाचताना आपल्याला पावलोपावली जाणवते की त्यांनी स्वतः केलेल्या कामाचे श्रेय नेहमी दुसऱ्याला दिले. तो त्यांचा स्थायीभाव होता. स्वतःचा उल्लेख ते कटाक्षाने टाळत असत .पुण्याची जी भांडारकर संस्था आहे तिच्या उभारणीत डॉक्टर बेलवलकर व गुरुदेव यांचा फार मोठा वाटा होता. संस्थेच्या पहिल्या कार्यकारिणीचे गुरुदेव सभासद होते .गुरुदेवांनी प्राच्यविद्या संशोधन मंदिर नावाचा एक प्रदीर्घ लेख लिहिला आहे. त्या लेखात संस्थेची मूळ कल्पना बैठका, चर्चा इत्यादीची सविस्तर हकीकत लिहिली आहे .पहिल्या कार्यकारणीच्या सभासदांची मोठी यादी पण दिली आहे पण त्या यादीत स्वतःचे नाव कुठेही लिहिलेले नाही. जे जगा धाकुटे होईजे/ तै जवळिक माझी /या उक्तीप्रमाणे गुरुदेवांनी धाकुटे पण स्वीकारून भगवंताची जोड करून घेतली.

विद्यार्थ्यांबद्दल - त्यातूनही गरीब विद्यार्थ्यांबद्दल गुरुदेवांना फार प्रेम होते. ७-८ विद्यार्थी कायम त्यांच्या घरी मुक्कामाला असत. अवती-भोवती विद्यार्थी असलेले



गुरुदेवांना फार आवडे. विद्यार्थ्यांना तर गुरुदेवांच्या घरी राहणे ही सुवर्णसंधी वाटे. शिवनारायण सराफ हा नागपूरचा विद्यार्थी. एकदा सकाळी तो गुरुदेवांकडे मदत मागायला आला. त्याला थांबायला सांगावे असा गुरुदेवांनी निरोप दिला परंतु आपण त्याला थांबायला सांगितले आहे हे गुरुदेव विसरले. तो विद्यार्थी दुपारपर्यंत वाट पाहत बसला. एकदम गुरुदेवांना आठवण झाली आणि त्यांनी शिवनारायण यांस बोलावले व म्हणाले, 'तू थांबला आहे हे मी विसरून गेलो रे, चूक झाली' तुझ्या चिकाटीचे कौतुक वाटते. ताबडतोब माझ्या घरी राहायला ये व अभ्यास सुरू कर.' त्या विद्यार्थ्यास किती आनंद झाला हे सांगायला नकोच.

गुरुदेवांचे विद्यार्थी म्हणत, प्रोफेसर रानडे यांना ऋळींीं शिीिप ेिळपर्सीश्ररी हे सर्वनाम माहीत नव्हते. ख, श या शब्दांना त्यांच्या कोशात जागाच नव्हती. गरीब, होतकरू मुलांना शिक्षण देऊन त्यांना मार्गाला लावण्याचे महत्तकार्य ते अगदी सहजासहजी करत. विद्यार्थ्यांची सर्वोतोपरी काळजी घेत. गुरुदेव म्हणत, 'ढहश डरळपीं हे ळी पीें ेलळरश्रश्रू ीशर्षीश्र ळी पीें र डरळपीं रीं रश्रश्र.' (जो संत समाजाच्या उपयोगी पडत नाही तो संत नाही.)

गुरुदेवांचे सर्वांवर सारखे प्रेम होते. तरी प्रत्येकाला असे वाटायचे की सगळ्यांपेक्षा माझ्यावरच गुरुदेवांचे जास्त प्रेम आहे. गुरुदेव अलाहाबाद येथे असताना च.. तत्त्वज्ञान विषयाला २०० हून अधिक विद्यार्थी होते. गुरुदेव व अलाहाबाद यांच्या संबंधांचे 'परस्परं भावयन्तः' अशाच शब्दात वर्णन होईल. आपणा सर्वांना संत गुरुदेव माहीत आहेत पण अलाहाबाद विद्यापीठातील प्राध्यापक, कुशल प्रशासक कसे होते हे ठाऊक नाही. आपल्याजवळ असलेल्या अधिकाराचा त्यांनी कधीच गवगवा केला नाही की कधीच कृत्रिम शिष्ठाचाराचे बंधन कोणाला घातले नाही. विद्यापीठाच्या कामकाजासाठी कनिष्ठ अधिकाऱ्याने आपल्याकडे यावे अशी त्यांची अपेक्षा नसे. ते स्वतः त्यांच्याकडे जात. एकदा कार्यकारणीच्या सभेच्या कार्यसूचीवर काही जटिल मुद्दे आले होते. तेव्हा सकाळी सकाळी ते सहाय्यक कुलसचिव पंडित के. के. तिवारी यांच्या घरी गेले. तिवारी अनुभवी व निपुण होते. त्यांना सर्व कामाची माहिती असे. उपकुलगुरू स्वतः आलेले पाहून तिवारी स्वागतासाठी धावत बाहेर आले. त्यांनी दोन तास गुरुदेवांबरोबर विचारविनिमय केला व गुरुदेव घरी परतले. प्रसंगी आपल्या सहकाऱ्यांकडे गुरुदेव जात. त्यांच्या सहकाऱ्यांना ती पर्वणी वाटे. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात दिसणारी त्यांची समन्वायाची वृत्ती जीवनाच्या हर एक क्षेत्रात दिसे.

अगदी लहानतल्या लहान गोष्टीवरून देखील गुरुदेवांचे सुसंवादावरील प्रेम स्पष्ट दिसे. त्यांना बेशिस्त, अव्यवस्था किंचितमात्रही चालत नसे. प्रत्येक लहान मोठया वस्तूची जागा निश्चित झालेली असे. त्यात कणभर बदल झाला तरी तो त्यांना खपत नसे.




डॉ. अश्विनी जोग
लेखिका
सोलापूर


अनेक वर्षे गुरुदेव अलाहाबाद येथे २ बेली रोड या भाडयाच्या घरात राहात होते. नंतर त्यांनी नवीन घर बांधले. हे नवीन घर म्हणजे त्यांच्या पूर्वीच्या भाडयाच्या घराची प्रतिकृतीच होती. तेव्हा एका विदयार्थ्याने त्यांना प्रश्न विचारलं की तुम्ही नवीन पद्धतीने घर का बांधले नाही? त्यावर गुरुदेव म्हणाले, 'जुन्या सवयी अंगात मुरलेल्या असतात. त्याजागी नवीन सवयी आणणे म्हणजे वेळ व श्रम यांचा अपव्यव. प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ विल्यम जेम्स म्हणतो सवयीने काम सहज करता येते. कामात दोष राहात नाही आणि श्रमही कमी होतात. माणूस सवयीचा गुलाम असतो आणि शरीराला व मनाला नवीन वळण लावणे हे फार जिकिरीचे असते. त्यामुळे सर्व कामातील सहजता बिघडते. निंबाळ येथील १९४२ साली बांधलेले घर जुन्या घराचीच आवृत्ती आहे. अशी अनेक मानसशास्त्रीय तत्त्वे त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणली होती. तत्त्वज्ञाना सारखा रुक्ष विषय कंटाळवाणा होऊ नये म्हणून मधून मधून ते हलकी-फुलकी वाक्ये उच्चारीत व मधून मधून हास्य विनोद करित, त्यामुळे मुलांना कधी कंटाळा आला नाही.' एका चरित्रकाराने त्यांचे वर्णन 'हासरे तत्त्वज्ञ' असे केले आहे.

गुरुदेवांकडून ज्यांनी नाम घेतले ते सर्व एकमेकांचे गुरुबंधू किंवा गुरूभगिनी होत. या शब्दातूनच या सर्वांची एकमेकांबद्दल काय भावना असेल ते कळते. पारमार्थिक धाग्यांनी बांधलेले हे पवित्र नाते रक्ताच्या नात्यापेक्षाही अधिक मोलाचे वाटते. एकदा एक गंमत झाली. अलाहाबाद विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान शाखेतील एक प्राध्यापक रामनाथ कौल एक दिवस भगवानदीन नावाच्या चपराशावर खूप कडाडले. बिचारा भगवानदीन ! तो तत्त्वज्ञान शाखेचा जुना सेवक. त्याच्या मनाला ही गोष्ट फार लागली. व त्याला रडू कोसळले. रागवलेले प्राध्यापक व भगवानदीन दोघांनीही गुरुदेवांकडून अनुग्रह (नाम)घेतलेले होते. दुखावलेल्या भगवानदीनने हिय्या करून प्राध्यापक कौल यांना भेटून भगवानदीन म्हणाला, 'सर, आपण प्राध्यापक आहात, मी तर केवळ चपराशी आहे. पण आपण गुरुबंधू आहोत. गुरुदेवांकडून आपण रागवण्याची कला शिकलात की काय ? हे ऐकून त्या प्राध्यापकाचे हृदय विरघळले आणि त्यांच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या त्यांनी भगवानदीनचे पाय धरले व त्याला मिठी मारली.

गुरुदेवांना ध्यास फक्त भक्तीचा, परमार्थाचा होता. त्यांचा प्रत्येक विचार, कृती त्या दिशेने होत असे. दोन नोकऱ्यांपैकी कोणती नोकरी स्वीकारावी असा प्रश्न कोणी विचारला तर उत्तर ठरलेले असे. जी परमार्थाला पोषक असेल ती. एकदा त्यांच्या भक्तांस रामनवमीच्या दिवशी मुलगा झाला ते ऐकून गुरुदेव म्हणाले, 'किती भाग्यवान आहे हो !' महाराजांचा जन्म रामनवमीचा तसा रामदास स्वामींचा जन्म ही रामनवमीचाच. तुकाराम म्हणतात त्याप्रमाणे गुरुदेवांच्या मनाला एका गोविंदाचा छंद लागला व त्यामुळे त्यांचे सर्व जीवन गोविंदमय होऊन गेले.

गुरुदेवांच्या विषयी कितीही सांगितल तरी कमीच आहे. 'अमानित्वाने' बहरलेले असे त्यांचे जीवन होते. इतिहासातील एक उदाहरण येथे आठवते. प्लेटो हा जगातील फार मोठा तत्त्वज्ञ होऊन गेलो. त्याला सोडून कोणीही तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहू शकत नाही. सॉक्रेटिस आणि त्यांचा परिवार यांच्यात संवाद होत असे. त्यासर्व संवादात सॉक्रेटिस हे प्रमुख पात्र होते. आपल सगळ तत्त्वज्ञान प्लेटोने सॉक्रेटिसच्या तोंडी घातले आहे. ती पुस्तके मात्र सॉक्रेटिक डायलॉग या नावाने प्रसिद्ध आहेत. प्लेटोने स्वतःचे नाव कुठेही घातले नाही. 'आणिमी तूहे भाष नेणे ! माझे काहीचि न म्हणे ।' अशीच वृत्ती संतांची असते.

**सद्गुरुसी एकाच विनवणी/**
**यालागी पुढा अथवा पाठी/**
**जिये राहटलो बहुवे वोखटी/**
**तिये मायेचिया परी पोटी/**
**सामावी प्रभो//(ज्ञानेश्वरी११.५५६)**

## गुरुदेव रानडे यांच्या चरित्रांतील ठळक घटना

१८८६ (३ जुलै) जन्म, जमखिंडी येथे
१९०१ (वैकुंठचतुर्दशी) श्री. भाऊसाहेब उमदीकर यांचा उपदेश
१९०२ मॅट्रिक्युलेशन; जगनाथ शंकरशेट स्कॉलरशिप.
१९०३ इंचगेरी मठाची स्थापना.
१९०३-०७ डेकन कॉलेजांतील विद्यार्थि-जीवन.
१९०७ बी. ए. (गणित).
१९०७-०९ दक्षिणा फेलो, डेक्कन कॉलेज.
१९११-१३ ट्यूटर (इंग्रजीचे), फर्ग्युसन कॉलेज,
१९१३ क्यूरेटर, हस्तलिखित-संग्रह, डेक्कन कॉलेज.
१९१४ लाइफ मेंबर, डे. ए. सोसायटी.
१९१४ गुरु, श्री भाऊसाहेब महाराज यांचे निधन.
१९१४-२० प्रोफेसर, फर्ग्युसन कॉलेज.
१९१७ 'कालीइल कॉटेज' ची उभारणी.
१९१८ आई व पहिली पत्नी यांचा मृत्यु. 'अध्यात्मभुवन' (पुणे).
१९२०-२४ प्रोफेसर, विलिंग्डन कॉलेज, सांगली.
१९२२ द्वितीय विवाह. निंबाळास स्थलांतर.
१९२४ डे. ए. सोसायटीचा राजीनामा. 'अध्यात्म-विद्यापीठ' स्थापना.
१९२५ निंबाळच्या वास्तूची उभारणी.
१९२६ उपनिषदांवरील ग्रंथ; ज्ञानेश्वरादि संतांची 'वचनामृते.'
१९२७-४६ प्रोफेसर, अलाहाबाद विद्यापीठ.
१९३३ 'मिस्टिसिझम् इन् महाराष्ट्र' प्रकाशन. अंबुराव निधन.
१९३६ नाम देण्यास प्रारंभ.
१९४२ अलाहाबादच्या वास्तूची उभारणी.
१९४६ कुलगुरु, अलाहाबाद विद्यापीठ.
१९४६ - एमेरिटस् प्रोफेसर, अलाहाबाद विद्यापीठ.
१९४७ डी. लिट्. (अलाहाबाद). 'अध्यात्म विद्यामंदिर 'स्थापना.
१९५४ 'पाथ-वे टु गॉड' व 'परमार्थसोपान' प्रकाशन.
१९५६ अमृतमहोत्सव (जमखिंडी).
१९५७ (६ जून, रात्रौ १०।। वाजता) निर्माण, निंबाळ येथे.

---

# ग्रामदैवत माढेश्वरी देवी विशेष

**माढा शहर व तालुक्याचे ग्रामदैवत म्हणजे अर्थातच श्री माढेश्वरी देवी. सतराव्या शतकात मंदिराची उभारणी झाली असुन माढा शहरातील मनकर्णा नदीच्या काठावर असलेल्या ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या माढेश्वरी देवीला मानणारा बारा बलुदेतार वर्षभर येथे दर्शनासाठी अलोट गर्दी करतो. माढेधीपती श्रीमंत रावरंभाजी निंबाळकर यांनी १७२७च्या कालखंडात उभारलेल्या या मंदिरास आज २९७ वर्ष पुर्ण झाली आहेत. मनकर्णा नदीच्या काठावर असलेल्या ऐतिहासिक श्री माढेश्वरी देवीचा यात्रोत्सव कोजागिरी पौर्णिमेला असतो.**

# सतराव्या शतकातील ऐतिहासिक वारसा लाभलेली श्री माढेश्वरी देवी




शेखर म्हेत्रे
मो. ८६६९०८९४०७


सतराव्या शतकातील दक्षिण भारतीय वास्तू स्थापत्य असा ही या मंदिराचा इतिहास तज्ञ उल्लेख करत आहेत. रावरंभाराजे निंबाळकर हे पुणे जहागिरी जप्त झाल्यानंतर करमाळ्याकडे आले व तेथे स्थायीक झाल्यानंतर त्यांनी माढ्यातील देवीचे मंदिर १७२७ मध्ये उभारले. अगोदर या मंदिराची किल्लेवजा/गढीची बांधणी करुन घेतली व तद्नंतर अतिशय लहान असलेल्या या मंदिराचा जिर्णोध्धार करुन भव्य असे रुप दिले. या हेमाडपंथी मंदिराची रचना सुबक आकर्षक अशीच आहे. संपुर्ण मंदिर हे सुबक व रेखीव दगडात बांधले आहे. प्रवेशद्वाराच्या समोरच रावरंभाराजे निंबाळकर यांची समाधी देखील आहे.

मंदिरात प्रवेश करताच भव्य अशी कमान असुन कमानीवरचा कळस मंदिराची भव्यता दर्शवतो. मंदिरात पाऊल ठेवताच डाव्या हाताला दोन आणि उजव्या हाताला एक अशी दिपमाळ आहे.गाभाऱ्याच्या समोरच सभामंडप व होमकुंड ही आहे.

मंदिराच्या उजव्या व समोरच्या बाजूला ओवऱ्या बांधण्यात आल्या आहेत. या ठिकाणी दर्शनासाठी आलेल्या भाविकांना भोजन व विश्रांतीसाठी व्यवस्था करण्यात आली आहे. जागृत व नवसाला पावणारी देवी अशी देवीची ख्याती असल्याने माढा शहर व परिसरातील कोणत्याही विवाह कार्यक्रमाची पहिली भोगी देवीला केल्या खेरीज लग्नाच्या तयारीला सुरुवात केली जात नाही. माढेश्वरी देवीचा वर्षभरात फक्त एकच उत्सव असतो. तो म्हणजे कोजागिरी पोर्णिमा यात्रोत्सव. माढेश्वरी हे पार्वतीचे रुप मानलं जात असल्याने तिचं वाहन असलेल्या हत्तीला यात्राकाळात मोठा मान असतो. नवरात्रीच्या उपवासानंतर दसऱ्याला देवीची संबळच्या निनादात पालखी निघते. तद्नंतर देवी निद्रेस जाते आणि कोजागिरी पौर्णिमेपासुन देवीचा यात्रोत्सव सुरु होतो. नोकरीनिमित्त बाहेर गावी स्थलांतरित झालेली कुटूंब यात्रेनिमित्त आवर्जुन





**मंदिराचे विश्वस्त म्हणुन सुभद्रा पुजारी व डॉ. उदय पुजारी हे आहेत. तर मंदिराच्या गाभाऱ्यात सावित्रीबाई पुजारी या आहेत. देवीची सकाळची व संध्याकाळ ची पुजा ही गोविंद पुजारी यांच्या हस्ते होते.**

माढ्याला येतात. याच दिवशी रात्री बारा वाजता देवीचा छबिनोत्सव निघतो. परंपरागत बुलतेदारांना वाटुन दिलेली आठ देवीची वाहने या छबिना उत्सवा मध्ये पुढे मानकरी नाचवतात.

माळी समाजाला हत्ती, भांगे घराण्याला घोडा, मारकड यांना नंदी, जाधव याना गरुड, रणदिवे घराण्याला वाघ, काटे घराण्याला मोर, माने घराण्याला सिंह, खोत यांना काळवीट, चवरे यांचा कलगीतुरा या वाहनांचा माढेश्वरी देवीच्या उत्सव यात्रेत मानाचे स्थान असुन या वाहनाचे वाजत गाजत मिरवणुक काढली जाते. हा छबिना मातंगाई देवीची भेट घेऊन पहाटे पाच वाजता मंदिरात येऊन विसावतो. तीन दिवसीय यात्रोत्सवाकरिता माढ्यात हजारो भाविकांची मंदियाळी असते. यात्रा कमिटी कडून मंदिराच्या कळस, शिखर तटबंदीवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येते. त्यामुळे मंदिर लखलखुन जाऊन मंदिराच्या सौंदर्यात भर पडते. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी कलगी तुऱ्याचा मनोरंजनातुन प्रबोधनाचा कार्यक्रम असतो व यात्रेच्या शेवटी कुस्त्यांच जंगी मैदान व मनोरंजन कार्यक्रमाने यात्रोत्सवाची सांगता होते.

**श्री माढेश्वरी देवीच्या मुर्तीची रचना**

गाभाऱ्यात सिंहासनावर श्री माढेश्वरी मातेची वालुकाश्मापासुन बनविलेली मुख्य मुर्ती आहे. त्याच्या शेजारी उत्सव मुर्ती आहे. माढेश्वरी ही चतुर्भुज असुन एका हातात ढाल, दुसऱ्या हातात शंख चक्र, तिसऱ्या हातात महशासुरांची शेंडी तर चौथ्या हातात त्रिशुल आहे. हा त्रिशुल महशासुराच्या पोटात मारत असल्याचे मुर्तीचे मुळ रुप असून तिला नेसलेल्या साडी मुळे ते दिसुन येत नाही.

देवीच्या मुर्तीची उंची ही तीन फुट असुन मुकूटाजवळ चंद्र सुर्य असुन कपाळावर लाल रंगाचा चकचकीत मणी आहे. मुर्तीच्या मागच्या बाजुला मोर, नाग, दैत्य कोरीव प्रभावळ आहे. मुख्य मंदिराच्या उजव्या बाजूस श्री गणेशाचे व महादेवाचे तर डाव्या बाजूस श्री विष्णूचे मंदिर आहे.

**यात्रेची परंपरा...**

माढ्याचे राजे रावरंभा निंबाळकर यांच्या काळापासुन सुरु असलेल्या साधारण ३०० वर्षांपासून कोजागिरी पौर्णिमेला देवीच्या यात्रेची मोठी परंपरा आहे. ही यात्रा मोठ्या प्रमाणात व उत्साहात साजरी व्हावी यादृष्टीने माढ्यासह शेजारील दोन तीन गावांना समावून घेत मानाची वाहने दिली आहेत. यात्रेदिवशी सर्व मानाच्या वाहनांची सजावट करून मोठ्या उत्साहात छबिना काढण्यात येतो.

माढ्यातील माळी समाज्यातील श्री तुळजाभवानी देवीचा एक निस्सीम भक्त होते. देवीने त्या भक्ताला प्रसन्न होऊन आशीर्वाद देऊन माढ्यात प्रगट झाल्याची आख्यायिका आहे त्याच बरोबर या संदर्भात अनेक आख्यायिका आहेत. त्यामुळे माढेश्वरी देवीच्या यात्रेत माळी समाजाच्या हत्ती या वाहनाला यात्रेत पहिला मान आहे. हत्ती या वाहनावर माढेश्वरी देवीच्या मूर्तीची मिरवणूक निघते.

माढेश्वरी देवीच्या नवरात्र उत्सवाला घटस्थापने पासून सुरुवात होते. या कालावधीत देवीच्या दर्शनासाठी हजारोंच्या संख्येने भाविक मोठी गर्दी करतात.






नाही पाहिला, नाही देखीला, सूर्यनारायण माझा हृदयी राहिला ।

**महाराष्ट्रात केवळ एकमेव असणारे असे प्रख्यात सूर्यनारायण देवाने पावन झालेले असे सुंदर, रमणीय, पवित्र, पुण्यक्षेत्र, श्रीक्षेत्र नारायण चिंचोली... श्री सूर्यनारायण देवाचे हे स्थान, त्याच्या दर्शनाने चित्यवृत्ती बहरते, भक्तिला उधाण येते. अंतःकरण प्रसन्न होते. प्रापंचिक चिंता, दुःख यांचा परिहार होतो. श्री सूर्यनारायण देव श्रीक्षेत्र 'नारायण चिंचोली' या क्षेत्री प्रवेश करताच सारा निसर्ग जणू सुस्वागतम् सुस्वागतम् म्हणत असल्याचा भास होतो. ग्रामीण वातावरण असल्यामुळे, विशाल असे वृक्ष, हिरवी वनराई आपले बाहू पसरुन अभ्यागतांचे, भाविकांचे स्वागत करतात. पक्षीगण मंजुळ स्वरांनी स्वागत गीते गात असतात. अशा या निसर्गरम्य गांवी व मंदिराच्या दिशेने चालू लागल्यावर भगवान सूर्यनाराणाच्या भेटीची आस लागून राहिलेली, ती पूर्ण होणार म्हणून मनस्वी आनंद होत असतो.**

# सुरम्य सूर्यनारायण दर्शन....




शिवाजी हळणवर

मो. ९८६००४००१३


मंदिराच्या छायेत क्षणभर स्थिरावले की पूर्व बाजूस दिसतो तो मंदिर परिसर. मंदिराच्या सभा मंडपातून पुढे गेले की साक्षात भगवान सूर्यनारायाणाची विशाल अशी नयनरम्य मूर्ती हेच नारायण चिंचोलीचे मुख्य स्थान.... त्यांचे दर्शनाने भाविकांना संतोष लाभतो भेटणाऱ्यांना भेटीचा आनंद गगनात मावेना असा होतो. अनेक सश्रध्द भक्तांचे हेच ते श्रध्दा स्थान ! प्रदक्षिणा संपून सूर्यनाराणाचे तीर्थ, प्रसाद, अंगारा घ्यावा. घटकाभर मंडपात स्थिर व्हावे. देहभान विसरून जाते. वृत्ती स्थिरावते.

।। विकार नव्हते, विचार नव्हते, नव्हती वृत्ती कुठल्याही ठायी ।। अशी स्थिती होते. मंदिरातून बाहेर पडताना आपल्याला भव्य मंदिर परिसर, भक्त निवास, मंगल कार्यालय. पुढे देवीचे मंदिर, दत्त मंदिर, परिसर. अशीच एक वाट पुढे जाते तेथे हनुमान मंदिर, जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत.चिंचोली ग्रामी आले की दिसतात ती छोटी छोटी पण सुबक अशी ग्रामस्थांची घरे, पुजाऱ्यांचे घर ही याच परिसरात आहे. असे हे छोटे पण सुबक नारायण चिंचोली. श्रीक्षेत्रांचे मनोहर दर्शन !

**नारायण चिंचोलीचे ऐतिहासिक महत्त्व**

पंढरपूर ही आध्यात्मिक नगरी आहे. महाराष्ट्रातील एक सांस्कृतिक व समस्त वारकरी सांप्रदायाचे आध्यात्मिक व्यासपीठ म्हणून पंढरीचा उल्लेख केला जातो. महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाचे तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूर हे शतकानुशतके गाजत आलेले आहे. भागयत धर्माची पताका खांद्यावर घेवून त्याचा प्रचार करणारा वारकरी श्री संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या अमोघ वाणीमधून प्रकटलेले ज्ञानामृत यातून होत असलेला भागवत धर्माचा प्रसार यामुळे पंढरी आणि पंढरीचा पांडुरंग यांना महाराष्ट्रातच नव्हे तर देशात देखील जिव्हाळ्याचे व श्रध्देचे स्थान प्राप्म झाले आहे.

इसवी सन १३ व्या शतकापासून पंढरपूरच्या श्री विठ्ठल मंदिराविषयी तसेच स्कंद व इतर पुराणांच्या आधारे श्री विठ्ठलाची माहिती शिलालेखातून मिळते. रामचंद्र देव यादवांच्या काळात लोकवर्गणीतून या मंदिराची उभारणी झाली होती हे लक्ष चौऱ्याऐंशी च्या लेखातून समजते मात्र त्यावेळी दुर्दैवाने यादवांचा पाडाव झाला य महाराष्ट्रात यवनी सत्तेचा अंमल सुरु झाला. मंदिरे, दैवते, पाडली गेली. भ्रष्ट झाली. पंढरपूर ज्यावेळी भागवत धर्माचे केंद्र म्हणून भरभराटीस आले होते त्याकाळात म्हणजे चालुक्य आणि यादव काळात पंढरपूरच्या परिसराचे (ग्रामदेवता) याचे महत्त्व वाढले होते. त्यामध्ये चिंचोली, तारापूर, पखालपूर, कोर्टी येथील मंदिरे व तेथील ग्रामदैवतं जरी भ्रष्ट झाली तरी केवळ एकदाच हल्ला झाला असल्यामुळे त्याचे मूळ स्वरूप, वैभव शिल्पाकृती या विषयी माहितीचे ते साक्षीदार आहेत. यातील बहुतेक ग्राम दैवते जीर्ण व भग्न अवस्थेत असले तरी येथील शिल्पकला, रेखीवकाम मूर्ती हे अतिशय उल्लेखनीय आहे. याच इतिहासाची साक्ष देणारे पंढरपूर तालुक्यातील पंढरपूर-मोहोळ रोडवरील पंढरपूर पासून सुमारे ११ कि. मी. अंतरावर असणारे नारायण देवाचे ग्राम दैवत असलेले नारायण चिंचोली हे गांव...

नारायण चिंचोली हे छोटे खेडे गांव, गांव तस छोटं पण अध्यात्माची अपार महती सांगणारं हे पंढरीच्यां सीमेवरील गांव आहे. हे गाव ईश्वर वठार या नावाने देखील ओळखले जाते. गावाच्या पूर्वेस एक मोठे मंदिर आहे याच मंदिराचा उल्लेख सूर्यनारायण मंदिर असा करतात. पूर्वाभिमुख असलेले हे प्राचीन मंदिर गावाबाहेर आहे. पंढरीचा पांडुरंग जसा सर्वश्रुत आहे तशी त्यांची महती सांगणारे देवालये देखील या पंक्रोशीत आहेत त्यातील हे मंदिर म्हणजे सूर्यनारायण मंदिर आहे.

**मंदिराची माहिती**

मंदिर म्हणजे मानव व ईश्वराला जोडणारा दुवा होय. मानवाला कृतार्थ करण्यासाठी देवाने (ईश्वराने) पृथ्ववर निवास करण्यासाठी निवडलेले पवित्र स्थळ. मंदिराची माहिती ही दंतकथा नुसार ऐकविली जाते. कारण यास काही ठिकाणी शास्त्रीय आधार देणारे पुरावे साधारणपणे ११ व्या शतकापासून यांची माहिती उपलब्ध होते. यानुसार म्हणजे चालुक्य आणि यादव यांच्या काळात पंढरीच्या अगदी नजीक असणारे ग्रामदैवत होते याशिवाय पुराण शाखात देखील याचे महत्त्व सांगितले जाते.

पुरातत्व खात्याच्या सर्वेक्षणानुसार हे मंदिर प्राचीन हेमाडपंथी आहे. मंदिरात गर्भगृह, सभामंडप, दगडी खांब आहेत. मंदिराचा आकार आदी चौकोनी पूर्वाभिमुख असा आहे. मंदिरात प्रवेश केल्यावर दगडी सभामंडप हा अंतराळ असा सभामंडप आहे. यात मोठे मोठे दगडी खांब आहेत खांबावर सुंदर असे नक्षीकाम कोरीव आहे. या दगडी स्तंभावर संपूर्ण सभामंडप आधारलेला दिसून येतो. यावरील दगड हे दगडावर दगड असे ठेवलेली आहेत यातूनच या मंदिराच्या संपूर्ण सभा मंडपाची रचना केली आहे. आधुनिक पध्दतीचा या ठिकाणी कोठेही सिमेंट अथवा चुना यांचा वापर केला नसल्याची दिसून येते. यातच शिल्पकलेचा उत्कृष्ठ नमूना पाहवयास मिळतो. अनेक इतिहास संशोधकांनी पंढरीच्या पांडुरंगाचा उल्लेख अनेक लेखांनमधुन केला आहे तसाच श्रीक्षेत्र नारायण चिंचोली या देवस्थानचा उल्लेख केला गेला आहे. असे करताना म्हटले आहे की, पुंडलिकाने श्री विठ्ठलाच्या बाबतीत म्हणताना संत कवी श्रीधर म्हणतात..

**पुंडलिकापुढे सर्वेश्वर । उभा करी ठेवूनी कर ।**
**रुक्मिणीस समजावया आला। तो पंढरीतच राहिला ।।**

आणि त्यानंतर तो पंढरीस्थित झाला पण भक्ताच्या काळजीसाठी त्याला सतत भटकावे लागले. मग नामदेवासाठी राजस्थान, नाथांसाठी पैठण, दामाजीसाठी महार होऊन मंगळवेढ्याला असो किंवा सावतामाळीसाठी अरण भेंडला असो तो पंढरीचा राजा प्रवास करीत राहिला हा यवनांच्या आक्रमणा मध्ये म्हणजेआदिलशहाच्या सेनापती अफजलखानने पंढरपूरवर आक्रमण केले अशी दंतकथा सांगितली जाते.

वरील संदर्भ लक्षात घेता ज्यावेळी तुळजापूर, पंढरपूर पासून हिंदूची तीर्थक्षेत्र नेस्तनाबूत करत अफजलखान पंढरपूरकडे येताना पंढरपूरच्या पंचक्रोशीत असणाऱ्या हेमाडपंती मंदिराची त्याच्या कडून मोड तोड झाली होती.

तेव्हा हा नारायण मार्गशीर्ष महिन्यातच महिनाभर विष्णूपदावर जाऊन भक्तांसह सहभोजनाचा आस्वाद घेणारा देव भक्तच्या घरी महाजन बडव्यांच्या घरी नित्य ताक-पिठ खायला जाणारा देव, अशा पांडुरंगाची वेगवेगळी रूपे आपल्याला पहावयास मिळतात. सद्यस्थित नारायण चिंचोली येथे सूर्यनारायण मंदिर उभे असलेले दिसते.

**सूर्य नारायण मंदिर रचना व स्वरूप**

समाजाचे अधिष्ठान, विश्वास-निष्ठा श्रध्देचे प्रतीक म्हणजे मंदिर. धर्माचे मूर्त स्वरुप म्हणजे मंदिर. या सूर्यनारायण मंदिराच्या सभामंडपातून थोडे पुढे गेल्यावर गर्भगृह लागते हे गर्भगृह देखील दगडी व पुरातन आहे. यांच्या भिंती दगडी आहेत. गर्भगृहात वेदिका स्थित असून या वेदिकेवरती नारायणाची मुख्य मूर्ती मोठ्या दिमाखात उभी आहे. त्यालाच श्रध्दाळू सूर्यनारायण असे म्हणतात मूर्तीच्या वरील भागात दगडी घुमटाकार भाग नक्षीदारपणे दिसतो त्याला शिखर असे म्हणतात.

**मंदिर बाह्यपरिसर**

मंदिर बाह्य परिसर हा शांत व निसर्गरम्य अशा प्रकारचा आहे. या परिसरात मंदिरा बाहेर काही मूर्ती विखरुन पडल्या आहेत. त्यात गजलक्ष्मी, मनुष्यकृती नागयुगल आहेत. बाहेरील बाजूस आणखी दोन मंदिरे आहेत. जवळच ११ व्या शतकातील दोन ओळीचा शिलालेख आहे. आजूबाजूस ३ ते ४ शिवलिंग देखील आहेत. शिवाय एक मोठा नंदी ही दिसतो यावरुन येथे प्राचीन शिवमंदिर आसावे असा कयास बांधला जातो.

**सूर्यनारायण : नारायण मूर्तीचे वर्णन**

नाही पाहिले नाही देखिले,
सृष्टीवरचे रूप तुझे डोळा पाहिले.

नारायण चिंचोली येथील मूर्ती वर्णन व सकल संत मंडळीनी केलेले वर्णन व पंढरपूर जवळ असलेले चिंचोली हे गाव सर्वांनी अवलोकन करता मतीच्या हातात संतांनी वर्णन केलेली सर्व आयुधे आहेत. शिवाय सर्वात महत्वाचे म्हाण् बाजूस असलेल्या दोन उभ्या स्त्री मूर्ती आहेत त्याम्हणजे लक्ष्मी आणि पद्मावती

मात्र प्रत्यक्ष ही मूर्ती विलोभनीय व पाहताच आणि डोळ्यात भरणारी आहे. पुढे गाभाऱ्यात गेल्यावर स्वयंभू असे सुमारे तीन ते साडेतीन फूट उंचीच्या महादेवाच्या पिंडीच्या आकाराच्या सिंहासनावर स्वयंभू उभी आहे. साडे सहा फूट उंच सुंदर अशी भगवान सूर्यनारायणाची अत्यंत विलोभनीय व डोळ्यात न मावणारी तसेच जीवनाचे सार्थक करणारी श्रीची मूर्ती उभी आहे.

सूर्यनारायणाच्या उजव्या बाजूस लक्ष्मी तर डाव्या बाजूला पद्मावती आहे. त्यामुळे त्यासी लक्ष्मीनारायण म्हणतात तर उजव्या हाताजवळ शेषाचे प्रतीक आहे त्यामुळे शेषनारायण ही म्हणतात. श्रीच्या हातात शंख, चक्र, गदा आहे म्हणून त्यास व्यास नारायण म्हणतात. श्रीच्या प्रभावळीवर दशावतार कोरले आहेत. म्हणून त्यास व्यासनारायण म्हणतात. सूर्यनारायणच्या मूर्तीवर पायापासून ते डोक्यापर्यंत सूर्यकिरणे पडतात म्हणून त्यास सूर्य नारायण म्हणतात अशी भाविकांची श्रध्दा आहे. हे सर्व मूर्ती वर्णन प्रत्यक्ष मूर्तीवर असलेल्या खुणा मधून केले असल्याचे आढळते. मूर्ती हि चित्ताकर्षक असल्याने आणखी बारकाईने निरीक्षण केल्यास आपणास मूर्तीच्या मस्तकावर कलाकुसरयुक्त मुकुट, गळ्यात कौस्तुभ मणी व हातामध्ये गदा, शंख, चक्र आहे, कमरेस करदोडा आहे, मकराकार कुंडल गळ्यात कौस्तुभ मणी आहे. पायात वाळे आहेत. हि वर्णने श्रीपांडुरंगाचे देखील आहेत. त्यामुळे ते पाहण्याची अनुभूती श्रीकृष्णाच्या मूर्तीचे लावण्य पाहताना येते. व्यंकटेश स्तोत्रात जे व्यंकटेशाचे वर्णन केले आहे ते सर्व आपणास या मूर्तीत दिसते. त्यामुळे काही भक्त ही देवमूर्ती पाहताना व्यंकटरमण म्हणजे बालाजी देखील म्हणतात.

**पौष महिन्यातील सूर्यनारायणाचे महत्व**

वैदिक काळापासून भगवना सूर्यनारायणाच्या उपासनेचा उल्लेख असल्याचा आपल्याला आढळतो, वैदिक युगापासून ते आत्तापर्यंत सूर्यनारायणाला जीवनस्वास्था तसेच शक्ती देवता असे म्हणाले गेले आहे. छान्दोग्य उपनिषतामध्ये सूर्याला ब्रह्म माणाव गाने आहे. पुराणामध्ये सूर्यनारायणाच्या आराधनेच्या अनेक कथा प्रसिध्द आहेत. ज्यामध्ये या देवाचे स्थान व माहात्य वर्णन केले गेले आहे. सूर्यनारायणाच्या संबंधी नुसत्या कथा जरी ऐकल्या तरी पाप किंवा दुर्गतिपासून मुक्ती मिळते. तेत्तिरीय आरण्यक सूर्यपुराणामध्ये उगवत्या सूर्याची उपासना फल देणारी सांगीतली गेली आहे. सूर्य नारायण जगाला प्रकाश, ज्ञान, उर्जा, उष्णता तसेच जीवनशक्ती प्रदान करणारा आहे. तसेच रोग, कीटाणू, भूत, प्रेत आदि गोष्टींचा नाष करणारा असे म्हणले जाते. केवळ बेदांमधेच नाहीतर अधुनिक विज्ञानाचे निष्कर्ष देखील हेच सांगतात. सूर्यनारायणाची उपासना त्वरीत फल देणारी आहे. म्हणूनच या कलियुगामध्ये सत्यनारायण व्रताचे महत्त्व सांगितले आहे. पुराणांमध्ये भगवान रामाचे पूर्वज सूर्यवंशी महाराज यांना सूर्यउपसनेमुळे दिर्घायु प्राप्त झाली आहे. तसेच श्रीकृष्णाचा मुलगा सांब याला सूर्यउपासनेमुळे कुष्टरोगातून मुक्ती मिळल्याचे सांगीतले जाते.

नथाग्रहांमध्ये सर्वप्रथम ग्रह सूर्य हा आहे. जो पितृस्थानी कर्माचा स्वामी मानला गेला आहे. ज्यांना संतान प्राप्ती होत नाही त्यासाठी सूर्यनारायणाच्या उपासनेचा फार लाभ होतो. ॐ सूर्याय नमः । या मंत्राच्या जपामुळे व्यक्ती यशस्वी होते हा मंत्र अका रविवार केला पाहीजे. सूर्य उपासनेमुळे नेत्ररोगदेखील दूर होतात. त्याचबरोबर सूर्यनमस्काराने आरोग्य प्राप्ती होते. मनाच्या शांतीसाठी सूर्यनारायणाची उपासना करावी. एखाद्या व्यक्तिला एखाद्या रोगाचे औषध चालू असेल तर त्यावेळी हा मंत्र पाठ करावा त्यामुळे त्या रोगाचा समुळ नाश होईल. अशा विश्वरुप नारायणाचे पवित्र असे श्री क्षेत्र नारायण चिंचोली हे ठिकाण आपल्या पंढरपूर तालुक्यात असल्याने भाविक भक्तांनी तेथे जावून दर्शन घेवून आपले मनोइच्छित फल सूर्यनारायणाच्या कृपेने पूर्ण करुन घ्यावे व पावन व्हावे.

पंढरपूर तालुक्यात एकाहून अधिक चिंचोली नावाची गावे असल्या कारणाने एकाहून भिन्न असे दर्शविण्यासाठी प्रस्तुतचे चिंचोली हे गांव नारायण चिंचोली म्हणून ओळखले जाते.

या सर्व वरील गोष्टी लक्षात घेता नारायण, विठ्ठल ही फक्त नांवे आहेत रूप एकच आहे. भक्तांनी देवावर भक्ती करणे महत्त्वाचे आहे, त्यात नावाचा कोणताही उल्लेख येवो. सगुणरुपी परब्रह्म एकच ठिकाणी असून तो प्रत्येकाच्या हृदयात स्थित आहे या गोष्टीचे चिंतन करुन सकल संताप्रमाणे तो मनोमन पूजावा हे महत्वाचे आहे. माझे हे अनुमान व निष्कर्ष अखेरचे नाहीत त्यात अवलोकनास व ठाम निर्कषास वाव आहे. शेवटी पंढरीच्या परिसरात एवढ्या सुंदर नारायणदेवाच्या मुर्तीचा आढळ असणे ही सुदैवी बाब आहे. या मध्ययुगीन भागवत धर्माच्या संदर्भात पंढरपूर तालुक्यातील सूर्य नारायण मंदिर हे भाविक भक्तांसाठी भाग्यदायी गोष्ट आहे.

**श्री नारायणाची आयुधे व अलंकार**

शंख, चक्र, गदा, पद्म, धनुष्य, श्रीवल्स, कौस्तुभ, वैजयंती, किरीट, आणि कुंडल ही नारायणाची आयुधे व अलंकार होत. शंख : पंचमहाभूतात्मक शब्द ब्रह्माचे प्रतीक नाव- पांचजन्य चक्र : मनाचे प्रतीक. नाव- सुदर्शन गदा : आदिविद्या नाव- कौमोदकी पद्मः सृष्टीचे प्रतीक श्रीवत्सः (कौस्तुभ युक्त) तेजाचे प्रतीक वैजयंती : आद्या-अजया- शक्ती किरीट :

**कूटस्थ तत्व कुंडले : क्षर आणि अ-क्षर तत्वाची प्रतीके.**

नारायण चिंचोली येथील पौष महिन्यात होणारे दैनिक कार्यक्रम

पंढरपूर पासून ११ कि.मी अंतरावरच असणारे नारायण चिंचोली मंदिर पहाटेचे पाच वाजता काकडा आरती सुरुवात होते मंदिराच्या सभोतालची वृक्षलता, सुगंधित वायू, दिव्य तारका, हासरी उषा, सर्वांनाच ध्यास असतो तो जगत् नारायण श्री सूर्यनारायण निद्रेतून जागृत केव्हा होतील. त्यांच्या चरणांचे विलोभनीय दर्शन केव्हा घडेल? याच ठिकाणी मंदिरात भक्तगण जमतात आणि भूपाळ्या गाऊ लागतात. त्यानंतर भगवान सूर्यनारायणास यथासांग व मंत्रोपच्चारे महापूजा केली जाते.

याच बरोबर पौष महिन्यातील तिसऱ्या रविवारी श्री सूर्यनारायण देवाचा पालखी सोहळा आयोजित केलेला असतो. या पालखी सोहळ्यासाठी दुरहून भाविक श्री सूर्यनारायणाच्या दर्शनास अवर्जुन उपस्थित असतात. ही पालखी गाव प्रदक्षिणा करीत पुन्हा मंदिरामध्ये श्रीच्या दर्शनासाठी ठेवली जाते. पौष महिन्याच्या शेवटच्या रविवारी भंडाऱ्याचे (प्रसादाचे) आयोजन केलेले असते.

**कै. वासुदेव शंकरराव अवताडे (पूर्व सेवाधारी)**

कै. श्री. वासुदेव शंकर अवताडे हे मुर्धनारायण मंदिर नारायण चिंचोलीचे पुजारी होते. त्यांना लोक आदराने मामा असे म्हणत हे अतिषय उदार निस्वार्थी व पुरोपक्रमी होते. देवाचा यांचेवर खरोखरच वरद हस्तच होता. रोजच्या जीवनात ऐणाच्या समस्या से विस्वार्थीपणे सोडवत असत ग्रामस्थ तसेच पंचक्रोशीत देखील त्यांची कीर्ती अपार होती त्यामुळे कौटुंचिक गोष्टीपासून ते इतर समस्या लोक त्यांना हक्काने सांगून त्यापासून ते सुटका करून घेत. वयाच्या १०व्या वर्षापासून त्यांना गुर्यनारायणाच्या भक्तीचा छंद रखागला होता. त्यांचे संपूर्ण आयुष्य सूर्यनारायण देवाच्या सेवेत गेले, त्यांनी भगवान सूर्यनारायणाचे नित्योपचार सुरु केले ते आजही अती भावाने सुरु आहे. आजही त्यांची उणीव फार भामत असते. मात्र, हा देह माशवंत आहे. के. वासुदेवराव यांना वयाच्या ८७व्या वर्षी म्हणजे १० डिसेंबर २००९ रोजी देवाज्ञा झाली त्यांच्या नावाचा उल्लेख केला नसला तर एक अनामिक हुर हर मला लागून राहीली असती म्हणून आजही मामा हे नाव उच्चारलेकी सूर्यनारायण नंतर ज्यांचा चेहरा समोर येतो ते म्हणजे अवताडे मामा..

**गणेश काका ( सुर्यनारायणाचे सेवाधारी )**

सूर्यनारायण देवाचे मुख्य पुजारी हे सेवाधारी हे गणेश वा. अवताडे हे आहेत. वडिलांनी सांगितलेल्या पावलावर पाऊल ठेवून त्यांची वाटचाल सुरु आहे. कोणत्याही फळाची अपेक्षा न करता फक्त सेवेचा वारसा हे चालवित आहेत. कोणाजवळ झोळी पसरु नको काही मागू नको, देणारा तो आहे, ज्याने जन्म घातला त्याची सेवा कर, असे वडिलांचे व्रत घेऊन त्यांनी आपली नारायणदेवाची सेवा अखंडपणे चालू ठेविली आहे. या सेवेतून मिळणारा आनंद स्वर्गिय सुखापेक्षा देखील परमोच्च आहे. अतिशय भक्तीपूर्ण व सुसंस्कारी असलेल्या या नारायण चिंचोली या ग्रामी नारायणाची पुजा अर्चा करण्याचे भाग्य लाभल्यामुले ते सुदैवी आहेत. गणेश काका यांचेवर सूर्यनारायण देवाचा वरद हस्त असून ते केवळ याच गावात प्रसिध्द नसून महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आदि राज्यात त्यांच्या ज्योतिषाची किर्ती पसरली आहे. त्यांनी आपल्या बऱ्याच लोकांना आपल्या ज्योतिषाच्या माध्यमातून मार्गदर्शन केलेले आहे. भगवान सूर्यनारायण देवाचा आशीर्वाद भाविकांच्या पाठीशी सदैव राहो अशी ते प्रार्थना करीत असतात. त्यांची मुले श्री व प्रसाद ही त्यांना धार्मिक कार्यात सहकार्य करत असतात.





MEDICAL
SPORT




करमाळा तालुक्याचे माजी आमदार
संजयमामा शिंदे
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
सोलापूर
तरुण भारत
४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
संजयमामांचा कागदोपत्री
विकास मतदारसंघातील
प्रत्येक गावात प्रत्यक्षात
दिसतोय बरं का..!
शुभेच्छुक
मा.आमदार संजयमामा शिंदे समर्थक
करमाळा - माढा विधानसभा




तरुण भारत
सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
मंगळवेढा पोलीस ठाणे,
मंगळवेढा




सोलापूर
तरुण भारत
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा.
तालुका अध्यक्ष
राज्य अध्यक्ष
जिल्हाध्यक्ष
शामराव जवंजाळ
शशिकांत खुडे
जिल्हा चिटणीस
किरण सगेल
शुभेच्छुक
मा. महांतेश्वर कट्टीमनी
मागासवर्गीय शिक्षक
संघटना, अक्कलकोट




दैनिक सोलापूर 'तरुण भारत' च्या
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !
Dattatray S. Mule
Govt. Contractor
DIGVIJAY READYMIX CONCRETE
DIGVIJAY CONSTRUCTION & HOT MIX
DIGVIJAY TRADERS
DIGVIJAY INFRACON
DIGVIJAY R.M.C.
DIGVIJAY RMC
2, Smruti Prakash Towers, Opp. Kinara Hotel, Solapur. datta.mule99@gmail.com M. 9822023939





## दैनिक सोलापूर तरूण भारत
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक

॥ तमसो मा ज्योतिर्गमय ॥
शाहू शिक्षण संस्था पंढरपूर, संचलित

## स्वामी विवेकानंद प्रशाला, कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय
२२, म्हाडा हौसिंग सोसायटी, जुळे सोलापूर - ४१३००४

संस्थापक
श्री.लक्ष्मणरावजी ढोबळे (सर)

अध्यक्ष
श्री.अब्राहम आवळे

सचिव
श्री. अभिजीत ढोबळे

प्राचार्य
श्री.अंबादास पांढरे



## दैनिक तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!



डी.ए.व्ही.कॉलेज मॅनेजिंग कमिटी, नवी दिल्ली संचलित

### सोलापूर जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संकुल
- द.भै.फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर
- डी.ए.व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर
- द.प्रे. भै. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर
- द.गो. भै. दयानंद विधी महाविद्यालय, सोलापूर
- पुष्पा गुप्ता दयानंद मॉडेल स्कूल, सोलापूर
- दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला, सोलापूर
- रामभाऊ जोशी हायस्कूल, करकंब, पंढरपूर
- महात्मा आनंद स्वामी सरस्वती कनिष्ठ महाविद्यालय, करकंब

- संस्थेची वैशिष्ट्ये -

● राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरून नर्सरी ते पीएच.डी पर्यंत विविध विद्याशाखामधील अभ्यासक्रमाची शैक्षणिक सोय ● सुसज्ज इमारत व ग्रंथालय अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक सुसज्ज संगणक प्रयोगशाळा ● पात्र विद्यार्थ्यांना शासनाद्वारे दिल्या जाणाऱ्या सर्व शिष्यवृत्ती उपलब्ध ● प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र कौशल्य विकास आधारित अभ्यासक्रम ४० पेक्षा जास्त कौशल्य विकासावर आधारित अभ्यासक्रम ● NCC/NSS युनिट. ● मुलांचे व मुलींचे स्वतंत्र वसतिगृह ● संशोधन (Ph.D) केंद्राची सोय ● स्पर्धा परीक्षा केंद्र ● सर्व खेळांसाठी सुसज्ज क्रीडांगण ● SET/NET Examination prepartion ● युवती महोत्सव, दयानंद टॅलेंट सर्च एक्झामिनेशन, महर्षी दयानंद सरस्वती स्टेट लेवल लोकेशन कॉम्पिटीशन, सायन्स ओलंपियाड, महात्मा हंसराज प्रश्नमंजुषा, कॉम्पिटीशन इत्यादी.

XI(Arts, Sci, Comm), B.A, B.Sc, B.Sc.(ECS), B.Com, BCA, MA, M.Com, M.Sc, MCS, BALLB, LLB, LLM, Ph.D या अभ्यासक्रमांची सोय.
संपर्क क्रमांक - ७०२०५०८४०८, ९९२२८९५४९९

शुभेच्छुक : मा. डॉ. महेशजी चोप्रा
स्थानिक सचिव, दयानंद शिक्षण संस्था, सोलापूर



मान्सून सेल! मान्सून सेल!!
20 ते 40%
भव्य डिस्काऊंट
यल्लम्मा
हॅण्डलूम



विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860



दैनिक सोलापूर तरूण भारतच्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक
मा.श्री.संतोष फुलचंद पाटील
एलआयसी एंजट
(मो. ९१५६२३०००९)
क्रीडा शिक्षक : व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मेडियम स्कूल, सोलापूर
राष्ट्रीय खेळाडू व राज्य पंच : थ्रोबॉल व सॉफ्टबॉल
संचालक : सोलापर जिल्हा डॉजबॉल, थ्रोबॉल, बेसबॉल, सॉफ्टबॉल असोसिएशन
देशात द्वितीय : अण्णप्पा काडादी हायस्कूलकडून २०११-१२ मध्ये झालेल्या स्वच्छ सुंदर हरित राष्ट्र या विषयावरील निंबध स्पर्धेत यशाबद्दल माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते सन्मान





## कृषि उत्पन्न बाजार समिती, औसा व महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
यांच्या संयुक्त विद्यमाने

घरबसल्या बाजारभावाची नको मला भीती,
औसा बाजार समितीची शेतमाल तारण कर्ज योजना आहे ना हाती...

◆ शेतमाल तारण योजनेची माहिती ◆

| योजनेत समाविष्ट शेतमाल | तारण कर्जासाठी आवश्यक लागणारे कागदपत्रे | योजनेची वैशिष्ट्ये |
|---|---|---|
| सोयाबीन, तूर, मूग, उडीद, भात (धान), करडई, सूर्यफुल, ज्वारी, बाजरी, मका, गहू, हरभरा (चना), हळद | चालू वर्षाचा ७/१२, पीक पाहणी नोंदीसह आधार कार्ड झेरॉक्स प्रत, बँक पासबुक झेरॉक्स प्रत | ◆ कृषि उत्पन्न बाजार समतीच्या माध्यमातून अंमलबजावणी ◆ वखार पावतीवर शेतकऱ्यांना तारण कर्ज त्वरित उपलब्ध ◆ कर्जाची मुदत ६ महिने (१८० दिवस) ◆ कर्जाचा व्याज दर केवळ ६% वार्षिक |

योजनेबाबत अधिक माहितीसाठी कृषि उत्पन्न बाजार समिती औसाशी संपर्क साधावा.
श्री. भुजंग सोमवंशी - ९६०७५५१००० श्री. वसीम शेख - ९६३७३७९१४३


श्री. संतोष हुच्चे
सचिव, कृ.उ.बा.स. औसा
मो. ८२७५०५५२९९


श्री. भिमाशंकरप्पा राचट्टे
उपसभापती, कृ.उ.बा.स. औसा
मो. ९६५७४१४३०५


श्री. चंद्रशेखर सोनवणे
सभापती, कृ.उ.बा.स. औसा
मो. ९४२३७३६८२२

सर्व सन्माननीय संचालक मंडळ :

श्री. कोपरकर प्रवीण प्रभाकर
श्री. काकडे प्रकाश चंद्रकांत
सौ. वीर संतोषी अशोक
श्री. जाधव राधाकृष्ण बालाजी
श्री. भोसले गोविंद काशीनाथ

श्री. लंगर संदिपान मनोहर
श्री. धुमाळ अजित सिद्राम
श्री. नरहारे विकास पंडितराव
श्री. वळके रमाकांत विठ्ठल
श्री. औटी सुरेश सिद्धाप्पा
श्री. पुंड शंकर शहाजी

श्री. बिराजदार युवराज शाहुराज
सौ. झिरमिरे चंद्रकला पुरुषोत्तम
श्री. कुलकर्णी ईश्वर रामविलास
श्री. कावळे मोहन विष्णू
श्री. जाधव धनराज जयहिंद

व कर्मचारी वृंद

सोलापूर तरुण भारत ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

शुभेच्छुक : कृषी उत्पन्न बाजार समिती, औसा/किल्लारी/उजनी

टीप : सर्व शेतकऱ्यांना बाजारभाव, ताज्या बातम्या व घडामोडी, सूचना व आवाहन यांच्यासाठी MyAPMC ॲप प्लेस्टोर वरून डाऊनलोड करावे.


# समाजसेवेचा ‘प्रिसिजन’ पॅटर्न!

PRECISION

समाजाचं आपण काही देणं लागतो या कृतज्ञतेच्या भावनेतून प्रिसिजनने सामाजिक कार्याला प्रारंभ केला. सोलापूरच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि विकासात्मक घडामोडींमध्ये प्रिसिजनचं योगदान देण्याचा प्रयत्न केला आहे.

■ प्रकल्पांची संख्या - ११२ | ■ गावांची संख्या - २७७ | ■ लाभार्थी संख्या - १३,२४,८६७

- सन २००६ मध्ये प्रिसिजन फाउंडेशन या सामाजिक विश्वस्त संस्थेची स्थापना करून सामाजिक कामाला प्रारंभ केला. शिक्षण, आरोग्य, शाश्वत विकास आणि साहित्य, कला, संस्कृती या क्षेत्रात कार्य सुरू झाले.
- प्रिसिजनने काळाची गरज ओळखून डिजीटल शिक्षणावर भर दिला. गेल्या ९ वर्षात सोलापूर जिल्ह्यातील १४९ शाळांमधील १६६ वर्गखोल्यांमध्ये इंटरॅक्टिव्ह ई-लर्निंग किट बसवले.
- ई-लर्निंग किट बसवलेल्या शाळांमध्ये वीज पुरवठा खंडित होतो. त्यामुळे अशा शाळांमध्ये प्रिसिजनने सोलार पॅनल बसवून वीज पुरवठा अखंड राहील याची काळजी घेतली.
- विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देणारा ‘अविष्कार’ प्रकल्प प्रिसिजनने राबविला. यासाठी विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी कार्यशाळा घेतल्या.
- विद्यार्थ्यांना शास्त्रीय गायन, वादन, नृत्य या कलांचा परिचय व्हावा या हेतूने प्रिसिजनच्या माध्यमातून ‘बैठक ॲट स्कुल’ हा उपक्रम राबविला जातो.
- वाचन आणि लेखनाची सवय वाढावी यासाठी प्रिसिजन आणि युनिक फिचर्स यांच्या माध्यमातून ८ शाळांमधून १००० हजार विद्यार्थ्यांसाठी ‘पासवर्ड वाचन अभियान’ राबविले जाते.
- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विज्ञान शिकण्यासाठी पुरेशा प्रयोगशाळांची व्यवस्था नसते. प्रिसिजनने स्टेम लर्निंगच्या माध्यामातून जिल्ह्यातील पाच शाळांमध्ये ‘मिनी सायन्स सेटंर’ची उभारणी केली.
- प्रिसिजनने रूग्णांची गरज लक्षात घेऊन सिव्हिल हॉस्पिटलमध्ये एक सुसज्ज असा हेमो डायलेसिसचा वार्ड तयार करून दिला. २०१८ पासून आजवर १२,९६० रूग्णांनी याचा लाभ घेतला आहे.
- डॉ. हेडगेवार रक्तपेढीला अत्याधुनिक सेंट्रिफ्यूग मशिन देण्यात आली. ही स्वयंचलित मशिन असल्याने मानवी हस्तक्षेपाला आणि चुकांना इथे वाव नाही.
- सोलापूरातील मार्कंडेय रूग्णालयास अत्याधुनिक सुविधा असलेली ‘कार्डियाक ॲम्बुलन्स’ देण्यात आली.
- चिंचणी हे पंढरपूर तालुक्यातील स्थलांतरीत गाव आहे. या गावातील सार्वजनिक पाणीपुरवठा यंत्रणा सौर ऊर्जेवर करण्यात आला आहे. तसेच या गावात सौर पथदिवे बसविण्यात आले.
- दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगांव येथे प्रिसिजनच्या सी एस आर निधितून पुण्यातील सेवावर्धिनी या संस्थेच्या सहकार्याने जलसंर्वधन आणि व्यवस्थापन प्रकल्प राबविला जात आहे.
- दरवर्षी सामाजिक क्षेत्रात निरपेक्षपणे कार्य करणाऱ्या संस्थांना ‘प्रिसिजन सामाजिक पुरस्काराने’ गौरविले जाते. आजवर ३० संस्थांना हे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.










वैष्णवांचा मेळा भक्तांचा सागर समानतेचा संदेश कपाळावर टिळा गळ्यात तुळशीची माळ अन् मुखाने हरिनाम असे दृश्य म्हणजे वारी. महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा म्हणजे वारी. महाराष्ट्राची ओळख म्हणजे वारी. महाराष्ट्राचे वैभव म्हणजे वारी. संतांची शिकवण म्हणजे वारी. ईश्वरी प्रेमाची विलक्षण अनुभूती घेण्याची संधी म्हणजे वारी. विशिष्ट तिथीला आपल्या इष्टदेवताकडे जाणे म्हणजे वारी. घरुन निघायचे, एखाद्या संताच्या गावी जायाचे आणि त्या ठिकाणावरुन निघणाऱ्या दिंडीसोबत पंढरपूरला जाणे म्हणजे वारी. पंढरपूरला जाऊन विठूरायाचे दर्शन 'याची देही याची डोळा घेणे' म्हणजे वारी. २० ते २२ दिवस सर्व संसारीक वैभव, सुख सोडून फक्त ईश्वराच्या धान्यात राहणारे वारकरी लाखोंच्या संख्येने महाराष्ट्रात आहे. ही वारी कधी चुकवायची नाही असे म्हणणारे वैष्णव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आहेत. कधी अन् कशी सुरु झाली वारीची परंपरा. वारी आणि दिंडीमधील फरक काय, राज्यभरातून किती दिंड्या निघतात जाणून घेऊ या महाराष्ट्रातील अनोख्या परंपरेची.

# विठूरायाचे दर्शन 'याची देही याची डोळा घेणे' म्हणजे वारी, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेची वारी; संताची शिकवण म्हणजे वारी



# इतिहास पंढरीच्या वारीचा




शिवाजी हळणवर

मो. ९८६००४००१३


## विठ्ठल पंढरपुरात आले तरी कसे?

विठ्ठल आणि पंढरपूर यासंदर्भात तीन पुराणांमध्ये उल्लेख आला आहे. स्कंदपुराण, पद्मपुराण आणि विष्णुपुराण यामध्ये विठ्ठलाचा उल्लेख आहे. भगवान विष्णू रुसलेल्या माता रुख्मणी यांची समजूत काढण्यासाठी दिंडीरवन म्हणजे आजच्या पंढरपुरात आले होते. त्यावेळी त्यांना आपला भक्त पुंडलिक यांची आठवण झाली. भगवंत स्वत: मग पुंडलिक यांच्या दारी पोहचले.





तेव्हा पुंडलिक आई-वडिलांची सेवा करत होते. त्यांना घरी कोणीतरी आले आहे, हे कळाले. त्यांनी मागे वळून पाहिल्यावर साक्षात परब्रम्ह भगवान विष्णू दाराशी आलेले दिसले. भगवंत पुंडलिक यांना आवाज देत होते. मग पुंडलिक यांनी त्यांच्याजवळ असलेली एक विट फेकली आणि देवाला म्हणाले, या विटेवर उभा राहा. माझी आई-वडिलांची सेवा झाली की, मी तुमच्या दर्शनाला येतो. भगवान विष्णु त्या विटेवर उभे राहिले. त्यानंतर आई-वडिलांची सेवा झाल्यावर पुंडलिक भगवंताकडे आले. त्यांनी भगवंताची क्षमा मागितली. परंतु भगवंत तर आपल्या भक्तावर प्रसन्न झाले होते. त्यांनी पुंडलिक यांना हवे ते वर मागण्यास सांगितले. भक्त पुंडलिक यांनी भगवंतांना त्याच विटेवर त्या ठिकाणी राहावे, अशी विनंती केली. मग भगवंत विटेवर पांडुरंग बनून, विठ्ठल बनून उभे राहिले. त्याच पंढरपुरात विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी वारीच्या माध्यमातून आषाढी अन् कार्तिकी वारीला लाखो भक्त राज्यभरातून जातात.

## वारी कधी सुरु झाली?

वारीचा इतिहास खूप दीर्घ आहे. त्यासाठी दीर्घ हा शब्द छोटा पडावा इतर मोठी परंपरा वारीला आहे. भागवत धर्माचा प्रचार करण्यासाठी वारी सुरु झाली. हे विश्वच माझे घर हा संदेश देण्यासाठी वारी सुरु झाली. वारी नेमकी कधी सुरु झाली? त्याचा नेमका उल्लेख नाही. परंतु संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या अभंगामध्येही वारीचा उल्लेख आहे, असे संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी म्हटले आहे. वारी करण्याची परंपरा साधारणतः ८०० वर्षांहून अधिक काळापासून आहे. ऐतिहासिक संदर्भांमध्ये १३ व्या शतकापासून वारीचे संदर्भ आणि पुरावे मिळतात. परंतु वारी त्यापेक्षा प्राचीन आहे. संत तुकाराम महाराज संस्थानचे विश्वस्थ आणि संत तुकाराम महाराजांचे वंशज भानुदास मोरे म्हणतात, वारी आदी शंकाराचार्यापासून सुरु झाली. देव जेव्हा पांडुरंग आवतारात आले. तेव्हापासून वारी सुरु झाली. त्यानंतर पालखी सोहळा सुरु झाला. पुंडलिकामुळे विठ्ठल पंढरपूरमध्ये आले. त्यानंतर वारीची पद्धत सुरु झाली. परंतु हे कोणी घालून दिली त्याची काहीच माहिती नाही. एका सिद्धांतानुसार, वारकरी संत ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत यांनी आषाढ आणि कार्तिक या हिंदू महिन्यांत पंढरपूरला जाण्यासाठी वारी सुरू केली.

## वारकरी कोणाला म्हणतात?

संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे म्हणतात, 'महाराष्ट्रात असंख्य प्रथा आहेत. परंतु 'पंढरीची वारी' ही प्रथा नाही. ती साधनाही नाही. तो एक उत्सव आहे. विठ्ठलाप्रती मनोभावे केलेली उपासना आहे. पंढरपूरची वारी ही सामूहिक उपासना पद्धत आहे. विठ्ठलाची उपासना करणाऱ्या लोकांना वारकरी म्हणतात. वारीसोबत जाणारे वारकरी असतात. वारी आषाढ आणि कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशी अशी दोन्ही वेळा जाते. वारीसाठी हजारो लोक विविध गावांवरुन संतांच्या गावी एकत्र येतात. नाचत, गाजत, खेळत दिंडीत सहभागी होतात.

## वारी अन् पालखी यामध्ये फरक काय?

महाराष्ट्राची व्याख्या करताना वारीला आणि संताना वगळून व्याख्या करता येणार नाही. वारी ही खूप जुनी परंपरा आहे. परंतु पालखी ही वारीसारखी जुनी परंपरा नाही. पालख्या संताच्या पादुका घेऊन पंढरपूरला जातात. १६८५ मध्ये तुकाराम महाराजांचे तिसरे चिरंजीव नारायण महाराज यांनी प्रथम पालखी सोहळा सुरु केला. जगदगुरु नारायण महाराज यांनी सुरु केलेला पालखी सोहळा म्हणजे वारीचा टर्निंग पाईंट म्हणता येईल. त्यांनी वेगवेगळ्या गावावरुन जाणाऱ्या सर्व दिंड्या एकत्र केल्या आणि तुकाराम महाराजांच्या पादुका घेतल्या. तसेच ज्ञानेश्वर महाराजांच्याही पादुका घेतल्या. त्या दोन्ही पादुका घेऊन पालखी पंढरपूरकडे निघाली. त्या वेळी तुकाराम महाराज आणि ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका गळ्यात घालून नेल्या जात होत्या. दोन्ही पादुका एकाच पालखीत जाऊ लागल्या. त्यामुळेच ज्ञानोबा-तुकोबा हे भजन सुरु झाले. १६८५ पासून १४७ वर्ष या पद्धतीने पंढरपूरला पालखी जात होती. त्यानंतर१८३२ मध्ये दोन्ही पालखी सोहळे विभक्त झाले. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज या दोन्ही पादुका वेगवेगळ्या पालखीतून वेगवेगळ्या मार्गाने जावू लागल्या. आषाढी वारीला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शेकडो संतांच्या-सत्पुरुषांच्या पालख्या आता पंढरीस येतात.

## महाराष्ट्रातून निघणाऱ्या महत्वाच्या पालख्या

राज्यभरातून २०० ते २५० पालख्या पंढरपूरला जातात. अनेक पालख्यांना संतांची नावे आहेत. पालख्यांसोबत चार ते पाच लाख वारकरी पायी पंढरपूरला जातात.

**संत निवृत्तीनाथांचा पालखी सोहळा :** संत ज्ञानेश्वर यांचे मोठे बंधू संत निवृत्तीनाथ. ते ज्ञानेश्वर महाराजांचे गुरु आहेत. त्यांनी नाशिकमधील त्र्यंबकेश्वर येथे समाधी घेतली. त्यांच्या समाधी मंदिरातून पालखी निघते.

**संत सोपनकाका पालखी सोहळा :** संत ज्ञानेश्वर यांचे लहान बंधू सोपानदेव यांनी सासवड (जि. पुणे) येथे समाधी घेतली होती. त्यांच्या नावाने सासवड येथील समाधी मंदिरातून पालखी निघते.





**श्री संत मुक्ताई पालखी सोहळा :** संत ज्ञानेश्वर यांची बहीण संत मुक्ताई. जळगाव जिल्ह्यातील कोथळी (ता.मुक्ताईनगर) हे त्यांचे समाधीस्थळ. त्या ठिकाणावरुन संत मुक्ताई यांची पालखी निघते. या पालखीतील वारकरी तब्बल ५६० किलो मीटरचा पायी प्रवास करतात. त्यासाठी त्यांना ३३ दिवस लागतात**संत एकनाथांचा पालखी सोहळा :** संत एकनाथांची पैठण (छत्रपती संभाजीनगर) येथे कर्मभूमी आहे. त्यांचे त्या ठिकाणी मंदिर आहे. त्या मंदिरातून संत एकनाथ यांची पालखी निघते.

**संत गजानन महाराज यांची पालखी :** शेगावचे संत गजानन महाराजांचा पालखी सोहळा विदर्भातून निघतो. सलग ३१ दिवस पायी वाटचाल करत गजानन महाराजांची पालखी पंढरपूरला येते.

**संत ज्ञानेश्वर यांची पालखी :** श्री क्षेत्र आळंदी येथे संत ज्ञानेश्वर यांची समाधी. त्या ठिकाणावरुन संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी निघते. श्री हैबतबाबांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका पालखीत घालून दिंडी पंढरपूरला नेण्याची प्रथा चालू केली.

**संत तुकाराम यांची पालखी :** संत तुकाराम यांची पालखी देहू येथून निघते. संत तुकाराम महाराज यांचे धाकटे चिरंजीव संत नारायण महाराज देहूकर यांना पालखी सोहळ्याचे जनक म्हटले जाते.





**भान हरपून खेळ खेळतो,**
**दंगतो भक्तीत वैष्णवांचा मेळा..**
**भक्तिने भारलेला रिंगण सोहळा**
**पाहावा 'याचि देही याचि डोळा'**
**वारीतील आकर्षण म्हणजे रिंगण सोहळा**

असे रिंगण सोहळ्यासंदर्भात म्हटले जाते. वारीतील सर्वात महत्वाचे आकर्षण म्हणजे रिंगण सोहळा आहे. वारीत मराठा सरदार सहभागी होत होते. त्यांनीच रिंगण सोहळ्याची परंपरा सुरु केली. मराठा सरदार आपले लष्कर घेऊन वारीला येत होते. त्यावेळी त्यांनी वारीत रिंगण सोहळा सुरु केला. त्यामुळेच एखाद्या लष्कारी छावणीसारखी रिंगणाची रचना केली जाते. तसेच रिंगण लष्करी शिस्तीप्रमाणे पार पडते. या रिंगणाचे मुख्य आकर्षण असते अश्वांची दौड. त्यात दोन अश्व सहभागी होतात. यातील एका अश्वावर स्वार असतो तर दुसरा अश्व रिकामा असतो. त्या रिकाम्या अश्वावर संत बसतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. मग चोपदार अश्वाला रिंगणाचा मार्ग फिरून दाखवतात. त्यानंतर अश्व मोकळा सोडलो जातो. हे अश्व रिंगणाला तीन फेऱ्या मारतात. त्यावेळी माउली, माउलीचा गजराने परिसर दुमदुमुन जातो. अश्वाची दौड हा रिंगणाचा कळस असतो. या रिंगणामध्ये मोकळ्या ठेवलेल्या मार्गावर तुळशी वृंदावन घेतलेल्या महिला, हातात पताका म्हणजे झेंडा घेतलेले वारकरी व विणेकरी हे स्वतंत्ररित्या धावतात.वारीत मेंढ्याचे रिंगणसुद्धा होते. संत तुकाराम महाराज आणि संत सोपानकाका पालखी सोहळ्यात मेंढरांचे रिंगण होते. या रिंगणामध्ये धनगर भाविक आपली मेंढरे घेऊन पळतात. ही मेंढरे रथाच्या भोवती प्रदक्षिणा घालतात.

## वारीची व्यवस्था आणि अध्यात्मिक पातळीवर नेतृत्व

लाखो वारकरी शिस्तीने पंढरपूर जातात. कुठेही गोंधळ होत नाही. वर्षानुवर्ष चालणारी ही चोख व्यवस्था म्हणजे एक अभ्यासाचा विषय आहे. वारीची व्यवस्था संतांना समोर ठेऊन केली जाते. पालख्यांची व्यवस्था त्या त्या पालखीतील प्रमुख करतात. संत एकनाथ, संत तुकाराम महारांजांच्या वंशजाकडून त्यांच्या पालखीची व्यवस्था पहिली जाते. ज्ञानेश्वर महाराज पालखीची व्यवस्था संस्थानकडून पाहिली जाते. छत्री ज्याच्या डोक्यावर ते या वारीचे कुटुंबप्रमुख असतात. म्हणजे संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीत संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या डोक्यावर छत्र असते. तेच प्रमुख असतात. तसेच विणा ज्याच्या गळ्यात असते, ते विणेकरी भजनाचे नेतृत्व करतात. वारीसंदर्भात शासनाशी चर्चा करण्यासाठी विविध पदे तयार केली गेली आहे. ते शासनाच्या संपर्कात असतात. वारीत आलेल्या शेकडो दिंड्यांचे व्यवस्थापन त्या दिंडीच्या प्रमुखांकडून केले जाते. वारीत लाखो लोक शिस्तीने चालत असतात. त्यासाठी वारकऱ्यांची पाच, पाचची रांगा असते. वारकरी कधी दिंडी ओलांडत नाही. ते पताकाच्या समोरुन जातात. अगदी शिस्तीने भजन करत, नृत्य करत त्यांची वाटचाल पंढरपूरच्या दिशेने होते. त्यांच्या जेवणाच्या वेळा, बसण्याच्या वेळा, तंबू लावण्याचा वेळा ठरलेल्या असतात.

## निरोपाची रंजक परंपरा

वारीत निघाल्यावर २० ते २५ दिवस व्यक्ती घरी येत नाही. त्यामुळे त्यांच्या घरच्या मंडळींना काही निरोप द्यायचा असेल तर एक चांगली प्रथा होती. आता प्रत्येकाजवळ मोबाईल असल्यामुळे ती प्रथा मोडीत निघाली. पण पूर्वी कोणाचा काही निरोप आल्यावर त्या व्यक्तीचे नाव आणि दिंडी नंबर टाकला जात होतो. तो निरोपाचा कागद पोतदाराकडे दिला जात होता. पोतदार तो निरोप दिंडी प्रमुखाकडे घेऊन जात होता. दिंडी प्रमुख त्या व्यक्तीपर्यंत निरोप पोहचवत होता. पूर्वी पत्र लिहिण्याची सेवा करण्यासाठी सुशक्षित मुले असायची. ती वारकऱ्यांना पत्र लिहून देत होती. पण आता मोबाईल फोनमुळे सर्वच बदलले आहे.

## वारीमध्ये महिलांचे स्थान

वारीत पुरुष, महिला असा कधी भेद नाही. महिलांना मानाचे स्थान आहे. वारकरी संप्रदायात नामदेव महाराज यांच्यानंतर जनाबाई यांनी फळ प्रमुख म्हणून काम केले. मुक्ताई यांची पालखी निघते. पहिल्या महिला लेखिका म्हणून मुक्ताईबाईचा उल्लेख करावा लागले, असे असे संत साहित्याचे अभ्यासक सचिन महाराज पवार यांनी सांगितले. ते म्हणाले, मुक्ताबाई त्या काळात स्वत:च्या नावाने अभंग लिहीत होत्या. त्यांच्या साडेतीनशे वर्षांनी विदेशात कांदबरी एका महिलेने लिहिली. परंतु त्या कादंबरीला लेखक म्हणून पुरुषाचे नाव दिले होते. आपल्याकडे कीर्तन करणाऱ्या वारकरी महिला आहेत. वारकऱ्यांच्या मनामध्ये महिलांसंदर्भात कोणतीही वेगळी भूमिका नाही. वारीत जाणाऱ्या सर्वांना माऊली म्हटले जाते. वारीमध्ये महिला म्हणून कधी कोणाला नाकारला जात नाही.

## काय आहे त्या वारीत?

पंढरपुरात एक विठ्ठलाची मूर्ती आहे. त्या पांडूरंगच्या दिशेने राज्यभरातील सर्व जाती-धर्माचे लोक लाखोंच्या संख्येने चालत जातात. वारकरी कित्येक किलोमीटरचा रस्ता तुडवत त्या पांडुरंग परमात्म्याला पाहण्यासाठी जातात अन् हा अनुपम सोहळा उभा महाराष्ट्र तल्लीन होऊन पाहत असतो. वारीमुळे द्वेष, अहंकार बाजूला सरला जात आहे. अंतकरण शुद्ध होते. वारीचा हा सुंदर सोहळा महाराष्ट्राशिवाय जगात कुठेच नाही.म्हणून जन्माला आलेल्या व्यक्तीने वारी करायलाच हवी.




**स्वातंत्र्यपूर्व काळापासून गिरणगाव अर्थात सोलापूरचे महत्त्व भारताच्या इतिहासात अद्वितीय आहे. स्वातंत्र्यलढ्यात सोलापूरचे योगदान महत्त्वपूर्ण असे आहे. सोलापूर पालिकेला स्वातंत्र्य लढ्याचा जाज्वल्य व क्रांतिकारी असा इतिहास आहे. सोलापूर शहरालाही स्वातंत्र्य लढ्याचा क्रांतिकारी जाज्वल्य इतिहास आहे. महापालिकेच्या स्थापनेपासून एकूण ६० वर्षाच्या कार्यकाळात सोलापूर शहराचा चेहरा मोहरा बदलला आहे. पर्यावरणपूर्वक सुशोभीकरणातून नवा लूक दिला जातोय. १८५२ ते १९६४ पर्यंत नगरपालिका आणि त्यानंतर आजतागायत महानगरपालिका नगर विकासात अखंडपणे कार्यरत आहे. या कार्यकाळात गिरणगाव ते स्मार्ट सिटी अशा प्रवासात सोलापूर शहरात अमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. स्मार्ट सिटी म्हणून ओळख होत असली तरीही संपूर्णपणे मूलभूत समस्या सुटली नसल्याचे चित्र आहे.**



# गिरणगाव ते स्मार्ट सिटी प्रवासातील सोलापूर महापालिकेचा इतिहास




किरण बनसोडे

मो. ९८२२६१६१४१


सोलापूर ही पूर्वी १८७४ पर्यंत उतार पेठ म्हणून ओळखली जायची. त्यानंतरच्या काळात सोलापूर स्पिनिंग अँड विविंग मिलसह (जुनी मिल) अनेक गिरण्या स्थापन झाल्या. हजारो गिरणी कामगार कार्यरत होते, तेव्हापासून सोलापूरला गिरणगाव अशी ओळख निर्माण झाली आणि आता स्मार्ट सिटी म्हणून ओळख होऊ पाहत आहे. सोलापूर महापालिकेचा इतिहास महत्त्वपूर्ण असा आहे.

सन १८५१च्या दरम्यान सोलापुरात विविध नागरी समस्यांनी आणि मूलभूत सोयी सुविधा अभावी सोलापूरकर त्रस्त झाले होते. या सोयी सुविधा मिळाव्यात. सुधारणा व्हाव्यात अशी सोलापूरकरांची भावना होती. मि. एन्व्हारारिटी व मि. लॉफनन या तत्कालीन दोन कलेक्टरांच्या प्रोस्ताहनातून सन १८५०च्या ॲक्ट २६ नुसार स्थानिक गैरसोयी दूर करण्यासाठी सरकारकडे सोलापूर शहरातील १७२ नागरिकांनी नगरपालिका स्थापनेची अर्जाद्वारे मागणी केली. शहरातील रहिवाशांना पाण्यासाठी केवळ तलावावर अवलंबून राहावे लागते ज्या खोडवीने तलावास पाणी येते. त्याचे बांध फुटले आहेत. त्यामुळे तलावास पुरेसे पाणी येत नाही. तलाव गाळाने भरला आहे. हे जर थांबवले नाही तर नागरिकास व जनावरास बहुत दुःख होईल. रस्ते, बोळ गल्ली यांची दुरुस्ती नसल्यामुळे आणि पावसाळ्यात गलिच्छ स्थितीत असल्यामुळे रस्त्याने जाणे मुश्किल होते. त्याची दुरुस्ती होणे जरुरीचे आहे. दुसरी महत्त्वाची अडचण म्हणजे एकाच तलावातून पाणी न्यावे लागते. नळाने पाणी आणून शहरात ठीक ठिकाणी हौद बांधल्यास जनतेस बहुत सुख लाभेल. त्यामुळे अशा प्रकारच्या सुधारणा करण्याची आमची इच्छा आहे, असा आशय असलेला अर्ज दि. २८ ऑगस्ट १८५१ रोजी बापूजी कृष्ण व इतर १७२ सोलापूर करांच्या स्वाक्षरीने सरकारला देण्यात आला होता. रस्ते पाणीपुरवठा आणि आरोग्य याबाबत अशी सोय करावा की जनतेस बहुत सुख लाभेल, अशी महत्त्वाची मागणी तत्कालीन नागरिकांनी केली होती.

दरम्यान, दि. १ ऑगस्ट १८५२ रजी सोलापूर नगरपालिकेची स्थापना करण्यात आली. सोलापूर नगरपालिकेची पहिली सभा ३ ऑगस्ट १८५२ रोजी कलेक्टर कचेरीतील एका हॉलमध्ये भरवण्यात



आली होती. नगरपालिकेचे कार्यालय मंगळवार पेठ येथे होते मात्र नगरपालिकेची सभा कलेक्टर कचेरीतच होत होती.

**मंगळवार पेठेतील काशीबाई शेटे यांचा वाडा ते कौन्सिल हॉल**

नगरपालिकेची स्वतःची मालकीची इमारत नसल्याने सुरुवातीला मंगळवार पेठेत काशीबाई शेटे यांच्या वाड्यात सहा खण सोपा व सहा खण माडी अशी बारा खण जागा दरमहा रुपये पाच रुपये भाड्याने घेण्यात आली होती. तत्कालीन कचेरीची वेळ सकाळी १० ते सायंकाळी ५ अशी ठरवण्यात आली होती. वेळ समजण्यासाठी व वालुका यंत्र ठेवण्यात आले होते. त्यानंतर पुढे नवी पेठ येथील दगडी इमारतीमध्ये नगरपालिकेचे कामकाज सुरू झाले. तिथून इंद्रभुवन इमारत आणि पुढे कै. यशवंतराव चव्हाण सभागृह (कौन्सिल हॉल) असा महापालिका कामकाजाचा प्रवास झाला आहे.

**चंदनी अत्तर लावून सभासदांना दोन पानाचे विडे दिले जात**

नगरपालिकेच्या सभेवेळी प्रत्येक सभासदास दोन पानाचे विडे दिले जात होते आणि सभेच्या शेवटी चंदनी अत्तर लावून गुलाब पाणी शिंपडण्यात येत असे. प्रत्येक सभेस विड्यांची सहाशे पाने व इतर सामान अंदाजे लागत होते. पान सुपारीचा खर्च नगरपालिकेमार्फत केला जात होता. कलेक्टर कचेरीतील इतर अधिकारी, कारकून, पट्टेवाले त्याचबरोबर उपस्थित लोकांनाही पान सुपारी दिली जात असे.

१८५२साली सभासद संख्या १३ होती. १८५२ ते १८८३ या काळात शासन नियुक्त सभासद होते. त्यात अधिकारी व प्रतिष्ठित नागरिकांचा समावेश होता. १८८३मध्ये नगरपालिकेची प्रथमच निवडणूक झाली. नागरिकांनी मतदानाद्वारे निवडलेले १२ तर शासनाने नेमलेले १४ असे २६ सभासद या नव्या नगरपालिका मंडळात होते. ऑगस्ट १८८५ रोजी पहिल्या लोकनियुक्त नगराध्यक्षांची निवड झाली. राव बहादूर आप्पाजी देगावकर हे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष ठरले. सन १९४७ मध्ये ''नगरसेवा हीच ईश सेवा'' हे नगरपालिकेचे ब्रीदवाक्य सर्वांमध्ये संमत करण्यात आले.

दरम्यानच्या काळात सोलापूर नगरपालिकेचा कारभार (सध्याच्या नवी पेठ येथील प्राथमिक शिक्षण मंडळ) स्वतःच्या दगडी बिल्डिंगमध्ये सुरू झाला. त्यानंतर एक मे १९६४ रोजी नगरपालिकेचे महानगरपालिकेमध्ये रूपांतर झाले. महानगरपालिकेचा कारभार इंद्रभुवन इमारतीतून सुरू झाला. सन १९९८ पासून महापालिका आवारातील कै. यशवंतराव चव्हाण कौन्सिल हॉल या वास्तूत सभेचे काम सुरू झाले. सध्या कौन्सिल हॉल, इंद्रभुवन आणि प्रशासकीय इमारत अशा तीन वास्तूंमधून महापालिकेच्या कारभाराचा गाडा चालवला जातो.

**पारतंत्र्यात नगरपालिकेवर फडकविले राष्ट्रीय निशाण**

दि. ६ एप्रिल १९३० रोजी सोलापूर नगरपालिकेवर राष्ट्रीय झेंडा फडकवण्यात यावा असा ठराव करण्यात आला. त्यानुसार देशभक्त अण्णासाहेब भोपटकर यांच्या हस्ते सध्याच्या नवी पेठ येथील नगरपालिकेच्या इमारतीवर राष्ट्रीय निशाण फडकवण्यात आले. पारतंत्र्यातही दि. ९ ते १२ मे १९३० दरम्यान सोलापूरकरांनी स्वातंत्र्य उपभोगले. आक्रमक क्रांतिकारी लढा उभारल्याने ब्रिटिशांनी सोलापुरात मार्शलला पुकारला. मार्शल लॉच्या काळात नगरपालिकेवर उभारण्यात आलेले राष्ट्रीय निशाण उतरावे असे फर्मान ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सोडले मात्र त्याला न जुमानता सभासदांनी सर्वानुमते केलेली कृती त्यांच्या संमतीशिवाय मी मागे घेऊ शकत नाही असे बाणेदार उत्तर देऊन निशाण उतरवण्यास तत्कालीन नगराध्यक्ष माणिकचंद शहा यांनी स्पष्ट नकार दिला. असा हा क्रांतिकारी इतिहास आहे. आजही ही वास्तू सर्वांना प्रेरणा देत आहे.

सन १९६४ पासून सोलापूर महानगरपालिकेच्या साठ वर्षाच्या या कालखंडात आतापर्यंत ३७ महापौर व ३६ उपमहापौर झाले. महापौरपदावर तीन जणांची बिनविरोध निवड झाली. महापालिकेत महापौरपदी एकूण ७ महिला विराजमान झाल्या आहेत तर ६ महिलांना उपमहापौर पदाचा मान मिळाला आहे.महापालिकेचे एकूण ३.५ हजार कर्मचारी व अधिकारी मिळून महापालिकेच्या कारभाराचा गाडा ओढत आहेत.

दि. १ ऑगस्ट १८५२ रोजी स्थापन झालेल्या सोलापूर नगरपालिकेचे १ मे १९६४ मध्ये महापालिकेत रूपांतर झाले. महापालिका स्थापनेला साठ वर्षे पूर्ण होत आहेत. या साठ वर्षाच्या कार्यकाळात महापालिका प्रशासन सोलापूर शहर आणि एकूणच कार्यपद्धतीमध्ये फार मोठा बदल झाला असल्याचे दिसून येते.

**अद्याप न सुटलेला पाणी प्रश्न**

भौतिक सुधारणा प्रकर्षाने झाल्या आहेत मात्र गेल्या वीस वर्षात दररोज पाणी पुरवठ्याची अपेक्षापूर्ती झाली नाही. निवडणुकीचा मौसम आला की नेहमीच आणि दररोज पाणीपुरवठ्याचं गाजर राजकीय धोरणी आणि लोकप्रतिनिधींकडून दाखवले जाते. आतापर्यंत अनेक पाणीपुरवठा योजना राबवल्या मात्र अद्यापही न सुटलेला प्रश्न म्हणजे पाणीपुरवठा हा होय. आजही हा पाण्याचा प्रश्न संपूर्णपणे सुटला नाही.

सोलापूर पालिकेला स्वातंत्र्य लढ्याचा जाज्वल्य व क्रांतिकारी असा इतिहास आहे. दरम्यान, सोलापूर महानगरपालिकेच्या स्थापनेपासून ते आतापर्यंत साठ वर्षाच्या कार्यकाळात महिला महापौर, उपमहापौर यांचे योगदान महत्त्वपूर्ण असेच ठरले आहे. शेवटचे नगराध्यक्ष पारसमल जोशी हेच पहिले महापौर झाले. त्या -त्या कार्यकाळात महिला महापौर व उपमहापौरांनी आपापल्या कामाचा वेगळा ठसा उमटविला आहे. सन१९६४ ते २०२२ पर्यंत एकूण ३७ महापौर झाले. त्यामध्ये सात महिला महापौर यांना संधी मिळाली. याच कार्यकाळात एकूण ३६ उपमहापौर झाले. त्यापैकी सहा महिला उपमहापौर झाल्या आहेत. पहिले उपमहापौर एन. एम. वडवान हे सर्वाधिक कालावधीसाठी (१९६४-७०) पदावर होते. सोलापूर महापालिकेत महिला पदाधिकारी व अधिकाऱ्यांचे योगदान मोलाचे ठरले आहे.

महाराष्ट्र शासनाने सोलापूर महापालिकेसाठी दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी आकृतीबंध मंजूर केला. या आकृती बंधानुसार महापालिकेत ४ हजार ६१२ पदे मंजूर करण्यात आली. मंजूर आकृतीबंधानुसार आवश्यक ती पदे सोलापूर महापालिका प्रशासनात उपलब्ध नाहीत. मंजूर पदांपैकी ३ हजार ३९० कर्मचारी व अधिकारी कार्यरत आहेत उर्वरित १ हजार १२५ म्हणजेच सुमारे २५ टक्के कर्मचारी व अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. अपुऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर सोलापूर शहराचा कारभार चालला आहे. सहाय्यक आयुक्तांची १२ तर रिक्त आहेत. एकूण अ, ब, क, ड या चारही वर्गातील सुमारे १ हजार १२५ पदे रिक्त आहेत.

दरम्यान, सोलापूर शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत सुमारे ६०० कोटींची कामे झाले. मात्र, यातील अनेक प्रकल्प देखभाल दुरुस्ती अभावी बंद असल्याचेच दिसून येते. तर उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनी हा महत्त्वपूर्ण प्रकल्प सध्या मार्गी लागत आहे. साधारणता: ७०० कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. अमृत २ योजनेअंतर्गत ड्रेनेज आणि जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी निधी मंजूर आहे. निविदा प्रक्रिया सुरू आहे. उड्डाण पुलाचे काम हे रखडले आहे.

सध्या शहराला चार ते पाच दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. विमान सेवा सुरू करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न असून विमानतळ येथील धावपट्टीचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. गिरणगाव म्हणून ओळख असलेल्या या शहराला मात्र औद्योगिक दृष्ट्या गती मिळू शकली नाही. यामुळे बेरोजगारीचे प्रमाण अधिक असून स्थलांतरही मोठ्या प्रमाणात आहे. रस्ते महामार्गाचे मोठे जाळे निर्माण झाले आहे.

**आजची आणि कालची परिवहन बस सेवा**

सोलापूर शहरातील नागरिकांना बस सेवा सुरू करावी यासाठी शर्तीचे प्रयत्न झाले अखेर दि. १० जानेवारी १९४९ पासून म्युनिसिपालिटीच्या मालकीची बस सेवा सुरू करण्यात आली. त्यावेळी सुरुवातीला १५ बसेस उपलब्ध होत्या. आज ७५ वर्षानंतर महापालिका परिवहन सेवेचा आढावा घेतला असता मधल्या काळात दमदारपणे चालणारी परिवहन सेवा आज डबघाईला आली आहे. आमदनी अठन्नी आणि खर्चा रुपया अशी स्थिती या उपक्रमाची झाली आहे. सध्या सोलापूर शहरात १४ लाख लोकसंख्येसाठी केवळ २८ बसेस मार्गावर धावत असल्याचे दिसून येते. यापूर्वी केंद्र शासनाच्या जे एन एन यु आर एम योजनेअंतर्गत मिळालेल्या सुमारे २०० बसेस सदोष असल्याच्या कारणाने बंद अवस्थेत पडून आहेत. आता पुन्हा नव्याने केंद्र शासनाच्या योजनेतून १०० ई बसेस मंजूर झाले आहेत. महापालिका परिवहन उपक्रम या येणाऱ्या नव्या बसेस कशा पद्धतीने चालवतात, यावरच त्याचे भवितव्य अवलंबून आहे अन्यथा येरे माझ्या मागल्या हे ठरलेलेच!

**तीन महापौर झाले बिनविरोध**

महापालिकेच्या इतिहासात फक्त तीन महापौर बिनविरोध निवडले गेले. मागासवर्गीय प्रवर्गातील पहिले महापौर होण्याचा मान दलितमित्र भीमराव जाधव गुरुजी (१९७४-७५) यांना मिळाला. मुस्लिम समाजाचा पहिला व्यक्ती महापौरपदासाठी उभा असल्याने विरोधकांनी उमेदवार उभा केला नाही. त्यामुळे युन्नूस शेख (१९७५-७६) यांचीही बिनविरोध निवड झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून अनुसूचित जाती प्रवर्गातील मुरलीधर पात्रे (१९९०-९१) यांची बिनविरोध निवड झाली होती.

**पहिल्या महिला महापौर म्हणून शेवंताबाई पवार यांना मान**

सोलापूर शहराच्या पहिल्या महिला महापौर म्हणून शेवंताबाई पवार यांना मान मिळाला. दरम्यान, मार्च २०१२ ते मार्च २०२२ या दहा वर्षाच्या कार्यकाळात अलका राठोड, प्रा. सुशीला आबुटे , शोभा बनशेट्टी, श्रीकांचना यन्नम या चार महिला महापौरांनी सलग कारभार सांभाळला. सन २०१७ ते २०१९ या कालावधीत महापौर आणि उपमहापौर या दोन्हीही महिला होत्या. त्यावेळी शोभा बनशेट्टी या महापौर तर उपमहापौर शशिकला बत्तुल होत्या.

**महापौर व उपमहापौरपदी या मान्यवर महिलांना मिळाली संधी**

सोलापूर महापालिकेत आतापर्यंत ७ महापौर व उपमहापौरपदी ६ मान्यवर महिलांना संधी मिळाली. महापौरपदी शेवंताबाई पवार (सन १९९७- ९८), नलिनी चंदेले (२००२- ०५), अरुणा वाकसे(२००७-०९), अलका राठोड(२०१२-१४), प्रा. सुशीला आबुटे(२०१४-१७), शोभा बनशेट्टी (२०१७-१९) व श्रीकांचना यन्नम (२०१९ -२२) या विराजमान झाल्या होत्या. तर उपमहापौर म्हणून प्रा. नसीमा पठाण(१९७६-७७), सुषमा घाडगे(१९९२-९३), फातिमा शेख(१९९४-९५), महानंदा भोसले(१९९८-९९), सुमन मुदलियार (मार्च १९९९- ऑगस्ट १९९९), शशिकला बत्तुल(२०१७-१९) यांनी कारभार पाहिला.

**पहिल्या महिला आयुक्त म्हणून शितल तेली - उगले ठरल्या मानकरी**

सोलापूर महापालिकेत साठ वर्षाच्या कार्यकाळात आत्तापर्यंत एकूण तीन वेळा प्रशासकीय राजवट होती. या प्रशासकीय राजवटीत आतापर्यंत एकूण सात प्रशासक तथा आयुक्तांनी कारभार पाहिला आहे. आठवे प्रशासक म्हणून सध्या शितल तेली-उगले या कार्यरत आहेत. शितल तेली-उगले या सोलापूर महापालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त तथा प्रशासक ठरल्या आहेत.

**आठव्या प्रशासक म्हणून शितल तेली-उगले यांच्याकडे कारभार !**

सोलापूर महापालिकेवर विविध कारणास्तव तीन वेळा प्रशासकीय राजवट लागू करण्यात आली. यापूर्वीच्या दोन प्रशासकीय राजवटीत एकूण ६ प्रशासकांनी कार्यभार सांभाळला. लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपल्याने लागू केलेल्या सध्याच्या तिसऱ्या प्रशासकीय कारकीर्दीला २ वर्ष पूर्ण झाले आहे. आत्तापर्यंत आठव्या प्रशासक म्हणून शितल तेली - उगले या सध्या प्रशासकीय जबाबदारी सांभाळत आहेत.

दि. १ जून १९६७ ते २२ जून १९६९ दरम्यान सुमारे २ वर्ष २१ दिवस पहिल्यांदा प्रशासकीय कारकीर्द होती. आणि पुन्हा दि. ६ फेब्रुवारी १९८१ ते १२ मे १९८५ या कालावधीत साधारणता: ४ वर्षे ३ महिने प्रशासकीय कारकीर्द होती. असे यापूर्वी दोन वेळेला प्रशासकीय राजवट लागू करण्यात आली होती. १९६७ ते १९६९ आणि १९८१ ते १९८५ या सहा वर्षाच्या कालावधीत यापूर्वी ६ प्रशासकांनी कामकाज पाहिले. या कार्यकाळात एम. जी. सप्रे, डी. डी. रणदिवे, एस. के. जांबवडेकर, व्ही. के. कोल्हटकर, रमानाथ झा आणि ए. के. नंदकुमार या आयुक्तांनी प्रशासक म्हणून काम पाहिले. त्यांची कारकीर्द वैशिष्ट्यपूर्ण ठरली. रमानाथ झा यांच्या कार्यकाळातील अतिक्रमण विरोधात बेधडक कारवाईच्या आठवणी आजही सांगितल्या जातात. मार्च २०२२ पासून तिसऱ्यांदा प्रशासकीय राजवट लागू झाली. महापालिका लोकप्रतिनिधीची पाच वर्षाची मुदत संपल्याने राज्य शासनाकडून ८ मार्च २०२२ पासून प्रशासक म्हणून महापालिका आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली. सुरुवातीच्या काळात आयुक्त पी. शिवशंकर यांनी प्रशासक म्हणून काम पाहिले. त्यांच्या बदलीनंतर दि. २१ नोव्हेंबर २०२२ पासून आजतागायत शितल तेली-उगले या प्रशासक तथा आयुक्तपदाची धुरा कार्यकुशलतेने सांभाळत आहेत.

विशेष म्हणजे मेडिकल हब म्हणूनही सोलापूर पुढे आले आहे. शहरात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असलेली अनेक हॉस्पिटल निर्माण झाली आहेत. बायो वेस्ट वाहतुकीसाठी वाढवलेल्या दरावरून हॉस्पीटल असोसिएशनचे विरोध दर्शविला आहे.सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातही वेगळी ओळख जपली आहे. असे असले तरी नागरी मूलभूत प्रश्न पुर्णपणे सुटले नाहीत.

काळानुसार बदल होत आहेत. राजकीय इच्छाशक्ती अभावी नवे उद्योग आले नाहीत. सोलापूकरांनी रोजी - रोटीसाठी पडेल ते काम केले. आजही बहुतांश तशीच स्थिती आहे. स्मार्ट सोलापूर होत असताना खड्डेमय रस्ते धुळ यासह विविध समस्यांना तोंड द्यावे लागते आहे. राष्ट्रीय स्वच्छ वायु कार्यक्रमांतर्गत सुमारे २२ कोटी रुपयांच्या निधीतून विविध ठिकाणी कामे सुरू आहेत. धूळ मुक्त सोलापूर आणि पर्यावरण पूरक सोलापूर शहरासाठी ही योजना राबवली जात आहे. या योजनेअंतर्गत विविध ठिकाणी रस्ते आणि पर्यावरण पूरक सुशोभीकरण कामे प्रगतीपथावर आहेत.

**महापालिकेचा राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान**

सोलापूर स्मार्ट सिटीतील कामासाठी सोलापूरच्या सीईओ शितल तेली-उगले यांचा राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यामुळे सोलापूर महापालिकेच्या शिरपेचात हा मानाचा तुरा रोवला गेला. तसेच भारत सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय अंतर्गत पंतप्रधान स्वनिधी व स्पार्क २०२३-२४ योजनेतील उत्कृष्ट कामकाजाबाबत सोलापूर महानगरपालिकेला देशात द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला. दिल्ली येथे महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी हा पुरस्कार केंद्रीय मंत्री मनोहर लाल यांच्या हस्ते स्वीकारला.

**दृष्टिक्षेपात अशी आहे महापालिका**

- महापालिकेचे एकूण क्षेत्रफळ - १७८ चौरस किलोमीटर
- एकूण वार्षिक अंदाजपत्रक - ११५७ कोटी रुपये
- एकूण कर्मचारी - सुमारे ३४००
- महापालिकेत ११२५ कर्मचारी - अधिकाऱ्यांची पदे रिक्त
- एकूण वेतनावरील खर्च- ४१ टक्के
- विविध ३१ संवर्गासाठी ३०२ पदाची भरती प्रक्रिया पूर्ण
- वेतन व भत्ते (पाणीपुरवठा व्यतिरिक्त) २२१ कोटी ८ लाख रुपये
- निवृत्तीवेतन, कुटुंबवेतन - ११७ कोटी ९३ लाख रुपये





सोलापूर तरुण भारत

४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

Café Choco Craze




Chaitanya Shopping Centre, Bhaji Mandai,
Near Bharati Vidyapeeth, Vijapur Road, Solapur. Mob. : 7620970998

सोलापूर तरुण भारत

४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

नोंदणी क्रमांक SUR/SSR/RSR(R)2168/2025

स्वावलंबनासाठी एक विश्वासू भागीदार

लोकनीति

महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.भंडारकवठे

दक्षिण सोलापूर, ता कार्यक्षेत्र

८९८०८२५७७७ / ९७६६०३७१९६

loknitee777@gmail.com

श्री महासिध्द मंदिरासमोर, बाळगी रोड, भंडारकवठे, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

दैनिक सोलापूर तरूण भारत वर्धापन दिनास | हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक : ज्ञानेश्वर रामचंद्र काळे



जिल्हा अध्यक्ष : राष्ट्रीय नाभिक संघटना, सोलापूर

शहर उपाध्यक्ष : क्रीडा शिक्षक संघटना, सोलापूर

संस्थापक अध्यक्ष : हिरकणी ट्रेकिंग असोसिएशन, सोलापूर

चेअरमन : सेवासदन संस्था सेवक सहकारी पतपेढी नियमित

सोलापूर तरुण भारत

४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

४१ वा वर्धापन दिन...

महाराष्ट्र शासनाचे अधिकृत मान्यता प्राप्त केंद्र

आपले सरकार सेवा केंद्र, करकंब

भारतीय स्टेट बँक व इंडियन पोस्ट बँक ग्राहक सेवा केंद्र

संचालक | संचालक



मा.समाधान सुरेश गुंड (पाटील) | सुवर्णा समाधान गुंड (पाटील)

शुभेच्छुक

समाधान सुरेश गुंड (पाटील)

सुवर्णा समाधान गुंड (पाटील)

- महसूल विभाग, शासकीय-निमशासकीय कामे व सर्व ऑनलाईन सुविधा केंद्र
- भारतीय स्टेट बँक व इंडियन पोस्ट बँक ग्राहक सेवा केंद्र
- Mo.: 9834661387 / 9689821453

दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनांस हार्दिक शुभेच्छा!



देशपातळीवरील "सर्वोत्कृष्ट साखर कारखाना" म्हणून गौरविलेला व महाराष्ट्र शासनाचा "वनश्री व सहकार भूषण" पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेला

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि; श्रीपूर

ता.माळशिरस, जि.सोलापूर





मा.आ.श्री.प्रशांतराव परिचारक, चेअरमन

## कारखान्याची वैशिष्ट्ये

- सयुंक्त राष्ट्राकडून १० कोटी कार्बन क्रेडिट मिळवणारा भारतातील पहिला साखर कारखाना.
- कारखाना गोडाऊनवर ८० के.व्ही. सोलर प्रोजेक्टची निर्मिती.
- सुपंत माती व पाणी परिक्षण प्रयोगशाळा
- सुपंत जिवाणू खत प्रयोगशाळा.
- मानव विरहीत ऊस वजन काटा.
- वैद्यकीय सेवेसाठी ऑक्सिजन निर्मीती प्रकल्प
- सुपंत पॅकेज्ड साखर १,२,५,१० किलो मध्ये उपलब्ध.
- सपुंत ३०० एकर ऊस बेणे मळा.
- जिल्ह्यात सर्वाधिक ऊस दर देणारा कारखाना.
- जिल्ह्यात सर्वाधिक साखर विक्री दर.
- पाणी बचतीसाठी रेन हार्वेस्टिंग प्रकल्प
- पाणी पुर्नः वापरासाठी सी.पी.ओ. प्रणालीचा उपयोग
- कारखाना परिसरामध्ये ५0000 वृक्ष लागवड.

## देश व राज्य पातळीवरील पुरस्कार

- भारतातील सर्वोत्कृष्ठ साखर कारखाना पुरस्कार प्राप्त
- भारतीय शुगर यांचेकडून "सर्वोत्कृष्ठ कामगिरी" पुरस्कार प्राप्त.
- नॅशनल फेडरेशन यांचेकडून "तांत्रिक कार्यक्षमता" पुरस्कार प्राप्त.
- महाराष्ट्र शासनाचा "सहकार भूषण" पुरस्कार प्राप्त
- महाराष्ट्र शासनाचा "छत्रपती शिवाजी महाराज वनश्री" पुरस्कार प्राप्त.
- महाराष्ट्र राज्य ऊर्जा महामंडळ यांचेकडून "उर्जा संवर्धन पुरस्कार" प्राप्त.
- व्ही.एस.आय. पुणे यांचेकडून "बेस्ट मॅनेजींग डायरेक्टर" पुरस्कार प्राप्त
- व्ही.एस.आय. यांचेकडून "उत्कृष्ठ ऊस विकास पुरस्कार" प्राप्त.
- देश व राज्य पातळीवर विविध संस्थकडून एकूण ५५ पुरस्कार प्राप्त.

सुपंत उत्पादने

सुपंत पॅकेज्ड साखर

सुपंत जैविक खते

सुपंत ऑक्सिजन






श्री.कैलास खुळे, व्हा.चेअरमन

डॉ.यशवंत कुलकर्णी, कार्यकारी संचालक

सौजन्य : उल्का इंडस्ट्रिज प्रा. लि.,पुणे

दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनांस हार्दिक शुभेच्छा!

Late B. E. Chanshetti Guruji Pratisthan's

Global Village Arts, Science & Commerce College, Boramani

Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

503/B/5, Mahatma Gandhi Global Village, Boramani, N. H. 65, Tal: South Solapur, Dist: Solapur. 413002

BCA

Bachelor of Computer Application

(Approved By AICTE, New Delhi & DTE, Mumbai)

First AICTE, New Delhi approved BCA Institute in Solapur District

Approved Intake - 60

ADMISSION OPEN

For - 2024-25

Scan for Location



DTE Code : 16249 | Choice Code : 1624910110

Our Institution offers :
- Well Established Computer Labs.
- Excellence in Education





दैनिक
# तरुण भारत
च्या वर्धापनदिनास
हार्दिक शुभेच्छा!

Hero | MARUTI SUZUKI ARENA | TATA | ROYAL ENFIELD | Vespa | NEXA | ATHER
Apple | Haier | mi | SAMSUNG | SONY | Godrej | IFB

## चव्हाण उद्योग समूह

होटगी रोड ● अक्कलकोट रोड ● जोडबसवण्णा चौक
जुना एम्प्लॉयमेंट चौक ● बाळे

सोलापूर ● धाराशिव ● अकलूज
पंढरपूर ● बार्शी ● विजयपूर

विराश्री



## दै.सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा !

JAYESH DARBI
COLLECTION
SINCE 1994
Feel like a Gentleman..!

अनेक ब्रँडेड कंपन्यांचे
सुटींग-शर्टींग, कॉटन
तसेच लिननचे
सुसज्ज वस्त्रदालन

सोलापुरात कपड्यांचे
एकमेव वातानुकुलित
भव्य शोरुम



Raymond | DONEAR | GRADO | OCM | Reid & Taylor | Silk & Linen

सात रस्ता, रेल्वे लाईन्स, पंखा विहिरीजवळ, सोलापूर
मोबाईल : 8007999111 / 9370999222

आर्यन डिझायन



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

४१ वा
वर्धापन दिन...

संस्थापक



स्व.दलितमित्र
कदम गुरुजी



डॉ.सुभाष कदम
उपाध्यक्ष शिक्षण प्रसारक
मंडळ, मंगळवेढा

शुभेच्छुक

## दलितमित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज मंगळवेढा
बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी, बी.सी.एस

## दलितमित्र कदम गुरुजी फार्मसी कॉलेज मंगळवेढा
बी.फार्मसी, डी.फार्मसी



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

## श्री साई चॅरिटेबल ट्रस्ट
गट नं.६७, सोलापूर-बार्शी हायवे, सासूरे-वैराग, ता.बार्शी,
जि.सोलापूर, महाराष्ट्र. पिन.: ४१३४०२





डॉ. मिरा सुर्यवंशी
अध्यक्षा

- साई आयुर्वेदिक महाविद्यालय अँड रिसर्च सेंटर
- साई होमिओपॅथी हॉस्पिटल
- इंदिरा पॉलिटेक्नीक (डिप्लोमा इंजिनिअरींग)
- श्री साई औद्योगिक प्रशिक्षण संस्था
- स्केल इंडिया कौशल्य प्रशिक्षण केंद्र
- सर्व सोयीनियुक्त सुसज्ज इमारती
- मुलांसाठी दोन स्वतंत्र वसतिगृह
- मुलींसाठी दोन स्वतंत्र्य वसतिगृह
- विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयीयुक्त खेळाचे मैदान




### सायबर क्राइम म्हणजे काय ?...

सायबर क्राईम ही गुन्हेगारी कृती आहे जी एकतर संगणक, संगणक नेटवर्क किंवा नेटवर्क केलेले उपकरण लक्ष्य करते किंवा वापरते. बहुतेक सायबर गुन्हे हे सायबर गुन्हेगार किंवा पैसे कमवू इच्छिणारे हॅकर्स करतात. तथापि, अधूनमधून सायबर गुन्ह्यांमध्ये नफ्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी संगणक किंवा नेटवर्कचे नुकसान करण्याचा हेतू असतो. हे राजकीय किंवा वैयक्तिक असू शकतात. सायबर गुन्हे व्यक्ती किंवा संस्थांद्वारे केले जाऊ शकतात. काही सायबर गुन्हेगार संघटित आहेत, प्रगत तंत्र वापरतात आणि अत्यंत तांत्रिकदृष्ट्या कुशल असतात. इतर नवशिक्या हॅकर्स आहेत.

**सायबर क्राइमचे प्रकार कोणते आहेत?...**

१. ईमेल आणि इंटरनेट फसवणूक.

२. ओळख फसवणूक (जेथे वैयक्तिक माहिती चोरली जाते आणि वापरली जाते).

३. आर्थिक किंवा कार्ड पेमेंट डेटाची चोरी.

४. कॉर्पोरेट डेटाची चोरी आणि विक्री.

५. सायबर लुटणे (धोकादायक हल्ला टाळण्यासाठी पैशांची मागणी करणे).

६. रॅन्समवेअर हल्ले (सायबर लुटण्याचा एक प्रकार).

७. क्रिप्टोजॅकिंग (जेथे हॅकर्स त्यांच्या मालकीच्या नसलेल्या संसाधनांचा वापर करून क्रिप्टोकरन्सीची खाण करतात).

८. सायबर हेरगिरी (जेथे हॅकर्स सरकारी किंवा कंपनीच्या डेटामध्ये प्रवेश करतात).

९. नेटवर्कशी तडजोड करणाऱ्या प्रणालींमध्ये हस्तक्षेप करणे.

१०. कॉपीराइटचे उल्लंघन.

११. बेकायदेशीर जुगार.

१२. अवैध वस्तूंची ऑनलाइन विक्री.

१३. बाल पोर्नोग्राफी मागणे, निर्माण करणे किंवा बाळगणे.

**सायबर गुन्ह्यात खालीलपैकी एक किंवा दोन्हींचा समावेश होतो...**

व्हायरस आणि इतर प्रकारचे मालवेअर वापरून संगणकांना लक्ष्य करणारी गुन्हेगारी क्रिया आणि इतर गुन्हे करण्यासाठी संगणक वापरून गुन्हेगारी क्रियाकलाप.

सायबर गुन्हेगार जे संगणकांना लक्ष्य करतात ते त्यांना मालवेअरने संक्रमित करू शकतात. जेणेकरून ते



उपकरणांचे नुकसान करू शकतील किंवा त्यांचे कार्य थांबवू शकतील. ते डेटा हटवण्यासाठी किंवा चोरी करण्यासाठी मालवेअर देखील वापरू शकतात. किंवा सायबर गुन्हेगार वापरकर्त्यांना वेबसाइट किंवा नेटवर्क वापरण्यापासून रोखू शकतात किंवा एखाद्या व्यवसायाला त्याच्या ग्राहकांना सॉफ्टवेअर सेवा प्रदान करण्यापासून रोखू शकतात, ज्याला इतर गुन्हे करण्यासाठी संगणकाचा वापर करणाऱ्या सायबर गुन्ह्यांमध्ये मालवेअर, बेकायदेशीर माहिती किंवा बेकायदेशीर प्रतिमा पसरवण्यासाठी संगणक किंवा नेटवर्क वापरणे समाविष्ट असू शकते. सायबर गुन्हेगार अनेकदा एकाच वेळी दोन्ही करत असतात. ते प्रथम व्हायरस असलेल्या संगणकांना लक्ष्य



करू शकतात आणि नंतर इतर मशीनवर किंवा संपूर्ण नेटवर्कमध्ये मालवेअर पसरवण्यासाठी त्यांचा वापर करू शकतात. काही अधिकार क्षेत्रे सायबर गुन्ह्यांची तिसरी श्रेणी ओळखतात. जिथे संगणकाचा वापर गुन्ह्यांसाठी सहायक म्हणून केला जातो. चोरीचा डेटा साठवण्यासाठी संगणक वापरणे हे याचे उदाहरण आहे.

**सायबर गुन्ह्यांची उदाहरणे...**

सायबर गुन्हेगारांद्वारे वापरल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या सायबर क्राइम हल्ल्याची काही प्रसिद्ध उदाहरणे आहेत :

**१. मालवेअर हल्ला...**

मालवेअर हल्ला म्हणजे संगणक प्रणाली किंवा नेटवर्क संगणक व्हायरस किंवा इतर प्रकारच्या मालवेअरने संक्रमित होते. मालवेअरने तडजोड केलेला संगणक सायबर गुन्हेगारांद्वारे अनेक उद्देशांसाठी वापरला जाऊ शकतो. यामध्ये गोपनीय डेटा चोरणे, इतर गुन्हेगारी कृत्ये करण्यासाठी संगणक वापरणे किंवा डेटाचे नुकसान करणे यांचा समावेश आहे. मालवेअर हल्ल्याचे एक प्रसिद्ध उदाहरण म्हणजे रॅन्समवेअर हल्ला, मे २०१७ मध्ये केलेला जागतिक सायबर गुन्हा. हा रॅन्समवेअरचा एक प्रकार आहे, मालवेअर हा खंडणीसाठी पीडिताचा डेटा किंवा डिव्हाइस रोखून पैसे उकळण्यासाठी वापरला जातो. रॅन्समवेअरने मायक्रोसॉफ्ट विंडोज चालवणाऱ्या संगणकांमधील असुरक्षिततेला लक्ष्य केले. जेव्हा हल्ला झाला तेव्हा १५० देशांमध्ये २ लाख ३० हजार संगणक प्रभावित झाले. वापरकर्त्यांना त्यांच्या फायली लॉक केल्या गेल्या आणि त्यांना पुन्हा प्रवेश मिळवण्यासाठी बिट कॉइन खंडणी देण्याची मागणी करणारा संदेश पाठवला. जगभरात, सायबर क्राइममुळे ४ अब्ज आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज आहे. आजपर्यंत, हा हल्ला त्याच्या आकार आणि प्रभावासाठी वेगळा आहे.

**२. फिशिंग...**

फिशिंग मोहीम म्हणजे जेव्हा स्पॅम ईमेल किंवा इतर प्रकारचे संप्रेषण, प्राप्तकर्त्यांना फसवून त्यांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करण्याच्या उद्देशाने पाठवले जाते. फिशिंग मोहिमेच्या संदेशांमध्ये संक्रमित संलग्नक किंवा दुर्भावनापूर्ण साइटच्या लिंक असू शकतात किंवा ते प्राप्तकर्त्यास गोपनीय माहितीसह प्रतिसाद देण्यास सांगू शकतात. फिशिंग घोटाळ्याचे एक प्रसिद्ध उदाहरण २०१८च्या विश्वचषकादरम्यान घडले. आमच्या अहवालानुसार, २०१८ फ्रॉड वर्ल्ड कप, वर्ल्ड कप फिशिंग स्कॅममध्ये फुटबॉल चाहत्यांना पाठवलेल्या ईमेलचा समावेश होता. या स्पॅम ईमेलने चाहत्याांना मॉस्को येथे खोट्या मोफत सहलींद्वारे मोहित करण्याचा प्रयत्न केला, जिथे विश्वचषक आयोजित केला जात होता. ज्या लोकांनी या ईमेलमधील लिंक उघडल्या आणि त्याावर क्लिक केले त्याांचा वैयक्तिक डेटा चोरीला गेला. तुमचा आमच्या वेबसाइटचा अनुभव अधिक चांगला करण्यासाठी आम्ही कुकीज वापरतो. ही वेबसाइट वापरून आणि पुढे नेव्हिगेट करून तुम्ही हे स्वीकारता. या वेबसाइटवर कूकीजच्या वापराविषयी तपशीलवार माहिती अधिक माहितीवर करून उपलब्ध आहे ज्या फिशिंग मोहिमेचा आणखी एक प्रकार भाला-फिशिंग म्हणून ओळखला जातो. या लक्ष्यित फिशिंग मोहिमा आहेत. ज्या विशिष्ट व्यक्तींना ते काम करत असलेल्या संस्थेची सुरक्षा धोक्यात आणण्याचा प्रयत्न करतात. मास फिशिंग मोहिमांच्या विपरीत, जे शैलीत अगदी सामान्य आहेत, भाला-फिशिंग संदेश सामान्यतः विश्वसनीय स्त्रोताच्या संदेशांसारखे दिसण्यासाठी तयार केले जातात. उदाहरणार्थ, ते सीईओ किंवा आयटी व्यवस्थापकाकडून आलेले असल्यासारखे बनवले जातात. ते बनावट आहेत असे कोणतेही दृश्य संकेत असू शकत नाहीत.

**३. वितरित हल्ले...**

डिस्ट्रिब्युटेड हल्ला हा एक प्रकारचा सायबर क्राइम हल्ला आहे. ज्याचा वापर सायबर गुन्हेगार सिस्टम किंवा नेटवर्क खाली आणण्यासाठी करतात. काहीवेळा कनेक्ट केलेले (इंटरनेट ऑफ थिंग्ज) डिव्हाइसेसचा वापर वितरीत हल्ले सुरू करण्यासाठी केला जातो. कनेक्शन विनंत्यांसह सिस्टमला स्पॅम करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मानक संप्रेषण प्रोटोकॉलपैकी एक वापरून हल्ला सिस्टमला व्यापून टाकतो. सायबर क्रिमिनल जे सायबर लुटत आहेत ते पैशाची मागणी करण्यासाठी हल्ल्याची धमकी वापरू शकतात. वैकल्पिकरित्याा, सायबर गुन्ह्यांचा दुसरा प्रकार घडत असताना डीडीओएसचा उपयोग विचलित करण्याची युक्ती म्हणून केला जाऊ शकतो. या प्रकारच्या हल्ल्याचे एक प्रसिद्ध उदाहरण म्हणजे यूके नॅशनल लॉटरी वेबसाइटवरील २०१७ हल्ला. यामुळे लॉटरीची वेबसाइट आणि मोबाइल ॲप ऑफलाइन झाले. ज्यामुळे यूकेच्या नागरिकांना खेळण्यापासून रोखले गेले. हल्ल्यामागील कारण अद्याप अज्ञात आहे. तथापि, हा हल्ला राष्ट्रीय लॉटरीला ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न असल्याचा संशय आहे.

# सायबर गुन्हेगार पासून सावधान...






श्रीशैल गजा

मो. ९०११५८०१००

**सायबर गुन्ह्यांचा प्रभाव...**

साधारणपणे सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे. स्टेट ऑफ सायबर सिक्युरिटी रेझिलिन्स २०२१च्या




अहवालानुसार, २०२० ते २०२१ पर्यंत सुरक्षा हल्ल्यांमध्ये ३१% वाढ झाली आहे. प्रति कंपनी हल्ल्यांची संख्या दरवर्षी २०६ वरून २७० पर्यंत वाढली आहे. कंपन्यांवरील हल्ले व्यक्तींवरही परिणाम करतात. कारण त्यांच्यापैकी अनेक ग्राहकांकडून संवेदनशील डेटा आणि वैयक्तिक माहिती संग्रहित करतात. एकच हल्ला. मग तो डेटा भंग, मालवेअर, रॅन्समवेअर किंवा हल्ला असो. सर्व आकाराच्या कंपन्यांना सरासरी २ लाख खर्च करावा लागतो आणि अनेक प्रभावित कंपन्या हल्ल्याच्या सहा महिन्यांच्या आत व्यवसायातून बाहेर पडतात, असे विमा कंपनी नुसार. जेव्हलिन स्ट्रॅटेजी ॲंड रिसर्चने २०२१ मध्ये आयडेंटिटी फ्रॉड स्टडी प्रकाशित केला. ज्यामध्ये असे आढळून आले की वर्षभरातील ओळख फसवणुकीचे नुकसान एकूण ५६ अब्ज होते. व्यक्ती आणि कंपन्या दोघांसाठी, सायबर गुन्ह्यांचा प्रभाव खोलवर असू शकतो. प्रामुख्याने आर्थिक नुकसान, परंतु विश्वास आणि प्रतिष्ठेचे नुकसान देखील.

**सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे...**

सायबर गुन्ह्यांची व्याप्ती पाहता सायबर गुन्हे कसे थांबवायचे असा प्रश्न तुम्हाला पडला असेल? सायबर गुन्ह्यांपासून तुमचा संगणक आणि तुमचा वैयक्तिक डेटा संरक्षित करण्यासाठी येथे काही समजूतदार टिपा आहेत-

१. सॉफ्टवेअर आणि ऑपरेटिंग सिस्टम अपडेट ठेवा.

तुमचे सॉफ्टवेअर आणि ऑपरेटिंग सिस्टीम अद्ययावत ठेवल्याने तुमच्या कॉम्प्युटरचे संरक्षण करण्यासाठी तुम्हाला नवीनतम सिक्युरिटी पॅचचा फायदा होईल याची खात्री होते.

२. अँटी-व्हायरस सॉफ्टवेअर वापरा आणि ते अपडेट ठेवा.

अँटी-व्हायरस वापरणे किंवा सर्वसमावेशक इंटरनेट सुरक्षा उपाय वापरणे हा तुमच्या सिस्टमला हल्ल्यांपासून वाचवण्याचा एक स्मार्ट मार्ग आहे. अँटी-व्हायरस सॉफ्टवेअर तुम्हाला धमक्या समस्या होण्यापूर्वी स्कॅन करू, शोधू आणि काढून टाकू शकतात. हे संरक्षण योग्य ठिकाणी असल्याने तुमच्या संगणकाचे आणि तुमच्या डेटाचे सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण करण्यास मदत होते, तुम्हाला मनाचा आनंद मिळतो. सर्वोत्तम स्तरावरील संरक्षण प्राप्त करण्यासाठी तुमचा अँटीव्हायरस अपडेट ठेवा.





३. मजबूत पासवर्ड वापरा.

मजबूत पासवर्ड वापरण्याची खात्री करा. ज्याचा लोकांना अंदाज येणार नाही आणि ते कुठेही रेकॉर्ड करू नका. किंवा हे सोपे करण्यासाठी यादृच्छिकपणे मजबूत पासवर्ड तयार करण्यासाठी प्रतिष्ठित पासवर्ड व्यवस्थापक वापरा.

४. स्पॅम ईमेलमध्ये संलग्नक कधीही उघडू नका...

मालवेअर अटॅक आणि इतर प्रकारच्या सायबर गुन्ह्यांमुळे संगणक संक्रमित होण्याचा एक उत्कृष्ट मार्ग म्हणजे स्पॅम ईमेलमधील ईमेल संलग्नकद्वारे. तुम्हाला माहीत नसलेल्या प्रेषकाकडून संलग्नक कधीही उघडू नका.

५. स्पॅम ईमेल किंवा अविश्वासू वेबसाइट्समधील लिंकवर क्लिक करू नका.

लोक सायबर गुन्ह्यांचे बळी बनण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे स्पॅम ईमेल किंवा इतर संदेश किंवा अपरिचित वेबसाइटवरील लिंकवर क्लिक करणे. ऑनलाइन सुरक्षित राहण्यासाठी असे करणे टाळा.

६. सुरक्षित असल्याशिवाय वैयक्तिक माहिती देऊ नका.

ओळ किंवा ईमेल सुरक्षित असल्याची तुम्हाला पूर्ण खात्री असल्याशिवाय फोनवर किंवा ईमेलद्वारे वैयक्तिक डेटा कधीही देऊ नका. तुम्ही ज्या व्यक्तीशी आहात त्या व्यक्तीशी तुम्ही बोलत आहात याची खात्री करा.

७. संशयास्पद विनंत्यांसाठी थेट कंपन्यांशी संपर्क साधा.

तुम्हाला कॉल केलेल्या कंपनीकडून वैयक्तिक माहिती किंवा डेटा विचारला गेल्यास, हँग अप करा. तुम्ही त्यांच्याशी बोलत आहात आणि सायबर गुन्हेगार नाही याची खात्री करण्यासाठी त्यांच्या अधिकृत वेबसाइटवरील नंबर वापरून त्यांना परत कॉल करा. आदर्शपणे, एक वेगळा फोन वापरा कारण सायबर क्रिमिनल लाइन उघडू शकतात. जेव्हा तुम्हाला वाटते की तुम्ही पुन्हा डायल केले आहे, तेव्हा ते तुम्ही बोलत आहात असे तुम्हाला वाटते त्या बँकेचे किंवा इतर संस्थेचे असल्याचे भासवू शकतात

८. तुम्ही कोणत्या वेबसाइट ला भेट देता ते लक्षात ठेवा...

ट ु ा म् ह ी

क्लिक करत असलेल्या वर लक्ष ठेवा. ते कायदेशीर दिसतात का? अपरिचित किंवा स्पॅम सारख्या दिसणाऱ्या सह लिंकवर क्लिक करणे टाळा. तुमच्या इंटरनेट सुरक्षा उत्पादनामध्ये ऑनलाइन व्यवहार सुरक्षित करण्यासाठी कार्यक्षमता समाविष्ट असल्यास, ऑनलाइन आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी ते सक्षम असल्याची खात्री करा.

९. तुमच्या बँक स्टेटमेंटवर लक्ष ठेवा...

तुम्ही सायबर गुन्ह्यांचा पटकन बळी झाला आहात हे लक्षात घेणे महत्वाचे आहे. तुमच्या बँक स्टेटमेंटवर लक्ष ठेवा आणि बँकेसोबतच्या कोणत्याही अपरिचित व्यवहारांची चौकशी करा. त्यांची फसवणूक झाली आहे का याचा तपास बँक करू शकते.

**सात महिन्यात ११५० तक्रारी दाखल...**

या सात महिन्यात ११५० तक्रारीची सायबर पोलिस ठाण्याला नोंद झाली आहे. चार कोटींचा फसवणूक २८० प्रकरणांत १५ लाखांचा लागला शोध लागला. केले एक कोटी १० लाख रुपये होल्ड करण्यात आले. सायबर गुन्हेगार कधी जनतेला प्रलोभन देऊन, तर कधी जनतेचा सायबर, ऑनलाईन व्यवहार बाबतीत अज्ञानाचा फायदा घेऊन सायबर चोरट्यांनी लोकांची आर्थिक फसवणूक करत आहेत. आत्तापर्यंत ३५० प्रकरणे निकाली काढली आहेत. या प्रकरणांतील जवळपास १४ लाख ४७ हजार रुपयांचा शोध लागला असून एक कोटी रुपयांची रक्कम होल्ड आहे. ही रक्कम परत मिळविण्यासाठी न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. दिवसेंदिवस सायबर गुन्हे करणारे गुन्हेगार अपडेट होत आहेत. पण सर्वसामान्य नागरिकांनी कोणत्याही अमिषाला बळी पडू नये. कोणतेही ऑनलाईन व्यवहार करताना काळजी घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर अश्लील संकेतस्थळ, चॅटिंग ॲप आणी शॉर्ट टर्म लोनवरून फसवणूक होत आहेत. अधिकृत ॲपचाच वापर करावा सध्या शेअर मार्केट मधील बोगस ॲप वरून बरेच लोकांची फसवणूक होत आहे. शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवताना अधिकृत ब्रोकर किंवा अधिकृत ॲप आणि वेबसाईट वरूनच ऑनलाईन व्यवहार करावा.

**ही घ्यावी काळजी...**

-ऑनलाइन आर्थिक व्यवहारातील ओटीपी कुणालाही सांगू नका, बँका किंवा इतर संस्था ओटीपी मागत नाहीत.

-कुठल्याही ॲपवरुन आलेल्या लिंक खात्री करून क्लिक करा.

- सोशल मीडियावर आपल्या वैयक्तिक आयुष्यातील पोस्ट टाकू नये.

-आर्थिक फसवणूक झाल्याचे कळताच बँक व १९३० ऑनलाईन तक्रार आणी सायबर पोलिसांशी तत्काळ संपर्क साधा.


-फसवणूक झाल्यानंतर लागलीच तक्रार- दिल्यास फसवणूकीचे रक्कम परत मिळण्याची शक्यता आहे.

**या प्रकारच्या येतात तक्रारी...**

नोकरीचे आमिषातून लूट, क्रिप्टोकरन्सी, इन्स्टंट लोन, इन्शुरन्स, शेअर मार्केट गुंतवणुक जादा परतावा अशा प्रकारचे आमिषे दाखवतात. ऑनलाइन खरेदी, बनावट संकेतस्थळ खात्री करावी. सायबर गुन्हेगार ऑनलाइन फ्रॉड करण्यासाठी मजूर व गरजू लोकांकडून बँक खाते वापरण्यासाठी घेतात. त्यांना महिन्याकाठी दोन ते ५ हजार रुपये दिले जातात. त्यामुळे कोणीही आपली बँक खाते वापरण्यास किंवा भाड्याने देवु नये.

सोशल मीडिया वापरताना संदेशाची खात्री करूनच ईतर लोकांना किंवा ग्रुपवर शेअर करावा. सायबर पोलीस ठाणे सोलापूर शहर लक्ष ठेवून आहेत. काही आक्षेपार्ह पोस्ट पाठवले तर नक्कीच त्यांच्यावर कारवाई होईल.

तसेच तलवार, पिस्टल, बंदूक अशा प्रकारचे शस्त्र घेऊन असलेले फोटोचे डीपी ठेवणे, स्टेटस ठेवणे तलवारने केक कापणे असे आढळून आल्यास अशा व्यक्तीना नक्कीच कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.








# सोलापूर जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीच्या पाऊलखुणा

**सोलापूर ही क्रांतिकारी विचारांची भूमी आहे. इथे अनेक राजकीय, धार्मिक, आर्थिक, सामाजिक प्रबोधनाच्या चळवळी निर्माण झाल्या. यामध्ये आंबेडकरी चळवळीचा इतिहास क्रांतदर्शी आहे. सोलापुरी भूमीला प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पदस्पर्श लाभले. इथल्या लोकांनी बाबासाहेबांना डोळे भरून पाहिले. ती माणसे आज हयात नसली तरी आंबेडकरी चळवळीच्या ऐतिहासिक पाऊलखुणा सोलापूरच्या भूमीमध्ये रुजलेल्या आहेत. त्याचे मंथन करणे काळाची गरज वाटते. भारतीय इतिहासामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जगविख्यात विद्वान, तत्त्वज्ञ, थोर राष्ट्रपुरुष, दलितांचे नेते, ज्येष्ठ भारतीय समाजशास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, कायदेविशारद, भारतरत्न, भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि बौध्द धम्माचे प्रवर्तक अशा विविध संबोधनांनी ओळखले जाते. वास्तविक ही संबोधने कमी पडतील, असे बाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व होते. म्हणूनच भारतीयच नव्हे तर जागतिक पातळीवर त्यांच्या क्रांतिकारक व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडलेला दिसतो. बाबासाहेबांनी आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि कुशल नेतृत्वाच्या माध्यमातून सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक पातळीवर निर्णायक चळवळ निर्माण करून युगप्रवर्तक असे कार्य केलेले आहे. या युगप्रवर्तक विचारकार्यातूनच भारतीय परिप्रेक्ष्यात आंबेडकरी चळवळ निर्माण झाली. दलित, शोषित, वंचित समुहाला आत्मभान देण्याचे, त्याला सन्मानाने जगण्याची जाणीव आणि आपल्या हक्क व अधिकारासाठी लढण्याचे बळ या चळवळीने दिले. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हे या चळवळीचे ब्रीदवाक्य आहे. बाबासाहेबांनी भारताच्या कानाकोपऱ्यात ही चळवळ पोहोचवली होती. महाराष्ट्रामध्ये मुंबई, नाशिक, औरंगाबाद, नागपूर याबरोबरच सोलापूर हे आंबेडकरी चळवळीचे मुख्य केंद्र होते.**


डॉ. सारीपुत्र तुपेरे
मो. ९८२२९८४३१३

सोलापूर जिल्ह्याला आंबेडकरी चळवळीचा मोठा इतिहास आहे. बाबासाहेबांनी सोलापूरला विविध प्रसंगांच्या निमित्ताने भेटी दिल्या होत्या. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी परिषदा, सभांच्या निमित्ताने भाषणे दिली होती. विशेषतः आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात सोलापूरमधून करताना बहिष्कृत हितकारणी सभेच्या माध्यमातून दलितांच्या मुलांसाठी बोर्डिंग त्यांनी काढले होते. तसेच जिवाप्पा ऐदाळे, निंगाप्पा ऐदाळे, हरी भाऊ तोरणे या आणि इतर आंबेडकरी शिलेदारांशी त्यांचा सातत्याने पत्रव्यवहार झालेला आहे. शेटफळ बावी येथे रमाबाई वास्तव्यास असताना बाबासाहेब तेथे आलेले होते. काही काळ तेथे राहिलेले होते. हा सगळा इतिहास अभ्यासताना सोलापूर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील ऋणानुबंध आपल्या लक्षात येतात. बाबासाहेबांनी सर्वप्रथम सोलापूरजवळील बार्शी येथे झालेल्या मुंबई प्रांतिक परिषदेच्या निमित्ताने मे १९२४ मध्ये सोलापूर जिल्ह्याला भेट दिलेली होती. या परिषदेमध्ये त्यांनी दिलेले भाषण क्रांतिकारक असून सामाजिक परिवर्तनाची नांदी या भाषणातून त्यांनी व्यक्त केलेली होती. दि. २६ व २७ नोव्हेंबर १९२७ रोजी जिल्हा वतनदार महार परिषदेचे दुसरे अधिवेशन सोलापुरात झाले. त्यावेळी बाबासाहेब सोलापूरला आले होते. भारतीय राऊंड टेबल परिषदेच्या मतदान कमिशनची स्पेशल गाडी रविवार, दि. ६ मार्च १९३२ रोजी सोलापूला आली. त्यावेळी बाबासाहेब काही काळ येथे थांबलेले होते आपल्या कार्यकर्त्यांशी त्यांनी संवाद साधलेला होता. मे १९३२ मध्ये बाबासाहेबांना सोलापूरच्या जनतेने मानपत्र दिले. स्वतंत्र मजूर पक्षाच्या दौऱ्याचा कार्यक्रम २४ जानेवारी १९३७ साली सोलापूर जिल्ह्यात झाला तेव्हा मंद्रुप, वळसंग, कुंभारी, बार्शी, कुर्डूवाडी, टेंभुर्णी, करमाळा भागात तुफानी दौरा केला होता. दि. ३० डिसेंबर १९३७ रोजी करकंब, ता. पंढरपूर येथे परिषदेला हजर राहताना कुर्डुवाडी, बागलकोट या गावांना भेटी देऊन त्यांनी दलित समाजाला मार्गदर्शन केले होते. सोलापुरातील ख्रिस्ती समाजासाठी बाबासाहेबांनी भाषण केले होते. दि. २३ फेब्रुवारी १९४१ रोजी तडवळे येथे महार, मांग, वतनदार परिषद घेण्यात आलेली होती. या परिषदेला आल्यानंतर बाबासाहेबांनी बार्शीला भेट देऊन तेथील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले होते. या सर्व ऐतिहासिक घटना असून इथे केवळ त्यांचा उल्लेख केलेला आहे. मात्र, त्याचे तपशील सोलापूर जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास मांडणारे आहेत.

सोलापूर जिल्ह्यामध्ये बाबासाहेबांचे अत्यंत विश्वासू आणि कर्तबगार अनुयायी होते. आमदार जिवाप्पा ऐदाळे, हरी भाऊ तोरणे, निंगाप्पा ऐदाळे ही महत्त्वाची नावे आहेत. बाबासाहेबांचा या तिघांवर अत्यंत विश्वास होता. सोलापूरमधील आंबेडकरी चळवळीचे हे प्रमुख शिलेदार होते. जिवाप्पा ऐदाळे यांनी राजकारणामध्ये दलितांचे प्रतिनिधित्व केले. हरी भाऊ तोरणे यांनी वैचारिक व प्रबोधनात्मक कार्य केले. तर निंगाप्पा ऐदाळे यांचे शैक्षणिक कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. यांच्याबरोबर उध्दव धोंडो शिवशरण, केरू रामचंद्र जाधव, एन.टी. बनसोडे, मारुती साळवे यांच्या परिश्रमामुळेच सोलापूर जिल्ह्यात आंबेडकरी चळवळ रुजली. या आंबेडकरी शिलेदारांनी बाबासाहेबांचा विचार जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचवला. सोलापूर जिल्ह्यात अनेक परिषदा, सभा घेतल्या. संघटनात्मक पातळीवर कार्य करून राजकीय पातळीवर दबावगट निर्माण केला. पुढे दलित पँथरच्या काळात डी. व्ही. फडतरे, दलितमित्र रणशृंगारे, खासदार एन. एस. कांबळे, डी. बी. खुणे, केरू लंकेश्वर इ. नेतेमंडळी तयार झाली. दलित पँथरमध्ये सोलापूर जिल्ह्यातील मोठा कार्यकर्तावर्ग होता. या पँथर लढ्यातून रिपब्लिकन पक्षाचे नेते तयार झाले. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात राजाभाऊ सरवदे, राजाभाऊ इंगळे, सुभानजी बनसोडे, प्रमोद गायकवाड, आनंद चंदनशिवे, बाळासाहेब वाघमारे, रवी गायकवाड, सुशिलाताई आबुटे, सुशीला व्हनसाळे, युवराज पवार, शांतीकुमार नागटिळक, राम सरवदे, यशवंत फडतरे, सुनिल सर्वगोड आदींसह आंबेडकरी चळवळीतील नेतृत्वाने आजची आंबेडकरी चळवळ विकसित करण्याचे कार्य चालू ठेवलेले आहे.

सोलापूर जिल्ह्यात आंबेडकरी उर्जेतून राजकीय, सामाजिक चळवळीबरोबर साहित्याची चळवळ निर्माण झाली. यामध्ये चळवळीत कार्य करणारे कार्यकर्ते चळवळीला बळ देण्यासाठी लेखन करत होते. जुन्या काळामध्ये यात हरी भाऊ तोरणे यांचा उल्लेख अग्रक्रमाने करावा लागतो. त्यांनी श्री चोखामेळा महाराजांची पंढरपुरावर स्वारी आणि चावडीतील बैठक ही पुस्तके आणि दीनमित्र या मासिकातून लिहिलेले 'काठीचे सपाटे' हे लेख अतिशय महत्वाचे आहेत. तसेच एन.टी.बनसोडे यांचे दामू झाला प्रधान हे लोकनाट्य दलित समाजाचे वास्तव मांडणारे होते. या स्वातंत्र्यपूर्व काळात दलित शाहिरांनी लिहिलेले जलसे हे आंबेडकरी चळवळीतील साहित्यिकांचे योगदान अधोरेखित करणारे महत्त्वाचे दस्तऐवज आहेत. समकालात सोलापूर मधील ज्येष्ठ आंबेडकरी लेखक म्हणून योगीराज वाघमारे यांना ओळखले जाते. त्यांनी कथा, कांदबरी, नाटक, कविता अशा विविध साहित्यप्रकारांमधून दर्जेदार लेखन केलेले आहे. उद्रेक, बेगड, गुडदाणी, बारव, सभापती, जेतवन, संसद ही त्यांची गाजलेली पुस्तके असून त्यांच्या उद्रेक या कथासंग्रहास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळालेला आहे. स्मृतिशेष ल.सि.जाधव यांनी उतारवयात केलेले लेखन दलित साहित्यविश्वात महत्त्वाचे ठरलेले आहे. त्यांचे होरपळ हे आत्मकथन खूप गाजले. दलितांचे जग या दोन्ही ज्येष्ठ लेखकांनी चित्रित केले. यांचे लेखन आत्मचिंतन, समाजचिंतन मांडणारे होते. त्याबरोबरच काळोखाच्या गर्भात, भिक्षुणी वासवदत्ता, उध्दवस्त अशी नाटके आणि अमृतनाक ही कादंबरी लिहिणारे भि. शि. शिंदे, अक्करमाशी या आत्मकथनाने संपूर्ण दलित साहित्यात आगळेवेगळे आणि अलक्षित जगणे लिंबाळे यांनी मांडले. त्यांचे लेखन केवळ महाराष्ट्रच नाही तर देशपातळीवर नावलौकिक प्राप्त केलेले आहे. बारामाशी ते सनातन पर्यतच्या त्यांच्या कादंबऱ्या विशेष महत्त्वाच्या आहेत. कोल्हाटयाचे पोर या आत्मकथनातून भटक्या विमुक्त् तमासगीर समाजाचे भयावह वास्तव डॉ. किशोर काळे यांनी मांडले.

या पुस्तकाला सोलापूर मधील मानाचा भैरूरतन दमाणी पुरस्कार देण्यात आला होता. त्यांचेच मी डॉक्टर झालो हे पुस्तकही अतिशय महत्त्वाचे आहे. आभरान हे पार्थ पोळके यांचे पुस्तक दलित आत्मकथनामध्ये खूप गाजले.

अलीकडच्या काळात दलित लेखकांची नवी पिढी नव्या उमेदीने लेखन करत आहे. त्यामध्ये तुंबन या कथासंग्रहाचे लेखक अर्जुन व्हटकर, कायरं या नाटकाचे लेखक अरूणकुमार इंगळे, कवी, समीक्षक संजय लांडगे, सर्जनशील लेखक प्रमोद लांडगे, वस्ती अजून थकलेली नाही, सूर्य कोपणाऱ्या विस्तवाच्या प्रदेशात या संग्रहांचे लेखक कवी चंद्रकांत मागाडे, कविता मानवतेच्या या कवितासंग्रहाचे लेखक, पत्रकार, संपादक, कवी भरतकुमार मोरे, प्रबुध्द् रंगभूमीच्या माध्यमातून विविध नाटकांचे लेखन करणारे नाटककार किर्तीपाल गायकवाड, सांग लाडके तुझी जात कोणती या संग्रहाच्या लेखिका कवयित्री अंजना गायकवाड, चीवर या कवितासंग्रहाचे लेखक कवी कांबळे, नागवंश या गाजलेल्या कथासंग्रहाचे लेखक कथाकार बा.ना. धांडोरे, अपेक्षा उपेक्षा या संग्रहाचे कवी जगदीश मागाडे, वेदनांकित घुंगरोच संदर्भ या संग्रहाचे लेखक कवी महादेव कांबळे, वॉन्टेड या कांदबरीचे लेखक वामन जाधव, वाटणी, होरपळ ते हिरवळ या आत्मचरित्राचे लेखक भास्कर बंगाळे, कावदान, झांजड, हावळा या कथासग्रंहांचे लेखक गणपत जाधव इत्यादी लेखकांचा समावेश करावा लागतो. याबरोबरच भटक्या विमुक्त समाजातील भिमराव जाधव, गुरुनाथ संगटे, नागनाथ गायकवाड, कवी अब्दुल हमीद राजेसाहेब शेख इत्यादी लेखकांचे लेखनही दलित समुहांच्या जगण्याच्या कक्षा कवेत घेते. दलित वैचारिक लेखनात दत्ता गायकवाड, एम.डी. शिंदे, बी.के. तळभंडारे, डॉ. गौतम कांबळे, मनिष सुरवसे इत्यादी लेखकांनी महत्वाची भूमिका पार पाडलेली आहे.

एकूणात सोलापूर जिल्हा हा आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला आहे. इथे आंबेडकरी उर्जेचे स्त्रोत मोठ्या प्रमाणात आहेत. राजकारण, समाजकारण, धर्म, साहित्य व कलांच्या माध्यमातून आंबेडकरी उर्जा जपली जात आहे. जुन्या काळातील प्रेरणा विचारात घेऊन आबेडकरी चळवळीचा हा क्रांतदर्शी इतिहास नव्या पिढीने लक्षात घेणे. आजच्या काळाची गरज वाटते.

# ओळख सोलापुरातील जैन मंदिरांची

**सोलापूर नगरी दिवसेंदिवस धार्मिक नगरी होत आहे.अनेक जाती-धर्मांचे लोक या ठिकाणी गुण्यागोविंदाने आपापल्या धर्माचे मनोभावे पालन करीत आहेत. त्याला जैन धर्मीय बांधव सुद्धा अपवाद नाहीत. सोलापूर शहरात आणि आसपासही अनेक जुनी जैन मंदिरे आहेत. येथील दिगंबर व श्वेतांबर समाज एकत्र येऊन आपापल्या अभिषेक पूजेच्या पद्धतीप्रमाणे जैन धर्मातील सण, उत्सव, पर्व साजरे करतात.**


अरुणकुमार धुमाळ
मो. ९८९०९०२९२३

श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिर थोरले मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच्या शेजारीच रत्नत्रय दिगंबर जैन मंदिर आहे. ही दोन्हीही मंदिरे सोलापुरातील शुक्रवार पेठेतील अतिशय सुंदर बांधकाम असलेली जुनी मंदिरे आहेत. शुक्रवार पेठपासून थोड्याशाच अंतरावर, झुंजे बोळात श्री चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन कासार मंदिर आहे. या मंदिरातील पार्श्वनाथांची नयनरम्य अशी मूर्ती दर्शनार्थींचे लक्ष वेधून घेते.

भुसार पेठेत आणखी एक अतिशय पुरातन असे दिगंबर जैन मंदिर आहे, माणिक स्वामी दिगंबर जैन मंदिर. नुकताच या मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून या जैन मंदिरातील प्रसन्नता, शांतता, येणाऱ्या श्रावक-श्राविकांच्या मनात भक्तीचा जागर निर्माण करते.

या मंदिरात तीन मूर्ती आहेत. मध्यभागी पार्श्वनाथांची, डाव्या बाजूला अनंतनाथांची तर उजवीकडे शांतिनाथ तीर्थंकरांची मूर्ती आहे. या मंदिरात जी छोटी मूर्ती आहे ती, माणिक स्वामींची म्हणजेच भगवान आदिनाथांची मूर्ती आहे. इथे भव्य असा मंडप असून या मंडपामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम नेहमीच आयोजित केले जातात.

चाटी गल्लीत श्री दिगंबर जैन बुबणे मंदिर आहे. हेही मंदिर खूप जुने असून या ठिकाणी भगवान आदिनाथांची अतिशय मनोज्ञ अशी मूर्ती आहे. वरच्या मजल्यावरही प्रसन्न अशी मूर्ती आहे. या मंदिरात नेहमीच विधानादी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. बहुतेक मंदिरे दगडी बांधकाम केलेली आहेत.

विजापूर रोडवर या परिसरातील जैन बांधवांची सोय व्हावी म्हणून, येथे भगवान बाहुबली मंदिराची निर्मिती करण्यात आली आहे. याचे वैशिष्ट्य असे की, हे मंदिर फक्त १०८ दिवसात तयार झाले असून २००१ साली प.पू.१०८ आचार्य देवनंदीजी महाराजांच्या उपस्थितीत या मंदिराचा पंचकल्याणक महोत्सव संपन्न झाला होता. या मंदिरात खालील बाजूस विसावे तीर्थंकर मुनिसुव्रतनाथ भगवंताची मूर्ती असून मंदिराच्या वरच्या भागात भगवान बाहुबली स्वामींची भव्य अशी मूर्ती आहे. या मूर्तीचा प्रतिवर्षी ११ नोव्हेंबरच्या आसपास महामस्तकाभिषेक आयोजित केला जातो. अमावस्येच्या दिवशी मुनिसुव्रत भगवंताच्या अभिषेकाचा लाभ घेण्यासाठी पंचक्रोशीतील जैन-अजैन बांधव येथे एकत्र येतात.



सोलापूर जवळच असलेल्या कुमठे गावात असेच एक पुरातन मंदिर आहे. हे दिगंबर जैन मंदिर ग्रामीण भागातअसून सुद्धा येथे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. या गावात कासार समाजाची अधिक घरे असली तरी जैन-अजैन बांधव एकत्र येऊन सण, उत्सव साजरे करतात. सध्या या मंदिराचे जीर्णोद्धाराचे काम सुरु आहे.

अशा मोठ्या व जुन्या भव्य अशा मंदिरांबरोबरच श्राविकाश्रम, नाथा रंगजी जैन बोर्डिंग, वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय तसेच वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नित्यनेमाने दर्शनाचा, पूजेचा, अभिषेकाचा लाभ मिळावा म्हणून छोटी देवालयेही आहेत. विद्यार्थ्यांवर या ठिकाणी धार्मिक संस्कार केले जातात.

दिगंबर पंथीय समाजाप्रमाणेच श्वेतांबर पंथीय समाजाचीही मंदिरे सोलापुरात आहेत. ही मंदिरे सुद्धा खूप जुनी आणि अतिशय मनोज्ञ मूर्तींनी युक्त आहेत. त्यापैकी ज्या काही मंदिरांचा आवर्जून उल्लेख केला जातो, ती मंदिरे जोडभावी पेठ, जुनी मिल परिसर, सम्राट चौक आदी ठिकाणी स्थित आहेत.

श्वेतांबर जैन स्थानकवासी श्रावकांसाठी तुळजापूर वेस येथे भव्य असे स्थानक सेवेसाठी उपलब्ध आहे. बाहेर गावाहून येणाऱ्या जैन समाज बांधवांची निवासाची सोय व्हावी म्हणून, शुक्रवार पेठेतील महावीर सांस्कृतिक भवन, शिंगवी भवन,जैन श्वेतांबर स्थानक, जैन धर्मशाळा, आदी सर्व सोयींनी युक्त अशी निवासस्थानेही सेवेसाठी उपलब्ध आहेत. जैन भोजनालयेही आहेत. जैन समाजातील श्रावकांवर मूल्यवर्धन शिक्षणाचे संस्कार व्हावेत म्हणून, वीतराग विज्ञान सर्वोदय प्रतिष्ठान ही संस्था कार्यरत आहे.जैन मंदिरात गुरुकुल पद्धतीचे शिक्षण देण्यासाठी पाठशाळा चालविल्या जातात.


अशा प्रकारे जैन समाजातील श्रावक-श्राविकांवर उत्तम संस्कार होण्यासाठी वर्षभर कार्यक्रमांची रेलचेल असते. माझ्या अल्प बुद्धीच्या आधारे जैन मंदिरांचा थोडक्यात परिचय करुन देण्याचा मी प्रयत्न केला आहे.यात काही उणीवा, त्रुटी राहिल्या असतील तर वाचकांनी उदार अं:तकरणाने मला क्षमा करावी, ही विनंती. धन्यवाद !!





vishwa

## वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा



✽ शुभेच्छुक ✽

**विश्व फाउंडेशन**

शिवपुरी अक्कलकोट

विश्व फाउंडेशन
शिवपुरी, अक्कलकोट, जि. सोलापूर - ४१३२१६, महाराष्ट्र
आंतरराष्ट्रीय हेल्पलाईन: +९१ ९५७९७ २२१११
E-mail: info@vishwaglobal.com
Web: www.vishwaglobal.com

- DR. RAJIMWALE

YouTube

7447489101

Scan this QR code to get the link for our Agnihotra app



दैनिक सोलापूर **तरुण भारत** वर्धापन दिनास

## हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

**मा. चेअरमन, श्री.मुरलीधर मजूर सहकारी संस्था, सोलापूर**




दैनिक सोलापूर **तरुण भारत** वर्धापन दिनास

## हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

**मा. चेअरमन, श्री.गजानन मजूर सहकारी संस्था, सोलापूर**





समर्थ रामदासस्वामी स्थापित नवसाला पावणारा दक्षिणमुखी

## श्री जागृत मारुती



सोलापूर तरुण भारत

वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

| श्रीकांत खानापुरे | सिद्राम वाघमोडे | प्रकाश मेंथे |
| --- | --- | --- |
| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | सचिव |

✽ बिरप्पा पुजारी ✽ परमेश्वर सुतार ✽ शांतय्या स्वामी
✽ चौंडप्पा सोलापुरे ✽ ज्ञानेश्वर फुलारी (पुजारी)

**समस्त भाविक व ग्रामस्थ गौडगाव (बु.)**

**गौडगांव बु॥(ट्रस्ट) ता.अक्कलकोट, जि.सोलापूर**

संपर्क : 9422458898 / 8698778651 / 9420261881 / 9422307010

Website : www.jagrutmaruti.com

श्री स्वामी समर्थ मंदिरापासून 11 किमी अंतरावर




सोलापूर तरुण भारत

प्रखर राष्ट्रीय विचाराचे दैनिक

**सोलापूर तरूण भारत**

वर्धापन दिनास


## हार्दिक शुभेच्छा!



ONKAR

एक पाउल प्रगतीचे..
**शेतकऱ्याच्या हिताचे..**





SKDESIGN | 7083964573

**मा.श्री.बाबुराव बोत्रेपाटील**

(चेअरमन, ओंकार साखर कारखाना प्रा.लि. युनिट नं.1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14)

## ओंकार पॉवर कॉर्पोरेशन प्रा.लि.

युनिट 5 तडवळ, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर 413219

**आधुनिक तंत्रज्ञानासह उत्कृष्ट उत्पादन व शेतकरी, तोडणी वाहतूकदार यांना उत्कृष्ट सेवा देणारा साखर कारखाना.**

**वैशिष्ट्ये :**

- शेतकऱ्यांना ऊस पुरवठा प्रमाणात मोफत साखर वाटप.
- अत्याधुनिक तंत्रज्ञानासह सुसज्ज कारखाना व सहवीजनिर्मिती प्रकल्प
- तज्ञ व प्रोफेशनल व्यवस्थापन
- ऊस गाळप क्षमता: 6500 मे. टन प्रति दिवस
- सहवीजनिर्मिती प्रकल्प क्षमता: 20 मेगावॅट
- सल्फर व सल्फरमुक्त साखरेचे उत्पादन
- स्वयंचलित यंत्रसामुग्री.